
रविवार, 02 ऑक्टोबर 2022
⊙ किंमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - 02 ⊙ अंक - 60
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी



● MARATHI ● DAINIK ● AURANGABAD (MAHARASHTRA) ● SUNDAY 02 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-02 ● ISSUE-60 ● TITLE CODE : MAHMAR51117 ● PAGE-16 ● PRICE-5



**आनंदाची वृष्टी | नवरात्र ||**

आई जगदंबे | घालतो गोंधळ ||
वाजतो संबळ | तुझ्या दारी ||१||

घेऊनी परडी | मागतो जोगवा ||
विकार जळावा | तुझ्या कृपे ||२||

संसारी तापाने | ग्रासला हा जीव ||
देई मज ठाव | अंबाबाई ||३||

जगजननी तू | माय कृपावंत ||
दुर्जनांचा अंत | दुर्गा करी ||४||

उघडूनी दार | पाही कृपादृष्टी ||
आनंदाची वृष्टी | नवरात्र ||५||

प्रा. ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)

# भारत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आत्मनिर्भर

## 5G लाँच कार्यक्रमात पंतप्रधान मोदींचे प्रतिपादन

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली : इतिहासात १ ऑक्टोबरची नोंद सुवर्ण अक्षरात होईल", पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज नवी दिल्लीतील प्रगती मैदानावर आयोजित इंडिया मोबाइल काँग्रेसच्या सहाव्या सत्राचे उद्घाटन पार पडले. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील 5G सेवेचाही शुभारंभ केला. यावेळी संबोधित करताना त्यांनी 5G चे फायदे आणि ही सेवा भारतात कशा प्रकारे क्रांती घडवून आणेल, यावर भाष्य केले. तसेच आजच्या तारखीची नोंद इतिहासात सुवर्ण अक्षरांत होईल, असेही ते म्हणाले.**

आम्ही सत्तेत आल्यानंतर देशात तंत्रज्ञानाच्या वापरावर भर दिला. आम्ही डिजीटल भारत ही संकल्पना सुरू केली. त्याचा परिणाम आज भारत तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात आत्मनिर्भर होतो आहे. आधी 2G, 3G आणि 4G साठी भारत इतर देशांवर अवलंबून होता. मात्र, आता 5G तंत्रज्ञानाने भारताने दूरसंचार क्षेत्रात जागतिक मानकं स्थापित केली आहेत, असे पंतप्रधान मोदी म्हणाले. डिजिटल वापरावर भर देण्याबरोबच आपण उपकरणांच्या किंमती आणि डेटाच्या किंमतीवरही लक्ष केंद्रीत केले आहे. २०१४ पर्यंत आपण १०० टक्के मोबाईल आयात करत होतो. मात्र, आता देशात २०० मोबाईल युनिट निर्मिती केंद्र तयार करण्यात आले आहे.

भारतात २०१४मध्ये २५ कोटी इंटरनेट युजर्स होते, हा आकडा आता ८५ कोटींवर पोहोचला आहे, अशी माहिती पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिली. तसेच आता 5G तंत्रज्ञान क्षेत्रात महत्त्वाची भूमिका बजावेल, असेही ते म्हणाले. तत्पूर्वी, एअरटेल, जीओ सारख्या कंपन्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना 5G चे प्रात्याक्षिक दाखवले. यावेळी त्यांनी 'जिओ-ग्लास'सह इतर 5G उपकरणांची पाहणी केली. तसेच एंड-टू-एंडचे स्वदेशी तंत्रज्ञानही समजून घेतले.

### संपूर्ण देशात 5G सेवा कधी उपलब्ध होणार?


4G सेवेपेक्षा तब्बल १० पट वेग असणाऱ्या 5G सेवेमुळे सर्वच क्षेत्रात कामकाज वेगाने होण्यास मोठी मदत होणार आहे. १०० एमबीपीएसवरून इंटरनेटचा वेग 5G सेवेमुळे थेट १० जीबीपीएसवर जाऊन पोहोचणार आहे. त्यामुळे 'नेट स्लो' असल्याचे कारण आता कुणाकडूनही येणार नाही, असे मिश्किलपणे म्हटले जात आहे. मात्र, नेमकी कुठल्या शहरांमध्ये ही सेवा कधीपासून सुरू होणार आहे? याविषयी चर्चा सुरू झाली आहे. शिवाय, या मोठ्या शहरांसह संपूर्ण भारतात ही सेवा नेमकी कधीपासून उपलब्ध होणार? असाही प्रश्न नेटिझन्सला पडला आहे. यासंदर्भात खुद्द मुकेश अंबानी यांनीच उद्घाटनाच्या कार्यक्रमात माहिती दिली आहे. 5G सेवा येत्या दिवाळीपर्यंत एकूण १३ शहरांमध्ये उपलब्ध करून दिली जाणार आहे. ज्या नागरिकांचा मोबाईल 5G सेवेसाठी तांत्रिकदृष्ट्या योग्य अर्थात 5G Enabled असेल, अशा नागरिकांना ही सेवा वापरता येईल. अहमदाबाद, बंगळुरू, चंदीगड, गांधीनगर, गुरुग्राम, हैदराबाद, जामनगर, कोलकाता, चेन्नई, लखनौ, पुणे, दिल्ली आणि मुंबई या शहरांमध्ये ही सेवा उपलब्ध करून दिली जाईल. त्यापैकी कोलकाता, दिल्ली, मुंबई आणि चेन्नई या शहरांमध्ये आधी सेवा सुरू केली जाईल.



# अजयच्या 'मैदान'ची रिलीज डेट बदलली

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** बॉलिवूड अभिनेता अजय देवगण गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत आहे. अजयचे अनेक सिनेमे गेल्या काही दिवसांत प्रेक्षकांच्या भेटीला आले आहेत. सध्या अजय 'मैदान' या सिनेमामुळे चर्चेत आहे. अजयच्या या सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात आली असून आता हा सिनेमा 17 फेब्रुवारी 2023 रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी अजयच्या 'दृष्यम 2' या सिनेमाचा टीझर आऊट झाला होता. आता 'मैदान' सिनेमाची नवी रिलीज डेट समोर आली आहे. 'मैदान' हा सिनेमा भारतीय राष्ट्रीय फुटबॉल संघाचे मॅनेजर सैयद अब्दुल रहीम यांच्या आयुष्यावर आधारित आहे. हा सिनेमा 23 जून 2022 रोजी सिनेमागृहात प्रदर्शित होणार होता. पण आता सिनेमाची रिलीज डेट बदलण्यात आली आहे. 'मैदान' हा सिनेमा 17 फेब्रुवारीला प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. अमित रवींद्रनाथ शर्मा यांनी 'मैदान' सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा सांभाळली आहे. अमित रवींद्रनाथ यांचा 'बधाई हो' हा सिनेमा गेल्या काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. 'मैदान' हा सिनेमा ओटीटीवर प्रदर्शित होऊ शकतो अशा चर्चा गेल्या काही दिवसांपासून होत होत्या. पण आता हा सिनेमा सिनेमागृहातच प्रदर्शित होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. झी स्टूडियोजचे निर्माते बोनी कपूर, आकाश



चावला आणि अरुणव जॉय सेनगुप्ताने मिळून या सिनेमाची निर्मिती केली आहे. अजय देवगणचा 'थँक गॉड' हा सिनेमा लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात अजयसह सिद्धार्थ मल्होत्रा, रकुल प्रीत सिंहदेखील दिसून येणार आहे. इंद्र कुमारने या सिनेमाचे दिग्दर्शन केले आहे.

# पालघरमधील सात मच्छीमार खलाशी पाकिस्तानच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज


**ओखा :** गुजरातमधील ओखा बंदरातील मासेमारी करणाऱ्या दोन बोटींसह 16 खलाशांना पाकिस्तानी सैन्याने ताब्यात घेतले. यामधील सात खलाशी हे पालघर जिल्ह्यातील आहेत. कुटुंबातील कर्ता पुरुषच पाकिस्तानी सैन्याच्या ताब्यात गेल्याने पालघरमधील सात कुटुंब चिंतेत आहेत. डहाणूतील अस्वाली गावातील सहा तर सोगवे येथील एका खलाशाला पाकिस्तान सैन्याने ताब्यात घेतले आहे. रोजगारासाठी ओखा येथे मासेमारी बोटीवर खलाशी म्हणून गेलेल्या या कामगारांना समुद्रातूनच पाकिस्तानच्या मेरिटाईम विभागाने ताब्यात घेतले. त्यामुळे या खलशांची कुटुंब सध्या मोठ्या अडचणीत सापडली आहेत. कुटुंबातील कमावता कर्ता पुरुषच पाकिस्तानच्या ताब्यात गेल्याने ही कुटुंब सध्या मरणयातना सोसत आहेत. कुटुंबाची घडी चालवणारा कुटुंबप्रमुख पाकिस्तानच्या ताब्यात गेल्याच ऐकताच या कुटुंबांच्या पायाखालची जमीन सरकली. घराची आर्थिक घडी चालवणारा सध्या पाकिस्तानच्या ताब्यात असल्याने घर खर्च आणि मुलांचा खर्च करायचा कसा असा गंभीर प्रश्न या महिलांसमोर उभा राहिलाय. नवश्या भीमरा, विजय नागवंशी, सरीत उंबरसाडा, जयराम साळकर, कृष्णा बुजड, विनोद कोल, उधऱ्या पाडवी अशी या सात खलाशींची नावं आहेत. महिनाभरापूर्वीच हे ओखा बंदरातील एका मासेमारी बोटीवर रोजगारासाठी गेले होते. पालघर मधील डहाणू, तलासरी, विक्रमगड या दुर्गम भागातील शेकडो कामगार स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध नसल्याने गुजरातकडे धाव घेतात. यातील अनेक कामगार हे आजही पाकिस्तानी सैन्याच्या ताब्यात आहेत. यात असलेला धोका लक्षात येऊनही रोजगारासाठी येथील अनेक कुटुंब प्रमुख मासेमारीसाठी बोटींवर खलाशी म्हणून जातात. त्यामुळे सरकारने आता पाकिस्तानच्या ताब्यात असलेल्या खलासांची सुटका करून स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून द्यावा अशी मागणी येथील स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे. गुजरातमधील ओखा बंदरातील मासेमारी करणाऱ्या दोन बोटी समुद्रातून पाकिस्तान सैन्याने ताब्यात घेतल्या. या बोटीवर असलेल्या 16 खलाशांपैकी सात खलाशी हे पालघर जिल्ह्यातील आहेत.

# उद्धव ठाकरे यांना 1996 सालीच मुख्यमंत्री व्हायचे होते

## सुरेश नवले यांचा गौप्यस्फोट : बाळासाहेबांचीही भेट घेतली

आधुनिक केसरी न्यूज

बीड : 1996 साली उद्धव ठाकरे यांच्या सांगण्यावरून आम्ही




बाळासाहेब ठाकरे यांची भेट घेतली आणि उद्धवजी यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्रीपद द्यावे, असा आग्रह केला. या सांगण्यामागचे मुख्य सूत्रधार हे देखील उद्धव ठाकरेच होते, असा गौप्यस्फोट बीडमध्ये आयोजित पत्रकार परिषदेमध्ये शिवसेनेचे माजी मंत्री सुरेश नवले यांनी केला.

सुरेश नवले हे एकनाथ शिंदे यांच्या गटामध्ये सामिल झाले आहेत. ते म्हणाले की, 1996 पासून उद्धव ठाकरे यांना मुख्यमंत्री व्हायची इच्छा होती. मात्र ती पूर्ण झाली नाही. ज्या वेळेस राज्यात महाविकास आघाडीचा प्रयोग करण्यात आला, त्यावेळी त्यांची मुख्यमंत्री होण्याची इच्छा पूर्ण झाली. राज्यात 1995 साली शिवसेना-भाजप युतीचे सरकार पहिल्यांदा सत्तेत आले होते. त्यावेळी सुरुवातीला मनोहर जोशी यांना मुख्यमंत्रीपदाचा मान मिळाला. नंतर फेब्रुवारी 1999 ते ऑक्टोबर 1999 अशा नऊ महिन्यांच्या कालावधीसाठी नारायण राणे यांच्या गळ्यात मुख्यमंत्रीपदाची माळ पडली. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आयोजित केलेल्या दसरा मेळाव्याला बीड जिल्ह्यातून पाच हजारांहून अधिक शिवसैनिक उपस्थित राहणार असल्याची माहिती शिवसेनेतून शिंदे गटात सामील झालेले बीडचे माजी मंत्री सुरेश नवले यांनी पत्रकार परिषदेत दिली. शिंदे गटाचे दोन शिवसेनाप्रमुख सध्या या मेळाव्यासाठी जास्तीत जास्त शिवसैनिकांना घेऊन जाण्यासाठी तयारी करत आहेत. ठाकरे गटाचे शिवसेनाप्रमुख असलेले अनिल जगताप यांनी देखील ग्रामीण भागातील शिवसैनिकांना शिवतीर्थवर घेऊन जाण्यासाठी तयारी सुरू केली आहे. जे निष्ठावंत शिवसैनिक आहे ते शिवतीर्थवर उद्धव ठाकरे यांचे विचार ऐकण्यासाठी येणार आहेत, कारण महाराष्ट्रात सत्तापालट झाल्याने शिंदे गटाच्या विरोधात अनेक शिवसैनिकांच्या मनामध्ये रोष असून सात हजार शिवसैनिकांना आम्ही शिवतीर्थवर घेऊन जाणार असल्याचं ठाकरे गटाचे जिल्हाप्रमुख अनिल जगताप यांनी सांगितल आहे. राज्यामध्ये महाविकास आघाडीचे सरकार आल्यानंतर उद्धव ठाकरे हे मुख्यमंत्री झाले. त्या आधी 2014 साली शिवसेना भाजप युतीच्या सरकारमध्ये भाजपकडे मुख्यमंत्रीपद गेले होते. 2019 च्या निवडणुकीमध्ये युतीला बहुमत मिळाल्यानंतर अडीच वर्षाच्या कालावधीसाठी मुख्यमंत्रीपद शिवसेनेला मिळावे या मागणीसाठी युती तुटली.

### नारायण राणेंचा दावा

केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनीही काही दिवसांपूर्वी उद्धव ठाकरे यांच्या संबंधित वक्तव्य केले होते. ते म्हणाले होते की, मी मुख्यमंत्री झाल्यानंतर उद्धव ठाकरे अचानक राजकारणात सक्रिय झाले. आपण मुख्यमंत्री झाल्याचे त्यांना पचले नाही, त्यामुळेच त्यांच्या जवळच्या लोकांनी राजकारणात येण्याचा सल्ला दिला. उद्धव ठाकरे यांचे पक्षातील वर्चस्व खऱ्या अर्थाने सुरु झाले ते 2003 सालच्या महाबळेश्वरच्या बैठकीपासून. याच बैठकीत राज ठाकरे यांनी उद्धव ठाकरे यांच्या नावाची कार्याध्यक्षपदी शिफारस केली होती. नंतरच्या काळात राज ठाकरे यांनी शिवसेनेला जय महाराष्ट्र केला आणि उद्धव ठाकरे यांच्या नावाची शिफारस करणे आपली चूक होती अशीही कबुली दिली होती.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

## महिलांचा आंदोलनातील सहभाग

आधुनिक केसरी

मागील पाच भागात हिमालयातील विविध भागात होणाऱ्या वृक्षतोडीवर स्त्री पुरुषांनी दिलेला लढा आपण पाहिला. अमृता देवी, गौरा देवी, किंकरी देवी यासारख्या स्त्रियांचे हे वृक्ष वाचवण्यातील योगदान आपण पाहिले. या स्त्रियांच्या नावापुढे देवी हा शब्द आला आहे. खऱ्या अर्थाने पर्यावरण रक्षणासाठी झगडणाऱ्या आणि आपले आयुष्य वेचणाऱ्या या देवीच आहेत. त्यांचे योगदान अमूल्य आहे.

दशौली ग्रामस्वराज्य संघ या सारख्या स्थानिक पर्यावरणाचे रक्षण करणाऱ्या संघाना म्हणजेच त्यातील काही सदस्यांना सरकारने त्यांच्या मागणीनुसार जंगलातील प्रत्येकी एक हेक्टर जमीन ९९ वर्षांच्या कराराने दिली आहे. या जमिनीवर या लोकांनी विविध वृक्षांची लागवड करून पुन्हा जंगलांना त्यांची समृद्धी प्राप्त करण्याचा निश्चय केला आहे. ही झाडे लावताना या लोकांच्या दैनंदिन गरजा भागतील असे वृक्ष लावण्याला



एक लढा असाही (भाग-6)

त्यांनी प्राधान्य दिले आहे. त्यात अंगू, ओक, भीमल आदी वृक्षांची लागवड केली आहे. हे वृक्ष खाद्य, चारा, सरपण इ गरजा भागवतात. जंगलतोडीने उघडेबोडके झालेले डोंगर या लोकांनी मोठया कष्टाने पुन्हा हिरवेगार केले आहेत. ही लागवड करतानाच हे वृक्षच काय पण या वृक्षांचे पानही ठेकेदारांकडून तोडले जाणार नाही याची कमालीची काळजी हे लोक घेतात. या जीवनदायी वृक्षांना प्राणापलीकडे जपतात. रेणी सारख्या भागातील स्त्रिया पर्यावरण रक्षणासाठी मोठया धैर्याने पुढे आल्या. ज्या ज्या नद्यांच्या पाणलोट क्षेत्रात पुरांमुळे नुकसान झाले होते, त्या त्या क्षेत्राच्या रक्षणासाठी त्यांनी विविध प्रकारे आंदोलन करून सरकारला त्या भयानक परिस्थितीची जाणीव करून दिली. या महिलांच्या सततच्या आंदोलनामुळे सरकारला पाणलोट क्षेत्रात झालेल्या हानीचा अभ्यास करण्यासाठी चौकशी समिती भाग पडले. या समितीने अलकनंदा आणि तिच्या उपनद्यांच्या परिसरातील पाणलोट क्षेत्रांचा बारकाईने अभ्यास केला आणि सरकारला या नद्यांच्या पाणलोट क्षेत्रातील बाराशे चौ कि मी परिसरात किमान दहा वर्षांकरता वृक्षतोडीस संपूर्णपणे बंदी करण्याची शिफारस केली. **(क्रमशः)**



# आनंदी पहाट

## मैत्रीच्या नात्यात वितुष्ट येऊ देऊ नये

आधुनिक केसरी

अगदी लहानपणापासून आपले शिक्षण आपल्या बरोबर शिकणाऱ्या आपल्या जिवलग मित्र-मैत्रिणींबरोबर सुरु असते. त्यादरम्यान आपल्या आयुष्यांतील प्रत्येक क्षण अविस्मरणीय करण्यात त्या मित्र-मैत्रिणींचा खूप मोठा सहभाग असतो. आपल्या मित्र-मैत्रिणी निवडताना आत्मनिष्ठता असणे गरजेचे असते. आपला सर्जनशील विचार नेहमीच आपल्या मित्र-मैत्रिणींच्या निवडीमध्ये नेमकेपणाने निर्णय घेण्यास उद्युक्त करत असतो. आपल्या प्रत्येक निवडीच्या संदर्भातील सर्व संभ्रम दूर करण्याचे काम याद्वारे होऊ शकते. आपला स्वतःकडे आणि इतरांकडे बघण्याचा दृष्टीकोन कशा प्रकारचा आहे, हे आत्मपरीक्षणाच्या माध्यमातून समजून घेणे महत्वाचे आणि म्हणूनच आवश्यक असते. अनेकदा आपला दृष्टीकोन जितका महत्वाचा असतो तितकेच ती दृष्टी कोण देते, ते देखील तितकेच महत्वाचे असते. शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षणाबरोबर मुलांना संगत निरनिराळ्या पद्धतीने घडवत असते; त्यामुळे आपल्या संगतीतील माणसे किंवा मुले कोणत्या गुणांची आहेत, हे अगोदर प्रत्येकाने पाहिले पाहिजे, तशी जाणीव प्रत्येकाला झालीच पाहिजे. आपल्या मैत्रीच्या नात्यांत वितुष्ट येण्यामागे अनेकदा आपापसातील गैरसमज कारणीभूत ठरतात. आपल्या मताप्रमाणे आणि मनाप्रमाणे वागणारी व्यक्तीच आपल्याशी अधिककाळ मैत्रीचे नाते टिकवून ठेवू शकते. मैत्रीच्या नात्यात सतत सकारत्मक विचार, वर्तन आणि व्यवहार असतील तर ती मैत्री शेवटच्या श्वासापर्यंत टिकून राहू शकते. अनेकदा "मी" पणा मैत्रीच्या नात्याला बाधक ठरतो. ह्या "मी" पणात नकारात्मकता खच्चून भरलेली असते. उज्ज्वल भविष्याच्या पूर्ततेसाठी कोणतीही वाईट सवय मनाला लावून न घेण्याची जाणीव होणे गरजेचे असते. ज्यांच्याकडून आपल्याला काहीतरी चांगले शिकता येईल अशांची संगत करावी अथवा संगत केली असेल तर ती कधीच सोडू नये.


विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

# संस्कार धन


सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग-41

## सुख म्हणजे काय ?

आधुनिक केसरी

सुखाची व्याख्या खूप सोपी आहे. ते आपल्या सर्वांना माहीत आहे. पण तरीही आपण सारे जण सुखाच्या मागे धावत असतो. धावल्यामुळे ते आपल्या हाती कधीच लागत नाही. सुख आपल्या भोवतीच असते.

पण आपले तिकडे लक्षच नसते. आपण उगीचच लांब धावत असतो. सुखाची व्याख्या प्रत्येकाची वेगवेगळी असते. कधी महालात सुख सापडत नाही तर कधी झोपडीत सुद्धा सुख सापडते. कोणी श्रीमंतीला सुख मानतात, तर कोणी माणुसकीला, नात्याला, प्रेमाला सुख मानतात. एक वाटसरु रस्त्याने जात असतो. रस्त्यात आंब्याचे झाड दिसते. त्या सावलीत थोडावेळ विश्रांती घेतो. तेवढ्यात एक आंबा खाली पडतो तो उचलतो व खातो. गोड लागल्यामुळे तो पुन्हा दुसरा आंबा मिळावा म्हणून झाडावर दगड मारतो. झाडावरच राखणदार बसलेला असतो. त्यानेच वाटसरूसाठी मुद्दाम एक आंबा खाली टाकलेला असतो. पण हा वाटसरू तेवढ्यावरच सुख न मानता दुसऱ्याच हाव धरतो. आणि पकडला जातो. तो राखणदार चांगलाच चोप देतो. याला म्हणतात हातचं सोडून पळत्याच्या पाठीमागे लागणे. सुख सोडून दुःखाचा धावा करणं. चांगल्या पगाराची नोकरी असताना लाच खाणं आणि मग घरी बसणं. हाव आणि अनावश्यक गरजा या सुखाच्या वैरी आहेत. आहे त्यात सुख माननं हेच तर आपल्याला आपल्या मुलांना शिकवायचं आहे. कष्टाची कमाई असेल तर गरजा वाढवा. पण त्याही मर्यादित. खूप जास्त महागड्या गरजा असतील तर त्या पण अजीर्ण होतात. कुठलीच गोष्ट अजीर्ण व्हायला नको. मर्यादेतच गरज असावी असेच संस्कार आजी-आजोबा आई-वडिलांनी मुलांवर करावेत. तेही आपल्या आचरणातून. मग मुलं त्याचं अनुकरण करत असतात. स्वच्छ अंतकरण ठेवून सर्वजण सुखात आनंदात राहू या...

# "निरूपण"

आधुनिक केसरी


डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं विश्वात्मिके नमो नमः।**
**अमित्राणां विनाशिन्यै शक्त्यै तुभ्यं नमो नमः।। ३२।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. विश्वात्मिके, तुला नमस्कार असो. शत्रूंचा विनाश करणारे शक्ते, तुला नमस्कार असो.
**जगदम्ब नमस्तुभ्यं वञ्चकनाशहेतवे।**
**असत्यवक्तृनाशाय चण्डि तुभ्यं नमो नमः।। ३३ ।।**
फसवणूक करणाऱ्या लोकांच्या नाशासाठी जगदंबिके, तुला नमस्कार असो. असत्य बोलणाऱ्या लोकांच्या नाशासाठी हे चण्डी, तुला नमस्कार असो.

## नवरात्रीत उपवास का करावा ?

आधुनिक केसरी

नवरात्री मध्ये रंग, परंपरा, संगीत आणि नृत्य ह्यांची रेलचेल असतेच, सोबतच ही वेळ आपली विश्रांतीची, आपल्या अंतरंगात वळण्याची आणि आपल्या आत नवी उर्जा भरून घेण्याची आहे. नवरात्रीच्या काळात उपवास केल्यास आपल्या आतील परमानंद आणि प्रसन्नतेकडे नेणारा प्रवास सुकर होतो. ह्यामुळे मनाची अस्वस्थता दूर होऊन सजगता आणि आनंद वाढू लागतो.

नवरात्रीतील उपवासात काय खावे, ह्या उपवासाचे नियम काय आहेत आणि इतर संपूर्ण माहिती जाणून घेण्यासाठी इथे क्लिक करा. आपण देवाला प्रसन्न करायला उपवास करीत नाही तर आपले शरीर शुद्ध करण्यासाठी उपवास करतो.- आयुर्वेदानुसार उपवासामुळे आपला जठराग्नी पुन्हा प्रज्वलित होतो. ह्या जठराग्नीतील वाढ आपल्या शरीरातील टाकाऊ विषकण नष्ट करते. हे टाकाऊ विषकण शरीराच्या बाहेर घालविले जातात, त्यामुळे सुस्ती आणि मंदपणा कमी होतो. शरीरातील पेशीपेशीत नवचैतन्य जागृत होते. त्यामुळेच, उपवास हा शरीरशुद्धीसाठी प्रभावी उपचार ठरलेला आहे. जेव्हा शरीर शुद्ध होते, तेव्हा मन सुद्धा अधिक शांत आणि स्थिर होते, कारण शरीर आणि मनाचा गहिरा संबंध आहे. बहुदा, आपल्यापैकी बरेच लोक भूक लागण्याची वाटच बघत नाही. भूक लागणे म्हणजे आपले शरीर अन्न पचविण्यासाठी आता सज्ज आहे हे दर्शविण्याचा त्याचा मार्ग आहे. भूक लागण्यापूर्वीच खाल्ल्यामुळे आपली पाचनप्रणाली अजून दुबळी होते, परिणामी ताण वाढतो आणि रोगप्रतिकारक शक्ती मंदावते.

उपवासाने आपला जठराग्नी अजून प्रदीप्त होत असल्यामुळे, तणाव कमी होऊन रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. नवरात्रीचा काळ हा स्वतःसोबत घालविण्याचा, ध्यानाचा आणि आपल्या अस्तित्वाच्या स्त्रोतासोबत जोडून घेण्याचा काळ आहे. उपवासामुळे मनाची अस्वस्थता कमी होते आणि आपल्या अंतरंगाकडे वळत गहिऱ्या ध्यानात उतरणे सोपे जाते. तथापि, स्वतःला पुरेशी उर्जा मिळत राहावी म्हणून पुरेसा फलाहार आणि सात्विक अन्नाचे सेवन करणे गरजेचे आहे.

## नवरात्राची सातवी माळ



आधुनिक केसरी

अश्विन शुध्द सप्तमी आज आपण देवीला सातवी माळ वहाणार आहोत. दररोजच्या पूजेमुळे एक सात्विक आनंद घरामध्ये निर्माण झालेला आहे. अहोरात्र नंददीप चालू आहे म्हणून चैतन्याचे वारे घराला नवचैतंन्य देत आहेत. सप्तशृंगी गडावर सातव्या माळेचे अतिशय महत्व आहे. अंबामाता सप्तशृंगी गडावर नांदत आहे. जाईजुई,शेवंती,गुलाब,अशा अनेक फुलांनी परिसर मनोहर दिसत आहे. जणुकाही मातेच्या आगमनाचा आनंद फळाफुलाना पण झालेला आहे. भक्त संकटात असल्यावर माता त्याला वरचेवर झेलून घेते. म्हणजेच भक्तांच्या सर्व काळज्या माता घेते.शक्ति पिठाच्या ठिकाणी देवीचं वास्तव्य असल्याने प्रत्येक शक्तिपीठाला अनन्यसाधारण महत्व आहे. संतसाहित्याचा अभ्यास करत असताना एक जाणीव नक्कीच झाली की प्राचीन भारतीय शास्त्रात शक्तीला देवतास्वरूप मानले आहे. त्याच विचाराने देवीचे सामर्थ्य तिची धैर्यशीलता, बुध्दी, उद्योग, साहस, सामर्थ्य पराक्रम हे गुण माणसाला प्रेरीत करतात.

1)सरस्वती देवी--बुद्धी व स्मरशक्तीच्या संपन्नतेतून साध्य होणाऱ्या विद्येची देवता म्हणजेच सरस्वती देवी होय.

2)लक्ष्मीदेवी--कर्मशक्तीच्या संपन्नतेतून साध्य होणाऱ्या संपत्तीची देवता म्हणजे लक्ष्मीदेवी होय.

3)दुर्गादेवी--शरीरशक्तीच्या सहाय्याने दुष्ट व अभद्र गोष्टी पासुन वाचवण्यासाठी लढणारी देवी म्हणजे दुर्गादेवी होय.

4)गायत्रीदेवी-- "गायत्रीबीजा निगमागन सारी प्रगटे पदमावती नीज धर्माचारी गायत्रीबिजा निजमागन सारी"आपल्या आरोग्याच्या रक्षणापासून सर्व वैश्विक शक्तीवर संपूर्ण मानवी जीवनात हरघडी आपल्याला मदत करते ती गायत्रीदेवी होय. म्हणून हिंदु संस्कृतीत अनन्यसाधारण महत्व आहे. ते समजून घ्यायला हवे गाईचे रक्षण संवर्धनासाठी प्रयत्न व्हायला हवे. माणसामाणसामध्ये देवत्व शक्ती केव्हा वाढीला लागतील तर मी म्हणेन की दुरूपयोगी शक्तीचा त्याग केल्या शिवाय देवत्वशक्ती जाग्या होणार नाहीत. म्हणजेच. कर्मशक्तिच्या जोरावर हे सर्व साध्य होणार आहे म्हणूनच नवरात्राचे दिवसांत देवीची पूजा ध्यान जपतप,जागरणगोंधळ, अखंड नंदादीप, होमहवन,स्त्रीसुक्ताचा पाठ,भोंडला, दांडिया यासर्व दिले तिला आवडणा-या गोष्टींचा जागर करून नवरात्राचा ऊत्सव साजरा करूया.

जय जय जगदंबे विश्वकुटूंबिनी।
मुलस्फूर्ती-प्रणवरूपिणी।। ब्रम्हानंदपददायिनी।।
चिद्विलासिनी अंबिके तू।।
अशा मातेला माझा वारंवार नमस्कार असो.


सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

## सातवी माळ- श्री सप्तशृंगी माता -वणी

आधुनिक केसरी

सातवी माळ नवरात्रीची आजला
नमस्कार श्रीसप्तशृंगी मातेला ।।
दर्शनास जावे हो सप्तशृंग गडावरी
मातासप्तशृंगी या डोंगरी वास करी
शक्तीपीठ अर्धे मानिती यास मातेचे
अतिपावन दर्शन सप्तशृंगीदेवीचे ।।

नाशिकपासून जवळ असलेले वणी. इथेच सप्तशृंगगड आणि माता सप्तशृंगी आहे. नाशिक ते वणी आल्यावर गडावर जाईपर्यंतचा गाडीचा प्रवास करीत जाणे, गड चढून जाणे हा अनुभव इतका अलौकिक आनंद देणारा आहे की काय सांगावे. प्रत्यक्ष्य अनुभवल्याशिवाय अनुभूती होत नसते असे जे म्हटले जाते, ते का? याचेच उत्तर आपल्याला अशा ठिकाणी गेल्यावर मिळते. यालाच "स्थान -महात्म्य" असे म्हणत असावेत. काही गोष्टी आणि काही योग घडणे, प्राप्त होणे हे ऋणानुबंध -गाठी असल्याशिवाय आपल्याला मिळत नसतात. यावर माझा तरी ठाम विश्वास आहे.मनाच्या ठायी श्रद्धा आहे. केल्याने देशाटन आपण सर्वार्थाने संपन्न होत जातो. देशाटन म्हणजे सगळा देश असा न घेता आपला परिसर, आपला भाग. हा प्रदेश आपल्यासाठी देस असतो.या अर्थाने आपल्या परिसरात प्रवासाचा सहपरीवारमनमुराद आनंद घेत असतो. या प्रवासातल्या सगळ्या ठिकाणी आपलीच माणसे आहेत. त्यातल्याचनाशिक या शहराशी आमचा विशेष लोभ आहे, स्नेह आणि नाते बंध आहे. पुण्यात येण्या अगोदरपासून परभणी-नाशिक-औरंगाबाद, परभणी किंवा परभणी - औरंगाबाद -नाशिक -परभणी असा गोल्डन ट्रँगल, सुवर्ण-त्रिकोणातला प्रवास दर दोन वर्षाला. असे अनेक वर्षे पक्का ठरलेला होता.

सातवी माळ

नाशिक रहिवासी असलेले श्री. आर. बी. गुंडेकर आणि सौ. रेखा (श्यामल ) गुंडेकर हे जोडपे आमच्यासाठी हक्काचे "पारिवारिक सेकंड- होम" आहे. माझे समवयस्क साडू -बंधू असलेले श्री. गुंडेकर आधी देवळाली कॅम्पमधल्या केंद्रीय विद्यालयात होते, नंतर उपनगरमध्ये स्वतःच्या घरात आले. त्याच भागात असलेल्या केंद्रीय विद्यालयात ग्रंथपाल "म्हणून कार्यरत असलेले

गुंडेकर हिंदी भाषिक असल्यासारखे हिंदी काव्य लेखन करणारे एकनिपुण कवी, उत्तम वक्ता असणे आश्चर्याचे नाही. माझ्यासाठी ते एक साहित्यिक -मित्र आहेत. अशा या गुंडेकर परिवारात आमचे नाशिक वास्तव्य. पर्यटन आणि सुट्टीचा आनंद घेण्यात ..भुर्र उडणारे कित्येक प्रवासी दिवस पुण्याच्या निवृत्त -वास्तव्यातआठवतात. गुंडेकर यांचे सोबत आम्हाला एके वर्षी पावसाच्या पर्वकाळातली वणी-सप्तशृंगी दर्शन यात्रा घडली. श्रावणातल्या निसर्गाचे ते विलोभनीय रूप पाहत सप्तशृंगी गड, मातेच्या दर्शनाची ओढ अधिकच लागलेली असे. नजरेस गड पडतो. त्या क्षणापासूनमनाने आपण गडावरती असतो. आणि गड चढणाऱ्या आपल्या पायांना अजिबात श्रम जाणवत नाहीत .." पायाला गोळे आलेत किंवा दम लागतोय" याचा भास देखील होत नाही, त्रास होणे तर दूरच. संसार -त्रासातून मनाला मुक्त करून काही दिवस तरी बाहेर पडण्यासाठी आपल्यासाठी दूर डोंगरी आपली अशी सुंदर निसगर्रम्य श्रद्धास्थान शेकडो वर्षपूर्वी आपल्या पूर्वजांनी बांधली त्यांची दूर-दृष्टीकिती मोलाची हे आता उमजू लागते. कुलाचार म्हणा की परंपरा म्हणा आपण अशा ठिकाणी येतो तेव्हा सगळे ताप-व्याप विसरून देवासमोर, देवी समोर बसून राहतो. "मित्रांनो हे सगळं सहजासहजी मिळत नाही. त्यासाठी दर्शनासाठी शरीराने बाहेर न पडता मनाने बाहेर पडले पाहिजे" तरच अशा दर्शन-यात्रेचे सार्थक होते.

### जागर देवी दर्शनाचा


अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

आणखी एक वेळा आमची वणी-सप्तशृंगी दर्शन -यात्रा झाली. नाशिक -सप्तशृंगी - सापुतारा करीत नाशिक. या दर्शन वारीच्यावेळी सप्तशृंगी मंदिर परिसरात आणि वर गडावर सुद्धा नव्या स्वरूपाचे बदल झाले असल्याचे पाहण्यात आले, अर्थातच ते मातेच्या -भक्तांसाठी मातेचे अनुपम -स्वरूप असे दर्शन आहे. आई-जगदंबा "वास करिते अशी साडे -तीन शक्तीपीठ आहेत ..कोल्हापूर -तुळजापूर -माहूर ही तीन पूर्ण शक्तीपीठं आणि सप्तशृंगी -वणी ही अर्धे शक्तीपीठ. आई -जगदंबेच्या वरील सर्व ठिकाणी सह-परिवार दर्शन यात्रा करण्याचा सतत योग असाच कायम असू दे, अशी आमची आईच्या चरणी प्रार्थना असते.

# गडचिरोली पोलिसांच्या वाढीव वेतनाचा आदेश दोन दिवसात

## देवेंद्र फडणवीस : मेडिकल कॉलेज, विद्यापीठ उपकेंद्रासाठी जागेचे अधिग्रहण लवकरच

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** गडचिरोलीसारख्या नक्षल भागात पोलिसांच्या दीडपट वेतनाचा प्रश्न प्रलंबित आहे. मात्र, त्यासंदर्भातील आदेश देण्यात आले असून, येत्या सोमवारपर्यंत त्याचा शासन आदेश गडचिरोलीत पोहोचेल, असे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज गडचिरोलीत केले. गडचिरोली जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून त्यांनी आज जिल्हा नियोजन समितीची बैठक घेतली, त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. या बैठकीत गडचिरोलीतील प्रलंबित प्रश्नांचा आढावा घेण्यात आला. बैठकीला खा. अशोक नेते, आ. देवराव होळी, आ. कृष्णा गजबे, आ. धर्मरावबाबा आत्राम, आ. अभिजित वंजारी, जिल्हाधिकारी, विशेष पोलिस महानिरीक्षक, पोलिस अधीक्षक, मुख्य वनसंरक्षक, मुख्य कार्यकारी अधिकारी, इतर अधिकारी, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पत्रकारांशी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मेडिगट्टा संदर्भात ज्या शेतकऱ्यांच्या जमिनी पाण्याखाली जातात, त्यांचे अधिग्रहण करून जमीनीचे मूल्यांकन, झाडे असतील त्यासाठी वेगळे पॅकेज आणि आवश्यकता असेल तर सानुग्रह अनुदान असे सर्वंकष पॅकेज तयार करण्यास सांगण्यात आले आहे. कोन्सरी प्रकल्पाला गती देण्याचा निर्णय घेतला आहे. येथील खणिज केवळ बाहेर नेऊन चालणार नाही, तर त्यावरील प्रक्रिया उद्योग सुद्धा गडचिरोलीत असला पाहिजे. त्यातून स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे, अशी सरकारची भूमिका आहे. या प्रकल्पाचा एप्रिलपर्यंत पहिला टप्पा आणि पुढच्या विस्ताराला सुद्धा आम्ही लवकरच मान्यता देऊ. या प्रकल्पात 18,000 कोटी रुपयांची गुंतवणूक येणार असल्याने एमआयडीसीला अतिरिक्त जागा द्यायला सांगण्यात



येईल. या प्रकल्पामुळे स्थानिक विकासाला मोठी गती मिळणार असून, स्थानिकांना रोजगार मिळणार आहे. त्यामुळे या प्रकल्पासाठी लागणारी संपूर्ण मदत राज्य सरकारतर्फे करण्यात येईल आणि अडचणी दूर करण्यात येतील, असेही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले. वाहतुकीमुळे नागरिकांना येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी 'मायनिंग कॉरिडॉर' तयार करून त्यावरूनच वाहतूक होईल, असा प्रयत्न करण्यात येणार आहे. त्याचा आराखडा लवकरच तयार करण्यात येईल, असेही ते म्हणाले. गडचिरोली येथील मेडिकल कॉलेज तसेच विद्यापीठाच्या उपकेंद्राला लागणाऱ्या जागचे अधिग्रहण करण्याचे आदेश दिले आहेत. सिंचनाच्या संदर्भात लोकप्रतिनिधींनी काही प्रश्न मांडले. तीन बॅरेजच्या कामाला गती देण्यासाठी डिझाईन तयार करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. त्याला लवकरात लवकर प्रशासकीय मान्यता देण्यात येईल. गडचिरोलीतील रस्त्यांच्या प्रलंबित कामांना गती देण्यात येईल. रूग्णांना वारंवार चंद्रपूरला जावे लागू नये, म्हणून गडचिरोलीत एमआरआय मशीन लावण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विकासाच्या संदर्भात सर्व अधिकाऱ्यांना सूचना केल्या आहेत. गडचिरोलीचे सर्व प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यात येतील. मंत्रालय स्तरावर जे प्रश्न आहेत, त्यासंदर्भात लवकरच मंत्रालयात एक बैठक घेण्यात येईल, असेही देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

# न्यायालयाचा सप्तशृंगी गडावर बोकडबळी देण्यास हिरवा कंदील

## ५ वर्षानंतर प्रथेनुसार गडावर होणार बळी विधी

आधुनिक केसरी न्यूज

**बंडू खडांगळे**

**दिंडोरी :** सप्तशृंगी गडावर दसऱ्याच्या दिवशी श्री भगवतीच्या मंदीर पायऱ्यांवरील दसरा टप्प्यावर प्रथा - परंपरेनूसार पूर्वी पासून सुरु असलेल्या बोकड बळी देण्याची प्रथा पाच वर्षांपासून प्रशासनाने बंद केलेली होती. या प्रशासनाच्या निर्णया विरुध्द आदिवासी विकास संस्था, धोंडाबे ता.सुरगाणा या संस्थेने जुलै २०१९ मध्ये उच्च न्यायालयात दाखल केलेली होती. या जनहित याचिकेवेर गुरुवार ता. २९ रोजी उच्च न्यायालयात सुनावणी होवून न्यायालयाने याचिकाकर्त्यांचे बाजून निकाल देत न्यायालयाने अटी शर्तीनूसार बोकड बळी देण्याची प्रथा परंपरा पूर्ववत सुरु करण्यास परवानगी दिली आहे. याचिका कर्त्यांच्या बाजूने ॲड. दत्ता पवार यांनी बाजू मांडली. यासाठी भाविक सुधीर सोनवणे, सप्तशृंगी गड, नांदुरी व परीसरातील गावांतील ग्रामस्था यांनी पाठपूरावा केला. सप्तशृंगी गडावर नवरात्रोत्सवाची सांगता दरम्यान विजयादशमी- दसरा उत्सवाच्या दिवशी बोकड्याची गावातून सवाद्य मिरवणूक काढून गडावरील दिपमाळ परीसरातील दसरा टप्प्यावर बोकड्यास नेवून पांरपारीक पध्दतीने पुजाअर्चा करुन बळी देण्याची पूर्वापार चालत असलेली प्रथा सुरु होती. यावेळी बोकडबळी देतांना सप्तश्रृंगी देवी न्यासाच्यावतीने मानवंदना म्हणून हवेत गोळीबार करण्याची पंरपरा होती. मात्र ११ सप्टेंबर २०१६ रोजी दसऱ्याच्या दिवशी परंपरेनूसार बोकड बळी देण्याचा विधी सुरु असतांना ट्रस्टच्या सुरक्षा रक्षकाकडून अनावधानाने रायफलमधून गोळी सुटून भिंतीवरील दगडावर आपटलेल्या गोळीचे छरे उडून १२ भाविक जखमी झाले होते. सुदैवाने यात जीवीत होणी टळली होती. या विधीत सहभागी होण्यासाठी भाविकांची गर्दी होत असल्याने भविष्यात या बोकड बळीच्या प्रथेमळे कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, याकरिता पोलीस प्रशासनाने ही प्रथा बंद व्हावी, अशी शिफारस जिल्हा प्रशासनाला केल्यामूळे सप्टेंबर २०१७ पासून गडावरील दसरा टप्पा व ट्रस्टच्या हद्दीत बोकड बळी व हवेत गोळीबार करण्याच्या प्रथेस तत्कालीन जिल्हाधिकारी राधाकृष्णन बी. यांनी बंदी घातलेली आहे. दरम्यान दसऱ्याच्या दिवशी बोकडबळी देण्याची प्रथा ही वर्षानूवर्ष अखंड सुरु असल्याचे तसेच आदिवासी बांधवाच्या सानिध्यात श्री सप्तशृंगी मातेचे स्थान असून आदिवासी बांधव परंपरेनूसार धार्मिक कार्य करतांना बोकड बळी देण्याची परंपरा आहे. यात श्रध्दा व लोकभावना असल्याने बोकड बळी दिला नाही तर गडावर दरड कोसळणे, अतिवृष्टी या सारख्या नैसर्गिक आपत्ती येवून दुर्घटना होवू शकतात अशी आदिवासी बांधवा बरोबरच ग्रामस्थांचा समज आहे.



तसेच प्रशासनाने सदर बंदीचा निर्णय घेतांना ग्रामस्थ, ग्रामपंचायत, आदिवासी बांधव आदींना विश्वासात न घेता एकतर्फी निर्णय घेतल्याचा आरोप केलेला होता. तसेच देवीच्या साडेतीन शक्तीपीठांपैकी कोल्हापूर येथे भवानी मातेच्या मंदिरासमोर भवानी मंडपात तसेच तुळजापूर येथेही नवमीच्या दिवशी हजारो भाविक व प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थित बळी देण्याची परंपरा सुरु असतांना सप्तशृंगी गडावरील घातलेली बंदीचा निर्णय लोकभावना, श्रध्दा व धार्मिक भावना दुखवणारी आहे. देवी महात्म असलेल्या दुर्गासप्तशती, नवचंडी स्त्रोत्र आणि इतर धार्मिक ग्रथांतही पशुबळी देण्याबाबत उल्लेख आढळतो. याबाबत सप्तशृंगी गड, नांदुरी, मोहनदरी, गोलदरी, दरेगांव येथील ग्रामस्थ व ग्रामपंचायतीच्यावतीने गेल्या सहा वर्षांपासून प्रशासनानस अटी शर्ती नूसार दसरा टप्प्यावर बोकड बळी देण्यास परवानगी द्यावी अशी मागणी सातत्याने होत असल्याचे याचिकाकर्तीने याचिकेत उल्लेख करीत उच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. या जनहित याचिकेवर गुरुवारी, ता. २९ रोजी सुनावणी झाली असून यात न्यायालयाने याचिकाकर्ते आदिवासी विकास संस्था, धोडंबे सह सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी कळवण, तहसिलदार कळवण, पोलिस निरीक्षक कळवण, सप्तशृंगी निवासिनी देवी ट्रस्ट, सप्तशृंगी गड व नांदुरी ग्रामपंचायत यांनी सहमतीने प्रशासनाने बंद केलेली प्रथा पूर्वरत पणे अटी शर्तीनूसार करण्यास हरकत नसल्याची एकत्रीरीत्या मान्य असल्याचे पत्र न्यायालयात सादर केले असतांना न्यायालयाने बोकड बळीची बंदी उठवत प्रथा पंरपरेनूसार बोकड बळी देण्यास परवानगी दिली आहे. त्यामूळे ५ ऑक्टोंबर रोजी दिला जाणारा यज्ञ आहूतीचा बोकड बळी विधी हा गडावरील दसरा टप्पा येथे पाच वर्षानंतर पुन्हा होणार असल्याने भाविक, सप्तशृंगी गड, नांदुरी, मोहनदरी, दरेगाव, मार्केंड पिंप्री ग्रामस्थांमध्ये आनंद व्यक्त होत आहे.

# अखेर लोहगड ग्रामपंचायतीची तीन दिवसांत होणार चौकशी

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** आकाश सोनवणे यांच्या चौकशीच्या विनंती अर्जावरून धुळे तालुक्यातील मौजे लोहगड ग्रामपंचायतच्या जिल्हा परिषद प्रशासनाने पंचायत समिती धुळे प्रशासनाला लोहगड ग्रामपंचायतमध्ये २०१५ पासून ते आजगायत पर्यंत विकास कामांची चौकशी करून अहवाल देण्याचे आदेशित केले होते मात्र तीन ते चार महिने उलटूनही पंचायत समिती प्रशासनातील संबंधितानी या चौकशीकडे दुर्लक्ष केले होते.. याबाबत गटविकास अधिकारी यांची भेट घेतल्यानंतर त्यांना सविस्तर माहिती देण्यात आली.. त्यानंतर काही कारणास्तव चौकशी रखडली गेली मात्र लवकरच चौकशी होणार असल्याचे आश्वासन त्यांनी दिले होते. तसेच याबाबत विस्तार अधिकारी यांनी देखील ग्रामपंचायतीला आपण केलेल्या विकास कामांचा लेखाजोखा ऑडिट रिपोर्ट उपलब्ध करून देण्यासंदर्भात सूचना केल्या आहेत. येत्या दोन ते तीन दिवसात धुळे तालुक्यातील लोहगड ग्रामपंचायतीच्या सन २०१५ -२०१६ म्हणजे आत्तापर्यंत असलेला विकास कामांची सखोल चौकशी करण्यात येईल असे पंचायत समितीचे विस्तार अधिकारी यांनी सांगितले आहे. १४ व १५ वित्त आयोगातून झालेली कामे त्यासाठी झालेला खर्च तसेच कामे कोणाला दिली याचा सविस्तर तपशील तसेच कंत्राटदाराला बरोबर झालेले एग्रीमेंट तसेच ई - टेंडर झाले असल्यास संपूर्ण टैंडर प्रोसेस ची कॉपी इस्टिमेट याची संपूर्ण माहिती द्यावी तसेच सर्व बिले तसेच झालेली कामाची माहिती देण्यात यावी कामाची गुणवत्ता (लेखापरीक्षण) विचारलेल्या कालावधीनुसार ऑडिट रिपोर्ट मध्ये असलेले दोष तपासणी करण्यात यावी.अशी मागणी अर्जदारांकडून करण्यात आली आहे लवकरच या ग्रामपंचायतीची सखोल चौकशी करण्यात येऊन त्यामध्ये काही तथ्य आढळल्यास संबंधितांवर योग्य कारवाई करण्याची मागणी ही केली जाणार आहे.

# प्रवास करताना दक्ष रहावे : सपोनि वाघमोडे

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** फर्दापूर येथे अजिंठा लेणी बघण्यासाठी पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढ होत आहे. प्रवासी आणी नागरिकांना सूचित करण्यात येत की, आपण बसमध्ये चढताना व उतरताना योग्य ती दक्षता घेणे आवश्यक आहे. घाईगडबडीमध्ये काही महिला ज्या की तोंडाला रुमाल बांधलेला असतात. त्या इतर महिला आणी नागरिकांची दिशाभूल करून मंगळसूत्र, चैन, आणी नागरिकांची पाकिटे हातचलाखी करून काढून घेतात. तसेच बसमध्ये असल्यावर हातचलाखी करून पर्समधील किंमती वस्तू सुद्धा काढून घेतात. त्यामुळे आजूबाजूच्या नागरिकांनी प्रवाशांनी दक्ष राहणे आवश्यक आहे.




# सोयगावात 'लम्पी' आजाराने घेतला पहिला बळी

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** शहरात व तालुक्यात व सावळदबारा परिसरात जामठी, मोलखेडा, नादातांडा व सावळदबारा बैल दगावत आहे. गेल्या एक महिन्यापासून 'लम्पी स्कीन' या जनावरांच्या आजाराचा प्रादुर्भाव जास्त वाढत आहे.त्यातच पहिला बळी सोयगाव शहरातील शेतकरी महेश शिवाजी चौधरी या शेतक-याचा बैलाचा. या लम्पी आजाराच्या प्रादुर्भावामुळे त्याचा आज दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांचा जेसीबीच्या सहाय्याने खड्डा खोदून दफन विधी करण्यात आला. परिसरातील शेतकऱ्यांना ही या घटनेची बातमी समजताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. या घटनेचा पंचनामा तालुका वैद्यकीय अधिकारी डॉ विनोदकुमार चव्हाण,पुरुषोत्तम डॉ.योगेश पाटील,डॉ.निलेश पाटील यांनी केला.शेतकरी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. लम्पी त्वचा रोगाचा प्रादुर्भाव विशेषतः बैल,वासरू जनावरांना होत आहे, हा संसर्गजन्य रोग असल्याने उपचार करण्यापेक्षा रोग येऊच नये याकरिता प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. रोग आल्यास त्याचा प्रसार होऊ नये याकरिता शेतकऱ्यांनी आवश्यक ती काळजी घेण्याची आवश्यकता आहे. बाह्य किटकांवर नियंत्रण ठेवण्यासाठी गोठ्यांची व्यवस्थित स्वच्छता राखावी. निरोगी जनावरांना बाधित जनावरांपासून वेगळे बांधावे. गायी व म्हशींना एकत्रित ठेवण्यात येवू नये. जनावरामध्ये हा आजार अत्यंत संसर्गजन्य असल्यामुळे रोग सदृश लक्षणे आढळल्यास जवळच्या पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याशी तातडीने संपर्क साधावा,असे आवाहन यावेळी जि.प.सदस्य गोपीचंद जाधव यांनी केले.



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्रे
संपर्क क्र. ७५८८४२४२५४


# स्त्रीसुद्धा माणूसच असते

आधुनिक केसरी

**जगात सर्वत्र स्त्रीवर्गाविषयीचा दृष्टिकोन दोन-तीन प्रकारचा आहे. देवत्व स्वरूप, उपभोग्य वस्तू आणि कस्पटासमान. यापेक्षा आपण स्त्रीकडे माणूस म्हणून पाहू शकत नाही का? कोणतेही एक टोक गाठण्यापेक्षा सर्वसाधारण माणूस म्हणून स्त्रीचा व तिच्या असण्याचा विचार झाला पाहिजे. घरात पुरुषाला हवे तसेच व एकूण कौटुंबिक वातावरणानुसार वर्तन झाले पाहिजे ही अपेक्षा तर समाजात वावरताना तिचा अधिकाधिक संकोच कसा होईल ही काळजी समाज म्हणून आपण घेतो, म्हणजे पुरुषवर्ग घेतो. याच समाजात स्त्री देखील येते, हे साफ विसरल्या जाते. वस्तूच्या गुणधर्मावरून त्याचा धर्म ठरतो, असे वर्धमान महावीर म्हणतात.**

स्त्रीधर्म हा स्वतंत्र अभ्यासविषय असताना जगातील समस्त पुरुषांना मात्र स्त्रीने आपल्या मतानुसार वर्तन केले पाहिजे असे सातत्याने वाटते. तिचे गुणधर्म वेगळे, स्वभाव वेगळा हे मात्र आपण समजून घेत नाही. शिक्षण, साहित्य, समाजकारण, राजकारण, सांस्कृतिक कार्यक्रम आणि अन्यत्र स्त्रीचा वावर पाहिला तर काय दिसते? सर्वत्र तिची नसल्यागत संख्या दिसते. तिचा अधिकाधिक संकोच कसा होईल हे समाज म्हणून आपण काळजी घेत असतो. समाज म्हणत असताना देखील आपल्या ह्या संकल्पनेत स्त्री नसतेच. नवऱ्याशी प्रामाणिकता ही कसोटी तर घर, संसाराची जबाबदारी हे तिचे एकमेव कर्तव्य ठरवून दिल्यानंतर त्या परिघाबाहेर निघणारी स्त्री म्हणजे अशी तशीच असण्याचा ठपका माथी मारून समाज मोकळा. असे म्हणतात की, स्त्रीचे स्पर्शज्ञान फार चांगले असते. कोणता स्पर्श कशा स्वरूपाचा आहे, हे तिच्या ताबडतोब लक्षात येते. त्याच वेळेस कोणती नजर कशी आहे, हेही लक्षात आले असते तर, या समाजातील किती टक्के पुरुष निर्मळ डोळ्यांचे आहेत हेही पाहता आले असते. सर्वचजण बुभुक्षित नजरेने पाहतात असे नसले तरी स्त्री विषयावर गप्पा मारण्यात पुरुषांना फार स्वारस्य हे मात्र नक्की. आपल्यावर कोणीतरी अवलंबून असणे हे पुरुषी मानसिकता सुखावणारी गोष्ट आहे. स्त्रीच्या स्वातंत्र्याचा संकोच होण्यामागे अनेक कारणांपैकी हे एक महत्त्वाचे कारण आहे. त्यामुळे घराबाहेर पडून काम करणाऱ्या बायकांचे प्रमाण फार अल्प आहे. पुरुष आपल्या जिवाचे रान करेल, संपूर्ण कुटूंबाचा भार सहन करेल, पण स्त्रीला बाहेर पडू देणार नाही. यात तिच्याप्रति असणाऱ्या मानवी दृष्टिकोणापेक्षा पुरुषी अहंकार त्यास महत्त्वाचा वाटतो. यात स्त्रीची देखील तेवढीच चूक असते. सातत्यपूर्ण अशा वागण्यामुळे अमुक अमुक क्षेत्र आपले नाही हा न्यूनगंड तयार होत जातो. तिचा तो स्वभाव बनतो. परिणामी दुय्यमत्व येत जाते. भारतापूरता विचार केला तर काय स्थिती दिसते? इथला बहुतांश स्त्रीवर्ग आज करिअरपेक्षा कर्मकांडात गुंतलेला आहे. जगातल्या सर्वच धर्मांची निर्मिती पुरुषांनी केली आणि त्याला बळकटी स्त्रियांनी दिली. तीच आदिम धारा आजही तिच्या धमन्यातून वाहते आहे. नवीन विचार, नवा काळ आणि नवीन स्थित्यंतरे समजून घेण्याची अनुत्सुकता स्त्रीमध्ये ओतप्रोत भरलेली असताना या परिस्थितीचा फायदा पुरुष उचलणार नाहीत तर ते पुरुष कसले? एकतर स्त्री पुरुषांची बरोबरी करू इच्छिते किंवा आहे त्या स्थितीत समाधान मानते. या दोन्ही गोष्टी चूकच. कारण आपल्या स्वभाव गुणधर्मानुसार वाटचाल करत असताना घर, संसार, मुलेबाळे या गोष्टी तर येणारच. पण त्या पलीकडे विचाराचे, आदर्शांचे आणि नवकल्पनांचे जग असते याचेही भान यायला पाहिजे.


आज मुलींचे शिक्षणाचे प्रमाण वाढले आहे. तरीही सूक्ष्मपणे पाहिले असता हे शिक्षण करिअरपेक्षा जोडीदार निवडीसाठी जास्त उपयोगी पडेल, हा विचार त्यात अध्याहृत असतो. जणू काही कमाई करण्याची सर्व जबाबदारी फक्त पुरुषांची आणि घर-संसाराची जबाबदारी स्त्रीची अशी अलिखित वाटणी समाजाने केली आणि त्यास स्त्रीवर्गानेही संमती देऊन टाकली. अगदी चक्रधर स्वामी, महात्मा बसवेश्वर, संत परंपरा, महात्मा फुले, वसाहत काळ या सर्वांचा विचार केला तर स्त्रीला दिल्या जाणारी दुय्यम वागणूक थांबली पाहिजे आणि तिच्या असण्याचा परीघ व्यापक झाला पाहिजे, यासाठीच तर या सर्व समाजसुधारकांचा आग्रह होता. आपण १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय स्त्रीवर्ष म्हणून साजरे केले. पाश्चात्य जगतात जे.एस. मिल, जॉन पॉल सार्त्र, सिमोन द



## क्षितिजापल्याड

बोव्हा, मादाम स्टेल या मंडळींनी स्त्रीवादी विषयावर भरपूर काम केले, त्याचा परिणाम म्हणून तिकडील स्त्रीवर्गाच्या जीवनमानात नक्कीच बदल घडून आला. स्त्रियांच्या भौतिक जगण्यात बदल झाला असला तरी तिच्याकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात अजूनही आपण बदल घडवून आणू शकलो नाहीत, ही खंत आहेच. यास समाज जेवढा दोषी आहे, तेवढाच स्त्रीवर्गही दोषी आहे. कपडेलत्ते आणि सौंदर्य- प्रसाधने आणि दाग-दागिने याबाहेरही जग आहे, हेच विसरले जात आहे. एकतर धार्मिक कर्मकांडात किंवा मौजमस्ती करण्यात धन्यता मानणाऱ्या स्त्रीला आपले स्वत्व शोधनाची मोहीम स्वतःच हाती घेतल्याशिवाय पर्याय नाही. समाजातील बहुतांश पुरुषी मानसिकतेला तुमचे असे असणे मान्यच आहे, किंबहुना तुम्ही मनोरंजन करत रहावे यासाठी सर्व प्रकारच्या युक्त्या-प्रयुक्त्या होत राहणार. आपली दिशा कोणती असावी, ही ठरविण्याची वेळ येऊन ठेपली आहे. याचा अर्थ आपण घर-संसार सोडून द्यावा असा होत नाही. मागे मुबंईमध्ये पन्नास पुरुषांनी एकत्र येऊन आपापल्या पत्नीच्या नावे पिंडदान केले. अशी बातमी वाचनात आली. संशय, आकांडतांडव, वर्चस्वाची अभिलाषा, मीच फक्त शहाणा किंवा शहाणी असे होऊ नये. स्त्रीहक्क मिळवणे म्हणजे संसाराची राखरांगोळी करणे, असेही नव्हे. तडजोडीतून सम्यक मार्ग निघू शकतो, यावर विश्वास हवा. परंपरेप्रमाणे स्त्री पुरुषाच्या घरी नांदायला येत असते म्हणजे त्याचे नातलग आपले मानलेच पाहिजेत. फक्त नवराच हवा, बाकी कोणी नको. ही मानसिकताही चूक आहे. पुरुषांनीही तडजोड स्वीकारली पाहिजे, याचा अर्थ बाहेरख्यालीपणा सोडून देऊन स्त्री म्हणजे फक्त उपभोग्य वस्तू न मानता तिचे माणूस म्हणून महत्त्व जाणले तरच समाजात एक निकोप वातावरण निर्माण होईल, अन्यतः हजारो वर्षापासून चालत आलेल्या परंपरांचा पाईक होण्याची पात्रता तर आपण कमावलेलीच आहे.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय अंबड जि. जालना येथे मराठी विषयाचे प्राध्यापक आहेत)**



अमोल पुसदकर
संपर्क क्र. 9552535813

# 'पीएफआय'ची पाळेमुळे

आधुनिक केसरी

**2047 पर्यंत भारताला गजवा ए हिंद (काफीरांशी युद्ध इस्लामिक राष्ट्र बनविण्याचे स्वप्न ती सर्वसामान्य मुस्लिम समाजातील लोकांना दाखवित होती. केंद्र सरकारचे यांच्या सर्वच हालचालीवर लक्ष होते. वेगवेगळ्या कृत्यांमध्ये यांचा सहभाग नोंदविला जात होता. आवश्यक ते पुरावे गोळा केले जात होते. आणि त्यानंतर सरते शेवटी देशभरामध्ये एन आय ए, इ डी व स्थानिक राज्यातील पोलीस यांच्या मदतीने छापे घातले गेले व शेकडो लोकांना अटक करण्यात आली. यावरून केंद्र सरकार सर्वसामान्य जनता आणि दहशतवादी यातला फरक ओळखते हे स्पष्ट झाले.**

सरते शेवटी मोदी सरकारनी पी एफ आय वर बंदी घातली. अगदी योजनाबद्ध पद्धतीने देशभरामध्ये छापे घातले गेले. ठिकठिकाणी पी एफ आय च्या नेत्यांची धरपकड झाली. उद्या पी एफ आय या बंदीला न्यायालयात आव्हान देऊ नये व दिले तर ही बंदी न्यायालयात सुद्धा टिकली पाहिजे यासाठी पर्याप्त मात्रेमध्ये पुरावे गोळा करण्यात आलेले आहे. एकंदरीतच सर्व कार्यक्रम ओके करण्यात आलेला आहे. आज जसे पी एफ आय चे नाव समोर येते आहे तसे एकेकाळी सिमी (स्टुडन्ट इस्लामिक मुव्हमेंट ऑफ इंडिया) चे नाव असेच घेतले जात होते. अगदी गाव पातळीपर्यंत सिमी चे जाळे विणले गेलेले होते. देशभरातील तरुणांना एकत्रित करणे त्यांना जीहादी बनविणे, त्यातल्या काही कट्टर लोकांना दहशतवादाकरता प्रेरित करणे व देशाची कायदा व सुव्यवस्था उध्वस्त करणे अशा पद्धतीचे काम सिमीचे होते. सिमीवर बंदी नंतर त्यातीलच काही सदस्य पुढे बाहेर पडले व त्यांनी 22 नोव्हेंबर 2006 रोजी पी एफ आय बनविली. कर्नाटक फोरम फोर डिग्निटी, मनीथा नीती पसराई व बंदी घातलेल्या सिमीचे हजारो कार्यकर्ते यामध्ये विलीन झाले. यामध्ये प्रामुख्याने आजच्या पी एफ आय चे नेते होते. ज्यामध्ये ओ एम ए सलाम जो की पी एफ आय चा अध्यक्ष आहे. 2020 पर्यंत हा केरळ सरकारच्या विद्युत विभागामध्ये कर्मचारी होता व पी एफ आय च्या स्थापनेपासूनच हा सहभागी आहे. अशाच प्रकारच्या विविध संघटनांमध्ये सुद्धा याने काम केलेले आहे. इ एम अब्दुल रहमान हा कोचीन सायन्स अँड टेक्नॉलॉजी युनिव्हर्सिटी मध्ये ग्रंथपाल होता. एकेकाळी सिमी चा अध्यक्ष सुद्धा हा राहिलेला आहे. पी एफ आय च्या स्थापनेपासून याचा त्यामध्ये सहभाग आहे. अब्दुल वाहिद सईत हा पी एफ आय चा राष्ट्रीय परिषद सदस्य आहे व बंगलोर मध्ये एक सॉफ्टवेअर कंपनी चालवितो. अनिस अहमद हा पी एफ आय चा राष्ट्रीय महासचिव आहे. बंगलोरच्या एरिकसन कंपनीत ग्लोबल टेक्निकल मॅनेजर होता. अबूबकर हा केरळ सिमी चा अध्यक्ष होता. एस डी पी आय इंडिया फाउंडेशन एन डी एफ या सर्व संस्थांचा हा संस्थापक अध्यक्ष राहिलेला आहे. थेजस नावाची एक पत्रिका निघते त्याचाही हा प्रबंध संपादक होता. ज्यावेळेस अमेरिकेने ओसामा बिन लादेनला ठार केले होते त्यावेळेस यास थेजस पत्रिकेने आपल्या पत्रिकेच्या मुखपृष्ठावर ओसामा बिन लादेनचा फोटो छापला होता व अल्लाच्या मार्गावर चालणारा बंदा अशा पद्धतीचे त्याचे वर्णन केलेले होते. जणू काही दहशतवादाचाच मार्ग ओसामाला सांगितलेला होता. यावरून यांची विचारधारा स्पष्ट होते. पी कोया हा सिमी चा सक्रिय कार्यकर्ता होता. कोझिकोड विश्वविद्यालयात लेक्चरर होता. पी एफ आय चा स्थापनेपासून चा तो सदस्य आहे.

हे सर्वच उच्चशिक्षित आहेत. आर्थिक परिस्थिती सुद्धा चांगली आहे. आणि सर्वच सुरुवातीपासून फुटीरतावादी मानसिकतेचे आहे. कट्टरवाद हा अशिक्षित व सुशिक्षित गरीब व श्रीमंत या दोन्ही प्रकारच्या लोकांमध्ये आहे हे आपल्या यावरून लक्षात येईल. देशातील सर्वसामान्य अल्पसंख्य समाजाच्या लोकांना एकत्र आणणे, त्यांची माथी भडकविणे अशा पद्धतीचे काम हे लोक करत आलेले आहेत. यांची पाळेमुळे दुबईमध्ये सुद्धा खूप खोलवर गेलेली आहेत. दुबई आणि आखाती देशांमध्ये दक्षिण भारतातून मोठ्या प्रमाणावर लोक काम करण्यासाठी जातात. त्यांच्याशी संपर्क साधून तुम्ही आखाती देशांमध्ये लठ्ठपगाराची नोकरी करा. परंतु आम्हाला भारतात फुटीरतावादी कारवाया करण्यासाठी आर्थिक मदत करा. त्यामुळेच वेगवेगळ्या खात्यातून पीएफआयच्या खात्यामध्ये 120 कोटी रुपये जमा झालेले होते. या पैशांचा उपयोग भारतामध्ये बॉम्बस्फोट करणे, धर्मांतरण, टारगेट किलिंग, दंगे भडकविणे यासाठी केला जात होता. हिजाबच्या मुद्द्याला संपूर्ण देशभर पसरविण्याचे काम पीएफ आय ने केलेले




आहे. पीएफआय ने हिजाबच्या प्रश्नाला देशभरामध्ये मुस्लिमांसाठी जीवन मरणाचा प्रश्न अशा पद्धतीच्या स्वरूपात रंगविले. नुपूर शर्मा यांच्या वादग्रस्त विधानांना संपूर्ण देशभरामध्ये पसरवून त्याद्वारे देश पेटविण्याचे काम सुद्धा पीएफआय ने केलेले होते. सर तन से जुदा अशा पद्धतीची धमकी देणारे लोक तयार करणे, त्यांना हिंसक बनविणे हे काम पीएफआय ने केलेले होते. नुपूर शर्मा च्या वादग्रस्त विधानानंतर देशभरामध्ये जो आगडोंब उसळला मोठमोठ्या संख्येचे जे मोर्चे काढण्यात आले, जे दंगे पेटविले गेले, त्यामागे पी एफ आय चा हात होता. 370 कलम रद्द केल्यानंतर देशांमध्ये अशाच पद्धतीचा प्रयत्न पी एफ आय च्या लोकांनी करून बघितला. सी ए ए कायद्याच्या अंमलबजावणीनंतर देशभरामध्ये जे विरोध प्रदर्शन झाले त्यांना सुद्धा हिंसक बनवण्याचे काम पीएफआय ने केले. ठिकठिकाणी निघणाऱ्या मोर्चांना मोठ्या संख्येमध्ये लोकांना आणणे, त्यांच्या येण्या-जाण्याचा खर्च करणे यासाठी पी एफ आय आपल्या जवळचा निधी खर्च करीत होती.2047 पर्यंत भारताला गजवा ए हिंद (काफीरांशी युद्ध इस्लामिक राष्ट्र बनविण्याचे स्वप्न ती सर्वसामान्य मुस्लिम समाजातील लोकांना दाखवित होती. केंद्र सरकारचे यांच्या सर्वच हालचालीवर लक्ष होते. वेगवेगळ्या कृत्यांमध्ये यांचा सहभाग नोंदविला जात होता. आवश्यक ते पुरावे गोळा केले जात होते. आणि त्यानंतर सरते शेवटी देशभरामध्ये एन आय ए, इ डी व स्थानिक राज्यातील पोलीस यांच्या मदतीने छापे घातले गेले व शेकडो लोकांना अटक करण्यात आली. यावरून केंद्र सरकार सर्वसामान्य जनता आणि दहशतवादी यातला फरक ओळखते हे स्पष्ट झाले. सरकार कोणालाही अल्पसंख्यक किंवा बहुसंख्य समजत नाही. सरकारसाठी सगळेच 130 कोटी लोक नागरिक आहेत. परंतु त्यातील काही जर पाकिस्तान जिंदाबाद च्या घोषणा देत असतील तर त्यांना त्यांची जागा ही तुरुंगात आहे हे सांगावे लागेल. दहशतवाद्यांचे तुरुंगामध्ये बिर्याणी खाण्याचे दिवस आता संपले आहे. देश विरोधी कारवाया करणाऱ्यांना त्यांची जागा दाखविली जाईल. हेच पी एफ आय वरील बंदीने केंद्र सरकारने स्पष्ट केलेले आहे. जनतेने सुद्धा जागृत राहणे आवश्यक आहे. कारण पी एफ आय चे हे लोक काही चंद्रावरून आलेले नव्हते. तर हेच तुमच्या आमच्या सारख्या लोकांच्या सोबतच राहत होते, नोकरी करत होते, व्यवसाय करत होते, व समाज माध्यमांवर आपल्या प्रतिक्रिया नोंदवीत होते. परंतु अशांच्या हालचालींवरून अशांच्या विचारांवरून आम्हाला या लोकांना ओळखता आले पाहिजे. धर्माच्या आधारावर भारताचे दोन तुकडे करण्यात आले व त्यातून पाकिस्तानचा जन्म झाला. पाकिस्तान हे इस्लामी राष्ट्र आहे. तरीही तेथील मशिदीमध्ये दहशतवादी बॉम्बस्फोट करतात. तेथे सुद्धा मुस्लिम समुदायांमध्ये भांडणे आहेत ते लोक सुद्धा एकत्र नीट राहू शकत नाही. अफगाणिस्तान हा मुस्लिम देश आहे परंतु तेथेही मशिदीमध्ये बॉम्बस्फोट घडवून निरपराध नागरिकांना मारले जाते. मरणारे पण मुस्लिम आहेत व मारणारे पण मुस्लिम आहेत.यावरून सर्वसामान्य अल्पसंख्य समाजातील लोकांनी हे समजले पाहिजे की गजवा हे हिंद हे थोतांड आहे. असे असते तर मुस्लिम राष्ट्रांमध्ये शांतता असायला हवी होती. सर्वच मुस्लिम समाजाचे लोक प्रेमाने एकत्र नांदायला हवे होते. परंतु असे होताना दिसत नाही. त्यापेक्षा अधिक शांतता आणि सुरक्षा हिंदुस्थानात आहे. एका संघटनेवर बंदी घातल्याने काही होणार नाही असे म्हटले जाते. कारण एक संघटना समाप्त केली तर दुसरी उभी राहते आणि म्हणूनच पी एफ आय ची पाळेमुळे उपटून टाकण्यापेक्षाही दहशतवादाची पाळेमुळे उपटून टाकणे केव्हाही श्रेयस्कर ठरेल.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड

# अशोक चव्हाणांची राजकीय गुगली ?

आधुनिक केसरी

**क्रिकेट व राजकारण हे सारखेच आहे.या दोन्हीत काहीही घडू शकते.तसे भारतीय राजकारणात बिहार,महाराष्ट्राच्या राजकारणाचे उदाहरण देता येईल.बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी तर अनेकवेळा पलटी मारून राजकारणाचे समीकरण बदलले आहे.त्याप्रमाणे महाराष्ट्रातही कधी भाजपा- राष्ट्रवादी, काँग्रेस,राष्ट्रवादी काँग्रेस,शिवसेना आणि आता भाजपा व शिवसेना शिंदे गट सत्तेसाठी एकत्र आले आहेत.मनसे नेते राज ठाकरे यांचे म्हणणे ,राजकीय नेते जनतेच्या मतांची प्रतारणा करत आहेत.राजकीय नेत्यांनी मतदारांना गृहीतच धरलेले आहे.गुगली चेंडूने 'दांडी' उडण्याची भीती असते. राजकारणातही राजकीय गुगली टाकणे,हे फायद्याचे अथवा अडचणीचे ठरू शकते.नांदेडचे काँग्रेसचे नेते अशोक चव्हाण भाजपामध्ये जाणार चर्चा होती.ती 'फेक न्यूज'च होती.कारण ते नांदेड काँग्रेसचे वैभव सोडून भाजपात जाणार नाहीत,असे मी स्पष्टपणे लिहिलेले होते.पण"फेकन्युज'चा काँग्रेस श्रेष्ठींवर दवाब आणण्यासाठी वापर निश्चित झाला असणार !**

महाराष्ट्रात २०१४ मध्ये भाजपा -सेनेची युतीची सत्ता असताना नेते शिंदे हे भाजपाशी नाते तोडून काँग्रेसबरोबर आघाडी करण्यासाठी आपल्याला भेटले होते,असा दावा त्यांनी केला. या कृतीला उशीरा सूचलेले शहाणपण म्हंटले जाते! ?त्यांच्या विधानात तथ्य व विश्वासार्हता आहे काय ? शिंदे यांचेच नाव का घेतले?त्यांच्या आधारहिन विधानाला गौप्यस्फोट म्हणावयाचे का?! त्यांचे विधान म्हणजे वॉटरगेट प्रकरण आहे का? त्यामुळे राज्यातील भाजपा- शिंदे सरकार कोसळणार आहे ?याचे उत्तर मिळणार नाही.अमेरिकेत १८ जून १९७२ चे वॉटरगेट प्रकरण घडले! त्या आदल्या दिवशी वॉशिग्टनमधील वॉटरगेट कॉम्प्लेक्समधील सत्ताधारी डेमोक्रॅटिक नॅशनल कमेटीच्या (DNC) दरोडा पडला होता.त्यातील एका आरोपी सी.आय. ए. संस्थेचा माजी कर्मचारी असल्याचे न्यायालयात सांगितले. तोच धागा पकडून पत्रकार बॉब वूडवर्डस याने वृत्तमालिका लिहिली. त्याने हा दरोडा नसून देशाच्या आत्म्यावर हल्ला आहे.यात राष्ट्रध्यक्ष व त्यांचे सहकारी माहिती लपवित असल्याचेशोधपत्रकारिता करताना स्पष्ट केले होते.यातून राष्ट्राध्यक्ष रिचर्ड एम. निक्सन यांना अखेर राजीनामा द्यावा लागला.
२०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी काँग्रेसने नेते राहूल गांधी यांनी लष्कारातील लढावू राफेल विमान खरेदीत मोदी सरकारने करोडोंचा भ्रष्टाचार केला,असा आरोप केला होता.तेंव्हा पुन्हा मोदी सरकार सत्तेत येणार नाही,असे त्यांना वाटले होते. पण २०१९ मध्ये मोदी पुन्हा सत्तेत आले. तेंव्हा नांदेड काँग्रेस पक्षाने राफेल प्रतिकृतीसह भव्य रॅली काढली होती.काँग्रेस' राफेल 'च्या भ्रष्टाचाराचे पुरावे देऊ शकले नाही,त्यानंतर राफेल भ्रष्टाचाराची हवाच गेली.त्यानंतर भारतातही पॅगसेस प्रकरण हे वॉटरगेट प्रमाणे आहे,असे ज्येष्ठ विधिज्ञ प्रशांत भूषण यांना वाटले! पॅगसेस स्वायवेअरच्या माध्यमातून देशातील तीनशे अधिक विरोधी पक्षाचे नेते,तसेच वरिष्ठ अधिकारी,संवैधानिक संस्था,पत्रकारांच्या मोबाईलवर पाळत ठेवली जात आहे,असा मोदी सरकावर काँग्रेसने आरोप केला. यावरून संसदेत काँग्रेसने गोंधळ घातला गेला.नंतर हे प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले पण तेथे टिकले नाही. काँग्रेसचा हाही बार फूसका निघाला.अमेरिकेत अश्या वृत्ताला फेकन्यूज म्हंटले गेले. २०१६ मध्ये राष्ट्राध्यक्षपदाच्या निवडणुकीत खोटे वृत्त सर्रासपणे दिले जात होते,तेंव्हा डोनाल्ड ट्रम्प या वृत्ताला फेक न्यूज' संबोधले होते.तेंव्हा पासून हा शब्द प्रचलिच झालेला आहे.भारतात नेते राजकारणासाठी फेकन्यूज वापर करत आहेत. यासाठी ते क्लृत्या शोधत असतात. महाराष्ट्रात अश्या "फेकन्यूज'चे पेव फुटले आहे.त्याला राजकीय थाप म्हणता येईल.असे नेते नेहमी 'मी योग्य वेळ आली तर सांगेन'असे म्हणत असतात. यामागे विरोधी गटात संभ्रम निर्माण करणे, हाच त्यांचा उद्देश असतो.राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांनी भाजपाशी फारकत घेतांना 'भाजपाकडे "इडी' आहे तर माझ्याकडे सीडी आहे,असे म्हंटले होते! पुढे इडीने त्यांचेवर कारवाई केली पण त्यांनी 'सीडी' बाहेर काढलीच नाही. भाजपा नेते फडणवीस यांनी आपणाकडे राष्ट्रवादीचे नेते अजित पवार यांच्या विरोधात भ्रष्टाचाराचे गाडीभर पुरावे आहेत,असे म्हंटले होते,पण ते गाडीभर काय एकही पुरावा आजपर्यंत देऊ शकलेले नाहीत.राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचे दाऊदशी सबंध असल्याचा आरोप झाला. पवारांवर भ्रष्टाचाराचेही आरोप झाले,पण विरोधक त्यांचेवरीलएकही आरोप आजपर्यंत सिध्द शकलेला नाही.हा कोट्यवधीची संपत्ती व विविध कारनामे करून सुध्दा राजकीय पहिलवान प्रत्येक आरोपातून मात्र सहीसल्लामत सुटतो! याचे नवल वाटते!आता शिंदे सरकारला 'पन्नास खोके सर्वच ओके' असे टोमणे मारले जात आहेत ! मग शंभर कोटीचे खोके कोणाला मिळणार होते?राज्याचे दोन मंत्री,शिवसेनेचे एक नेता भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली जेलमध्ये जातो तरी 'त्यांना महाराष्ट्राचा अपमान' वाटत नाही! राजकारणात कोणीही धुतल्या तांदळासारखा नाही.महाराष्ट्रातील शिंदे सरकार हे सामन्यांचे म्हंटले जात असले तरी ते टक्केवारी देणारे सरकार आहे,अशी टीका होत आहे.महाराष्ट्रात अनेक घडामोडी घडल्यानंतर चव्हाण यांना अचानक जाग कशी काय आली! त्यांनी राजकीय गुगली टाकणारे वक्तव्य केले. त्याचे हे वक्तव्य म्हणजे 'शिळ्या कढीला ऊत आणण्याचा'च प्रकार आहे.
महाराष्ट्रात २०१४ पर्यंत काँग्रेस व राष्ट्रवादीची सत्ता होती.मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण होते. त्यानंतर राज्यात ३२ दिवस राष्ट्रपती राजवट होती. त्यानंतर २०१४ विधानसभा निवडणूक झाली.या निवडणुकीत काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने वेगळी चूल मांडून स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. तर भाजपा व शिवसेनेत जागा वाटपात एकमत न झाल्याने युती संपुष्टात आली.तेंव्हा भाजपा व शिवसेनेनेही स्वतंत्रपणे निवडणूक लढविली. म्हणजे चारही पक्षाने स्वतंत्रपणे निवडणूका लढविल्या होत्या.तरीही भाजपाने या निवडणुकीत सर्वाधिक १२२, शिवसेना ६३,काँग्रेस- ४२,





राष्ट्रवादी काँग्रेस ४१ व मनसे १ जागेवर विजय मिळविला. इतकेच नव्हे मराठवाड्यात भाजपाने १५,सेना-११, काँग्रेस-९ राकाँ.-८ जागा विजय मिळविला होता.२०१४ प्रदेश काँग्रेसचे अध्यक्ष माणिकराव ठाकरे हे होते,चव्हाण नव्हते! ते २०१५ मध्ये त्याच्यांकडे काँग्रेस पक्षाचे प्रदेश अध्यक्षपद आले. २०१४ मध्ये भाजपाने सत्ता स्थापनेचा दावा दाखल केला होता.त्यावेळी भाजपा नेते देवेंद्र फडणवीस सरकारला विश्वासदर्शक ठराव मंजूर करावयाचा होता.तेंव्हा शिवसेना रूसून बसली होती.तेंव्हा फडणवीस सरकार अडचणीत येणार असल्याचे लक्षात येताच,राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार मदतीला धावले.त्यांनी महाराष्ट्राला आताच मध्यावधी निवडणूक परवडणारी नाही,असे म्हणत विधान सभेत पक्षाने तटस्थ भूमिका घेतली.त्यामुळेच भाजपाचे सरकार स्थिर होवू शकले. पवारांच्या मनात आले असते तर राज्यात सत्तेची गणित जुळले असते. कारण शिवसेना -६३,काँग्रेस-४२ राकाँ-४१ यांची एकूण संख्या १४६ होते.विधानसभेचे एकूण संख्याबळ २८८ आहे,तेंव्हा बहुमतासाठी १४५ संख्याबळ पुरेसे होते.त्यात वीस इतर पक्षाचे आमदार होते. त्यांच्या मदतीने पवारांना राज्यात सत्ता स्थापन करणे सोपे होते.तसा पवारांना १९७८ मधील पुलोद सरकार स्थापन करण्याचा दांडगा अनुभव होता. तेंव्हाच शिवसेनेचा मुख्यमंत्री झाला असता! हा फार्मुला त्यांनी २०१४ वापरता नसता काय?पण तेंव्हा पवार 'समविचारी'तत्वाची माळ जपत होते. तेंव्हा पवारांना शिवसेना सोबत नकोच होती,तेही वृत्त आलेले आहे. आता तर राज्यात पवार फिरले की,सत्ता येते,म्हणे! पण हेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार हे १९७५ पासून राज्यात स्वबळावर सत्ता आणू शकलेले नाहीत.इतर राज्यातील त्यांच्यापेक्षा ज्युनिअर नेत्यांनी आपल्या राज्यात स्वतःच्या पक्षाच्या बळावर सत्ता मिळविली.राज्यात एक वर्ग असो की,पवार राजकारणात कशी खेळी करोत, त्यांचे कौतूक करत असतो.असो.
राज्यात युती सरकार स्थापन झाल्यानंतर काँग्रेस नेते चव्हाण यांना शिवसेनेचे शिष्टमंडळ केंव्हा भेटले? यातही 'मै तारीख और समय नही बाताऊँगा' याचे रहस्य दडलेले आहे!राज्यात भाजपा व शिंदे शिवसेना हे सत्तेत आल्यानंतरच त्यांचा आतला आवाज बाहेर कसा काय उफळून आला? युतीची सत्ता होती, तेंव्हा शिंदे यांचे शिवसेनेत काय स्थान होते?त्यावेळी शिवसेनेचे सर्व निर्णय पक्षाचे प्रमुख उध्दव ठाकरे घेत असत,हे सर्वश्रुत आहे.मग ते ठाकरे यांचे आदेशानुसार शिंदे त्यांना भेटावयाला आले होते का? या शिष्टमंडळात शिंदे एकटेच होते का?मग इतर नेत्यांची नावे मात्र गुलदस्त्यात का ठेवली गेली?राज्यातील सत्तेचे समीकरण बदल्यानंतर काँग्रेस शिवसेनेचे ठाकरे जवळचे,मित्र वाटू लागले आहेत. राज्यात काँग्रेस व शिवसेना राष्ट्रवादीची युती नवीन नाही. शिवसेनेचा इतिहास पहिला तर सेनेने विविध राजकीय पक्षांशी २२ वेळा दोस्ती केलेली आहे.यात काँग्रेस,मुस्लिम लिग,राष्ट्रवादी काँग्रेस,दलित पँथर, रि.प. पक्ष गवई व आठवले गट बरोबर राजकीय पक्ष आहेत.त्यानंतर १९८२ सेनाप्रमुख बाळासाहेब यांनी काँग्रेसशी मैत्री तोडली व भ्रष्टाचारी काँग्रेसला जाळण्याची प्रतिज्ञा केली.१९९५ मध्ये हिंदुत्वाच्या मुद्दावर भाजपा व सेनेत युती झाली. २०१९ मध्ये पुन्हा शिवसेना व काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेस बरोबर सत्तेत आली. तेंव्हा यात नवल असे काहीच नाही.आता शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे हे भाजपासोबत गेल्याने काँग्रेसच्या पोटात दुखायला लागले आहे. काँग्रेस शिंदे यांना टार्गेट करावयाचे आहेअसे दिसते.यात शिंदे यांचेवर शिवसेना पक्ष निष्ठेवरच प्रश्न चिन्ह निर्माण करण्यात आले आहे.
चव्हाणांच्या या विधानाला त्यांचेच पूर्वीचे विश्वासू सहकारी शिंदे सरकारमधील मंत्री अब्दुल सत्तार यांनी उत्तर दिले आहे.तसेच भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी चव्हाण हे आमचे मित्र आहेत,आम्ही त्यांची क्लिपच जाहीर केली तर अडचणीत येतील,अश्या शब्दात प्रतिउत्तर दिले आहे.मुख्यमंत्री शिंदे हे काय उत्तर देतात! हे पहावे लागेल!यात शिवसेना ठाकरे गटाचे नेते विनायक राऊत व चंद्रकांत खैरे यांनी चव्हाण जे बोलले ते सत्य आहे,असे म्हणाले.त्यांनी चव्हाणांच्या वक्तव्याचे समर्थन केले आहे.पण हे 'उदंराला मांजराची साक्ष' देण्यासारखेच आहे.
चव्हाण यांच्या नवीन माहितीवरून २०१४ पासूनच उध्दव ठाकरे हे भाजपा धोका देण्यासाठी तेल लावून बसले होते की काय? मग २०१९ च्या महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीनंतर शहा- ठाकरे यांच्यात बंद खोलीत जे घडले ते नाटक होते कि काय? काँग्रेस या निमित्ताने शिवसेनेवर विश्वासघातकीपणाचा शिक्का मारत आहे,हे ठाकरे सेनेला अपमानकारक वाटत नाही!याचे आश्चर्य वाटते! काँग्रेसने नथीतून तीर मारल आहे,हेच शिवसेना नेत्यांना समजलेले नाही!सत्तेची संधी आली की ती सोडावयाची नसते,म्हणून राज्यात महाविकास आघाडीचे खरे चाणक्य म्हणून पवार व सेनेचे संजय राऊत यांचे नाव घेतले जायचे!मग काँग्रेस नेते चव्हाणांनी सत्तेची आलेली संधी का सोडली ? राजकीय नेतृत्वात चाणक्य नीती,धूर्तपणा, चाणाक्षपणा!संधीसाधूपणा हे गुण असावेच लागतात,त्यांच्यात ही उणीव असावी ! काँग्रेसकडे आघाडीबाबतचे निर्णय घेण्याची क्षमताच नाही ? म्हणून की काय?चव्हाणांनी शिंदे यांना शरद पवारांना भेटावयाचे सांगितले!त्याच्या वक्तव्यातून अनेक प्रश्न उभे राहत आहेत.
चव्हाणांनी हे वक्तव्य जाणीवपूर्वक पेरले आहे,यातून ते राजकारणात पुन्हा चर्चेत आले,हे खरे! पण त्यांचे हस्से झाले,हे लक्षात येत नाही. काँग्रेस ज्येष्ठ नेते व राजस्थानचे मुख्यमंत्री गहिलोत यांना राजकारणातील जादूगार म्हंटले जायचे! त्यांनी "जादूचा प्रयोग' काँग्रेस श्रेष्ठींवर केला. यात त्यांची 'तेलही गेल तूपही गेले, हाती धुपटणे आले. अशी अवस्था झाली आहे. तेंव्हा राजकारणात कोणाला दुबळा समजता कामा नये. जर विरोधकाने अशी राजकीय गुगली टाकली मग अडचण होते! हे लक्षात घ्यावे!



लक्ष्मण जगताप
बारामती

# अहिंसेचे प्रतीक : गांधीजी

आधुनिक केसरी

**महात्मा गांधी अर्थात मोहनदास करमचंद गांधी हे नाव भारतापुरते मर्यादित न राहता जगाच्या कानाकोप-यात पोहचले. ते दया ,क्षमा ,शांती, सेवा, अहिंसा आणि परोपकार या सर्वोच्च मानवी मूल्यांची शिकवण देणारे जागतिक कीर्तीचे एक महान विचारवंत म्हणून. २ आँक्टोबर हा त्यांचा जन्मदिन.या निमित्ताने बापूंच्या विचारांना आणि स्मृतींना उजाळा देऊयात.**

अखिल मानव जातीच्या कल्याणासाठी बापूंनी आपले आयुष्य समर्पित केले.भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील एक प्रभावी व्यक्तिमत्त्व म्हणून इतिहासाने बापूंची नोंद घेतली आहे. ब्रिटिशांच्या अन्याय अत्याचाराविरुद्ध त्यांनी अहिंसा आणि सत्याग्रह या मार्गाचा अवलंब केला.भारतीय जनमत संघटित करुन सामान्य माणसांचा लढा उभारला.
बापूंच्या आयुष्यात अशा अनेक घटना आणि प्रसंग घडले ज्यांनी बापूंच्या मनावर खोलवर परिणाम झाला.अशाच एका प्रसंगातून बापूंचा प्रामाणिकपणा आपणांस पहावयास मिळतो. लहानपणी एका भावाला कर्जातून सोडविण्यासाठी दुसऱ्या भावाच्या कड्यातून सोन्याच्या तुकड्याची चोरी छोट्या मोहनदासने केली अवश्य.पण नंतर त्याला आपली चूक समजली.मोहनदासला चैन पडेना. काय करावे ते समजेना.बराच वेळ विचार केल्यावर मोहनदासने आपल्या वडीलांना एक पत्र लिहिले. त्यात त्यांनी चोरी केल्याचे कबूल केले.आणि पुन्हा चोरी करणार नाही असे वचन दिले आणि पुढे असेही लिहिले की वडीलांनी कितीही कडक शिक्षा दिली तरी वाईट वाटून घेणार नाही व ती शिक्षा आनंदाने सहन करेल. मोहनदास अर्थात गांधीजी यांचे वडील आजारी असल्याने अंथरुणात झोपून असत.गांधीजी आपल्या वडीलांकडे पत्र घेऊन गेले.त्यांच्या हातात पत्र ठेवले.आणि त्यांच्या जवळच पलंगावर गुपचूप बसले.गांधीजींचे वडील उठून बसले आणि त्यांनी ते पत्र वाचले.पत्र वाचताना त्यांच्या डोळ्यातून अश्रू वाहू लागले. त्या अश्रूंचा असा परिणाम झाला की त्यांचे जीवन बदलले.मोहनदास पूर्वीपेक्षा कितीतरी चांगला मुलगा झाला. आपल्या मुलाचे धैर्य आणि खरेपणा पाहून गांधीजींच्या वडीलांचे हदय भरुन आले.त्यांनी गांधीजींनी न मारताच स्वतः दुःखी होऊन मोहनदासवर जो परिणाम घडवून आणला तो मारुन घडला नसता. मारापेक्षा प्रेमाचा मोहनदासवर खोल परिणाम झाला.प्रसंग साधा आणि छोटा परंतु गांधीजींच्या जीवनाला कलाटणी आणि वळण देणारा ठरला. गांधीजींच्या जीवनातील हा अहिंसेचा पहिला धडा होता. मोठे झाल्यावर याच अहिसेंच्या जोरावर त्यांनी इंग्रजांशी न लढताच त्यांना आपल्या देशातून जायला भाग पाडले. गांधीजींचे काम, त्यांचा खरेपणा, प्रामाणिकपणा आणि त्याग पाहून रवींद्रनाथ टागोरांनी ्यांना महात्मा म्हणायला सुरूवात केली. नंतर सगळा देश त्यांना महात्मा या नावानेच ओळखू लागला. स्वच्छता, स्वावलंबन आणि सेवा ही मूल्ये स्वतःच्या जीवनात आचरणात आणून बापूंनी लोकांना सदवर्तनाचा धडा दिला.माणूस गरीब असो वा श्रीमंत त्याचा माणूस म्हणून सन्मान झाला पाहिजे यासाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केले. देशसेवा करत असताना गोरगरीब जनतेच्या हिताला प्राधान्य दिले. त्यांनी भारतीयांच्या मनात द्वेषाऐवजी प्रेमाची ज्योत पेटवली म्हणूनच शांती आणि अहिंसेचे प्रतीक असणारे गांधीजी सगळ्या जगाला हवेहवेसे वाटतात.



# अंध लक्ष्मणासाठी वंदना झाली आधुनिक गांधारी

प्रा. मारोती बुद्रुक पाटील
संपर्क क्र. 9146411111

आधुनिक केसरी

**आज हजारो पिढ्यांना घडविणारा लक्ष्मण एक आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपतीच्या हस्ते त्यांचा गौरवी झाला असता एवढा चाणक्य बुद्धिमान परंतु नियतीचे दशावतार त्याच्या पाठीमागे त्याचा पिछा सोडत नव्हते. एके दिवशी विभागीय समाज कल्याण अधिकारी अरुण बोगींलवार यांची आणि लक्ष्मण ची भेट झाली त्या काळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी1987 एक जीआर काढला होता.त्यात लिहिले होते प्रत्येक जिल्ह्यातून पाच अंधाना शासकीय सेवेत सामावून घ्या असा तो जी आर होता तो जी आर घेऊन 1989 ला लातूर जिल्ह्याचे कलेक्टर उमेशचंद्र सारंगे हे होते त्यांना जी आर दाखविल्यानंतर त्यांनी एमएसबी जिल्हा परिषद नगर परिषद या ठिकाणी सूचना दिल्या. त्यावेळी अचानक कलेक्टर साहेबांची बदली झाली काही दिवसात लातूर जिल्ह्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर गोविंद गारे हे कलेक्टर झाले त्यावेळी त्यांची भेट झाल्यावर त्यांनी मात्र एम्प्लॉयमेंट ऑफिस कडे अंध व्यक्तींची यादी मागितल्यावर लातूर जिल्ह्यातील 42 अंध व्यक्ती मिळाले.**

मानसं खूप स्वार्थी झालीत इतरांच्या सुखाच आणि दुःखाच कुणालाही काही वाटत नाही असे जरी आज वाटत असले तरी निरांजनातील वातीसारखं कुणीतरी दुसऱ्यासाठी जळत असतो. ती वात स्वतः जळते. इतरांना प्रकाश देते. त्यागाला मूल्य नाही. सामान्य माणसं स्वतःच्या शिंपल्यात राहत असतात त्यामुळे त्याग त्यांच्यापासून दूर असतो. परंतु वंदनाने लक्ष्मणाला जीवनसाथी बनवून त्याची तीच डोळे झाली त्याला जीवनसाथी स्विकारून ती आधुनिक गांधारी झाली तिने केलेला त्याग आजच्या आधुनिक महिलांसाठी आदर्श होत आहे. स्वतःला चंदनासारखं झिजवून त्यांचे आयुष्य सुगंधित केले त्याच्यासाठी ती काठी झाली आणि आयुष्यभराचा जीवनसाथी बनवून स्वतःच्या पोटच्या पोरासारखेच सांभाळले.

सत्य,अहिंसा, परोपकार,जीवनातील शिस्त सांभाळून केलेला त्याग स्पृहणीय असतो.नरिपेक्ष भावनेने केलेला त्याग त्या व्यक्तीला प्रगतिपथावर नेतो.स्वार्थ आणि त्याग एकत्र राहू शकत नाही.स्वार्थाचा त्याग केला की व्यक्तिमत्त्वाला झळाळी येते एखाद्याच्या आयुष्यामध्ये स्वतःला संपूर्ण झोकून देऊन स्वतःच्या अशा अपेक्षा होळी करून दुसऱ्यासाठी जगणं हे प्रत्येकाला शक्य नसतं परंतु काही माणसं धरतीसारखी उदार चंदनासारखी शितल आकाशाएवढी विशाल आणि सागरासारखी अथांग असतात अशा माणसात कदाचित ईश्वरच अस्तित्वच असतं की काय खरंच करता करविता तोचि आहे रंजल्या गांजल्या जीवाचा तोचि खरा संत तुझी खरा साधू अर्थ तोफ वंदनाच्या रूपानेच लक्ष्मण यांना मिळाला असेल

लातूर जिल्ह्यातील चाकूर तालुक्यात रोहिना (अंबिका) या गावी आई जिजाबाई व वडील कोंडीबा यांच्या उदरी 20 सप्टेंबर 1962 रोजी लक्ष्मण कोंडीबा कांबळे यांचा जन्म झाला. आई-वडील शेत शिवारात मजूरदार होते. दोन एकर गायरान मिळालेली जमीन त्या जमिनीवर हाडाचा मनी आणि रक्ताचं पाणी करायचे, रक्ताचे सडे शिंपल्याशिवाय तेथे ही काहीच पिकत नव्हते अशा या डोंगराळ जमिनीवर पोटाची खळगी भरणे अवघड होते याच्यावर पोट पाणी भागत नसल्याने त्यांना दुसऱ्याच्या शेतावरच मजुरी करावी लागे. आपल्याला झालेले कष्ट आपल्या लेकरांना होऊ नये म्हणून आई जिजाबाई आणि वडील कोंडीबा रात्रीचा दिवस करून लेकरांना शिकू लागले. बाळाचे पाय पाळण्यात दिसतात म्हणतात तेच लक्ष्मणाच्या बाबतीत खरे ठरले अगदी बालवाडी पासून शिकत असताना प्रत्येक वर्गात तो प्रथम येऊ लागला आणि प्रत्येक शाळेत शिक्षकांचा तो लाडका विद्यार्थी झाला.

कुटुंबामध्ये लक्ष्मण याचे बंधू अभंग कोंडीबा कांबळे यांनी मध्येच शिक्षण सोडून दिले.बहीण धोंडूबाई दयानंद आचार्य पानगांव याही मोल मजुरी करून संसारात आई-वडिलांना हातभार लावत असत लक्ष्मण बालवयातच खूप हुशार असल्याने तो शिकला पाहिजे म्हणून आई-वडील खूप त्याच्यासाठी कष्ट करीत असत. लक्ष्मण यांचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद रोहीना व माध्यमिक शिक्षण शिवाजी विद्यालय रोहिना आणि उच्च शिक्षण शिवाजी महाविद्यालय उदगीर येथे झाले 1981 मध्ये बारावीची परीक्षा दिल्यावर उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये गावाकडे गेल्यावर जे विपरीत घडले ते कोणाच्याही नशिबात घडू नये सुट्ट्या लागल्या की मुले मामाच्या गावी जातात आनंदाने मौज मस्ती करतात परंतु लक्ष्मणच्या आयुष्यामध्ये घरात कष्ट केल्याशिवाय हाता तोंडाची गाठ पडत नव्हती म्हणून लक्ष्मण गावातील विहिरीवर दगड उपसण्यासाठी गेले असताना त्या विहिरीतील पाषाण फोडण्यासाठी ब्लास्टिंग करण्यात आले चार बार पैकी तीनच बार फुटले आणि एक फुटला नसल्याने बऱ्याच वेळानंतर आता फुटणार नाही म्हणून विहिरीतील सामान आणण्यासाठी लक्ष्मण आणि त्यांचे सहकारी गेले खाली गेल्यावर अचानक बार फुटला आणि लक्ष्मणचा चेहरा होत्याचा नव्हता होऊन गेला.डोळ्याला प्रचंड मार लागल्याने वाळूच्या कणाने त्यांचा चेहरा छिन्नविछिन्न झाला.विहिरीवरून बैलगाडी मध्ये त्यांना उदगीरला डॉक्टर बाहेती यांच्याकडे दाखल करण्यात आले.डोळ्याचा नाजूक भाग असल्याने टेम्पो मधून आंबेजोगाईच्या दवाखान्यामध्ये ऍडमिट करण्यात आले सात दिवस उलटल्यानंतर डॉक्टरांनी ऑपरेशन करण्यास सांगितले ऑपरेशन पूर्वी लक्ष्मणाला दिवस आहे का रात्र आहे हे थोडंसं जवळ-जवळ दिसायचे परंतु ऑपरेशन झाल्यानंतर लक्ष्मणाला या सृष्टीचे सौंदर्य कायमचं मुकलं होतं आता आयुष्यात अंधाराशिवाय काही नव्हतं आयुष्यभर कसं जगायचं काय व्हायचं या विचाराच्या वादळाने लक्ष्मणाच्या पायाखालची जमीन सरकत गेली आई वडील बेचैन झाले. आईच्या डोळ्यातील आसवांनी वाट मोकळी केली गंगा जमुना सरस्वती डोळ्यातून वाहून गेल्या वडील खूप खचले त्यांच्या जीवनाचा खरा आधार मोडकळी झाला असे वाटू लागले हुशार असणाऱ्या लेकराला हे असे कसे घडले त्यांना रात्रंदिवस झोप येईना.

असं म्हणतात ना कोशिश करने वालों की कभी हार नही होती लहरों से डरकर नौका कभी पार नही होती मंजिल उन्ही को मिलती जिनके सपनों मे जान होती है पंखो से कुछ नही होता होंसलो मे उडान होती है या काव्यपंक्तीप्रमाणे लक्ष्मण हरला नाही. डगमगला नाही तेवढ्या जिद्दीने पेटून उठला आणि 1985 ला लक्ष्मणने समाज सुधारक बाबा आमटे यांच्या महारोगी सेवा समिती द्वारा संचलित अपंग प्रशिक्षण व पुनर्वसन केंद्र आनंदवन तालुका वरोरा जिल्हा चंद्रपूर येथे हस्तकलेचे शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. या केंद्रात लक्ष्मणाने अभ्यासामध्ये गरुड झेप घेतली आणि तिथे त्यांचा गौरवही करण्यात आला. आनंद वनामध्ये सगळ्यांना हवा हवा वाटणारा लक्ष्मण इथेच राहावा असे वाटायचे इथून शिक्षण पूर्ण झाल्यावर लक्ष्मण आपल्या गावी आले. काही दिवसात आनंदवन येथून अंध विद्यालयात शिक्षक म्हणून काम करण्यासाठी त्यांना पत्र आले पत्र हे खूप उशीर आल्याने व त्यांना जाण्यासाठी उशीर झाल्याने शिक्षक होण्याचे स्वप्न हवेतच विरून गेले.

आज हजारो पिढ्यांना घडविणारा लक्ष्मण एक आदर्श शिक्षक म्हणून राष्ट्रपतीच्या हस्ते त्यांचा गौरवी झाला असता एवढा चाणक्य बुद्धिमान परंतु नियतीचे दशावतार त्याच्या पाठीमागे त्याचा पिछा सोडत नव्हते. एके दिवशी विभागीय



समाज कल्याण अधिकारी अरुण बोगींलवार यांची आणि लक्ष्मण ची भेट झाली त्या काळचे पंतप्रधान राजीव गांधी यांनी1987 एक जीआर काढला होता.त्यात लिहिले होते प्रत्येक जिल्ह्यातून पाच अंधाना शासकीय सेवेत सामावून घ्या असा तो जी आर होता तो जी आर घेऊन 1989 ला लातूर जिल्ह्याचे कलेक्टर उमेशचंद्र सारंगे हे होते त्यांना जी आर दाखविल्यानंतर त्यांनी एमएसबी जिल्हा परिषद नगर परिषद या ठिकाणी सूचना दिल्या. त्यावेळी अचानक कलेक्टर साहेबांची बदली झाली काही दिवसात लातूर जिल्ह्याचे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉक्टर गोविंद गारे हे कलेक्टर झाले त्यावेळी त्यांची भेट झाल्यावर त्यांनी मात्र एम्प्लॉयमेंट ऑफिस कडे अंध व्यक्तींची यादी मागितल्यावर लातूर जिल्ह्यातील 42 अंध व्यक्ती मिळाले.

त्यावेळी त्यांना दोन जागा भरायच्या होत्या लक्ष्मण इंटरव्यूला गेल्यावर त्यांचा इंटरव्यू घेत असताना तेथील सेवक हात धरून त्यांना खुर्चीवर बसायला सांगितले परंतु लक्ष्मणाने नकार दिला तेवढ्यात पुढे इंटरव्यू घेणाऱ्या साहेबांनी बसा असे म्हणाल्यावर लक्ष्मण म्हणाले साहेब मी सेवकाच्या इंटरव्यू साठी आलोय तुमच्यासारख्या मोठ्या महान माणसासमोर मी खुर्चीवर बसणार नाही.हा त्याचा प्रामाणिकपणा पाहून तेथील सर्वच आश्चर्यचकित झाले. आणि त्यांना तुमचे शिक्षण कुठे झाले आहे असे विचारल्यावर त्यांनी छाती ठोकपणे सांगितले बाबा आमटे यांच्या आनंदवन येथे झाले त्यांना बाबा आमटे यांच्या बद्दल माहिती विचारली असताना त्यांनी बाबा आमटे यांच्या जन्मापासून त्यांच्या संपूर्ण कुटुंबाची माहिती दिली बाबा आमटे प्रकाश आमटे साधनाताई आमटे या प्रत्येकाचे काम कसे आहे याबद्दलची माहिती त्यांनी दिली ते इंटरव्यू मध्ये पास झाले आणि त्यांना नोकरी देण्यात आली.

उदगीर पंचायत समितीमध्ये नोकरी करत असताना तेथील बांधकाम विभागाचे क्लर्क बिराजदार यांनी सांगितले की लक्ष्मण आता तू लग्न करायला हवं लक्ष्मण म्हणाले साहेब जरा शिकलेली बायको मिळाली तर बरे होईल म्हणून जरा वाट पाहतोय परंतु ते काय मिळत नाही ती शिकली असेल तर ती डोळसपणे सगळ वाचेल कारभार सांभाळेल असे लक्ष्मणाला वाटायचे परंतु बिरादार यांनी सांगितले की तुझ्यासारख्या अंध व्यक्तीशी लग्न कोण करणार शिकलेली मुलगी तुला करून घेणार नाही तुला साधारण आणि अडाणी मुलीशी लग्न करावी लागेल हा त्यांचा मनी विचार पटला आणि लक्ष्मण ने पहिलेली स्वप्न हे स्वप्न राहून गेले.

सौ. अंजनाबाई भंगारे शिंगे यांची कन्या वंदना या चौथीपर्यंत शिकलेल्या त्यांच्याशी 1990 मध्ये लग्न झाले खर तर वंदनाचे कौतुक करावे तेवढे कमीच आहे वंदना ह्या अपंग नाहीत अंध नाहीत शरीरानं अगदी व्यवस्थित असताना सुद्धा त्यांनी एका अपंग व्यक्तीशी लग्न करण्याचे ठरले लग्नापूर्वी वंदनाच्या आयुष्यात एक कहानी घडली आणि ती सत्यात उतरली त्या बाहेर जात असताना एका मुलीने अंध व्यक्तीला ढकलून देऊन पाडले त्याला बराच मार लागला आणि वंदनाने त्याला उठवले. तिच्या मनात उगीच आले अशा एखाद्या अंध व्यक्तीची सेवा करणं हे किती मोठे पुण्याचे काम आहे माझ्या आयुष्यात असं घडलं तर मी त्याची सेवा करेल आणि झाल तसंच अशा अंध लक्ष्मनसी वंदनाचा विवाह झाला आणि तिने पाहिलेले स्वप्न साकार झालं.

अनेक महिला स्वतःचा पती श्रीमंत हवा सुंदर हवा हुशार हवा म्हणून त्या महादेवाची पूजा करतात परंतु वंदनाने त्यागाचे चंदनासारखे झिजण्याचे नदीप्रमाणे वाहत जाऊन इतरांची तहान भागविण्याचे वृक्षा सारखी सावली देऊन इतरांच्या आयुष्यात सुखाचे दिवस आणण्याचे स्वप्न बघितले आणि ते साकार करता आले. लग्न झाल्यानंतर सुखाचा संसार सुरू झाला आणि लक्ष्मीनाला पंचायत समिती रोहिनांमधून जिल्हा परिषद शाळेला त्यांना नोकरी मिळाली आणि 2003 मध्ये समायोजनामधून त्यांना चाकूर तालुक्यातील झरी (बु) येथे नोकरीसाठी यावे लागले लक्ष्मण कांबळे अंध असल्याने शाळेतील बरीचशी कामे वंदनाला करावी लागायची धृतराष्ट्र अंध असताना गांधारीने आपल्या डोळ्याला पट्टी बांधून आयुष्यभर पाहायचंच नाही अशी शपथ घेतली परंतु वंदनाने मात्र आयुष्यभर लक्ष्मणाचे डोळे होऊन त्यांच्यासाठी जगायचे हे ठरवले रस्त्याने चालत असताना छोट्या बाळाला जसे घेऊन जावे लागते तीच अवस्था वंदनाची झाली तिचं जगणं लक्ष्मण झाले तिने सर्वस्व त्यालाच अर्पण केले वंदनालने कधी बाहेर पाहुण्यांच्या घरी जाणं सोडून दिलं आणि अंध लक्ष्मणाची त्या काठी झाल्या.

पत्नीबद्दल लक्ष्मणांना विचारले असताना लक्ष्मण म्हणाले की वंदनाने केलेला माझ्यासाठी चा त्याग आज आदर्श त्याग आहे परमेश्वर आहे का नाही हे सिद्ध करता येत नसली तरी तो माणसाच्या रूपाने नक्की पाहता येतो एक देवी म्हणून माझी ति सावली बनून पोटच्या लेकरासारखं तिने मला सांभाळ तिचा अनंत कोटी उपकार माझ्यावर आहे एका डोळस स्त्रीला पाहायला गेल्यावर तिच्या मनाची घालमेल काय होत असेल त्यावेळी मला कळाले होते.परंतु कुठलाच मागचा पुढचा विचार न करता वंदनाने मला स्वीकारलं आणि माझ्या आयुष्यात सोन्याचे दिवस आले.

वंदनाच्या आई-वडिलांनी सांगितले होते की मुलगा नोकरदार आहे दोन लेकरं झाली तर त्याच्याकडे पाहून तुला आनंदाने जगता येईल परंतु तेही वंदनाच्या लक्ष्मणाच्या नशिबात नव्हते नियतीचा खेळ काही पिछा सोडत नव्हता त्यांच्या नशिबात दाम्पत्य नव्हते अनेक प्रयत्न करूनही त्यांना ते मिळत आले नाही हे दोघांनी ठरवून टाकलं शाळा हे आपलं घर आहे तिथली मुलं म्हणजे ते आपल्या घरातील लेकर आहेत त्यांच्यावर जीवापाड प्रेम करावे त्यांच्यासोबत हसावं खेळावं बागडावं यापेक्षा सुख काय असतं.

लक्ष्मण कांबळे मामा शाळेमध्ये प्रत्येकाला अव जाव बोलायचे प्रतेकाच्या हृदयामध्ये त्यांनी आपला अस्तित्व निर्माण केल होत आता त्यांचे शाळेतून निवृत्त होणे म्हणजे सर्व शिक्षक आणि शिक्षकांसाठी आणि झरी येथील गावकऱ्यांसाठी कलेशदायकच होतं. 30 सप्टेंबर 2022 रोजी त्यांचा शाळेतील हा शेवटचा दिवस प्रत्येकाच्या डोळ्यातील आसवांनी वाट मोकळी करून दिली होती.

कांबळे मामा सुरुवातीला झाली तेव्हा  झरी येथे सर्वप्रथम उस्मान मामा यांच्या घरी आठ वर्षे लक्ष्मण व त्यांच्या पत्नी राहिल्या नंतर बालाजी लिंबाजी माकने यांच्या घरी आजपर्यंत राहत होते. आता आपण निवृत्त होणार आहोत म्हणून एके दिवशी विद्यार्थ्यांना सर्वांना सोनपापडी वाटली आणि पाहता पाहता ही गोष्ट गावात पसरली की आता लक्ष्मण कांबळे मामा झरीत राहणार नाहीत हे विद्यार्थ्यांनी सांगितल्यावर प्रत्येकाच्या आईच्या डोळ्यातील अश्रुने दाटूनआले.अनेक महिला कांबळे मामा यांना म्हणाल्या मामा तुम्ही आता झरीतच राहा.कांबळे मामा म्हणाले की माझे घर नाही त्यावेळी झरी बु येथील शोभाबाई ज्ञानोबा सुरवसे म्हणाल्या कांबळे मामा आम्ही तुम्हाला घर देऊ पण तुम्ही इथेच राहा झरीला येताना नोकरी कसे करसाल झरीत असे अनेक लोक बाहेर म्हणायचे आता झरी सोडून जाऊ नका अशा म्हणणाऱ्यांची संख्या मात्र हजारो आहे आपण जिथे राहतो ना तिथे आपली माणसं निर्माण करता आली पाहिजेत. अतरासारखं सुगंध पसरविता आला की जीवन सोन्यासारखे होते आणि तेच लक्ष्मण कांबळे यांनी केले.

त्याने नियतीने लक्ष्मणाचे डोळे घेतले असले तरी लक्ष्मणाला आवाजाचे ज्ञान मात्र प्रचंड परमेश्वराने दिले दहा वर्षांपूर्वी भेटीलेला माणूस त्याच्या आवाजावरून लक्ष्मण ओळखतात शिक्षकांच्या गाडीचा आवाज ओळखून हे शिक्षक आले आहेत असं म्हणतात एखाद्या शिक्षकाच्या गाडीची फायरिंग ओळखून त्या शिक्षकाची ओळख सांगणार हा लक्ष्मण निश्चितच जगावेगळा दिसतो.

लक्ष्मन यांना एक प्रश्न असा विचारण्यात आला की आपल्याकडे असलेल्या साधनसंपत्तीचा आपण काय उपयोग करणार आहात तर ते म्हणाले की धर्माधिकारी यांचे चाणक्य क्लासेस यांना मला मदत करायची आहे.जी गोरगरीब मुलं आहेत अपंग आहेत अंध आहेत ज्यांना शिक्षण घेता येत नाही अशांना मला मदत करायची आहे लक्ष्मणाला असेही विचारले की तुमचा कोणी सांभाळ करत नसेल तर तुम्ही काय करणार आहात शेवटी ते म्हणाले मी आश्रमात जाईल यावेळी वंदनाच्या डोळ्यातील पाणी आले.  आणि त्या म्हणाल्या मला अगोदर मरण येऊ नये कारण मी गेले तर यांचा सांभाळ कोण करणार मी त्यांना आत्तापर्यंत लेकरासारखं सांभाळले त्यांना कोण सांभाळणार त्यावेळी लक्ष्मण सुद्धा गहिवरून गेले त्यांना आणखीन एक प्रश्न विचारला तुम्ही एखादा मुलगा दत्तक का घेतला नाही ते म्हणाले आम्ही लेकराची खूप दिवस वाट पाहिली आणि माझं वय 45 वर्षे झालं आम्ही दत्तक मुलगा मागायला गेल्यावर ते म्हणाले 45 वर्षे वयाच्या नंतर दत्तक घेता येत नाही आणि आम्ही शेवटी कुठल्याच मुलाला दत्त घ्यायचा नाही असा विचार केला.

सर्वसामान्य माणूस जी गोष्ट डोळ्यांनी पाहतात तीच गोष्ट अंध व्यक्ती अंतःमनाने पाहतात.तेही आपल्यापेक्षाही अधिक बारकाईने.जी गोष्ट आपल्याला दिसत नाही अंध व्यक्तींना ती सहजच जाणवते. ‘मात अंधारावर’ या पुस्तकात ‘जेकब बोलोटिन’ नावाची अंध व्यक्ती डॉक्टर झाल्याचं स्पष्ट केलंय.जर एखादी अंध व्यक्ती डॉक्टर होत असेल तर यावर पूढे काहीही बोलणं चुकीचेच ठरेल.त्या व्यक्तीला त्याच्या सर्व पेशंटची नावं, त्यांना झालेले आजार हे सर्व बोलोटिन याना तोंडपाठ होत. समोर ओळखीची व्यक्ती आली की लगेच ते नावाने उच्चारत.एक सर्वसामान्य माणसालाही अवघड असणाऱ्या कितीतरी गोष्टी त्यांनी खूप मेहनतीने करून दाखवल्या आहेत.

असे कितीतरी अंध असतात ज्यांना बोलताही येत नाही त्यांना किती त्रास होत असेल.आपल्या देशात कितीतरी बलात्कार होतात.आपण यांच्या बद्दल जास्त काही करत नसलो तरी जास्त काहिनाही पण आपण यांना मदत म्हणून नेत्रदान नक्कीच करू शकतो. त्यासाठी काय जिवंतपणी तुम्हाला तुमचे डोळे कोणाला द्यायचे नाही. आपल्या मृत्यूनंतर तसेही आपले डोळे आपल्या कामाचे नाहीत.पण जर आपल्या मृत्यूनंतर कोणाला आपण उपयोगी पडत असू तर काय हरकत आहे मदत करायला. आपण जगात नसलो तरी कोणाच्या नजरेत आपण आहोत हे समाधान नक्की असेल. निदान जाता-जाता कोणाला मदत केल्याचं पुण्य तरी नक्की मिळवून जाऊ.या अंध व्यक्तीच्या आयुष्यात आलेल्या दुःखाच्या वाटा आपल्याला आयुष्यात येऊ नये...... हा अंध व्यक्तीवर लिहिलेला लेख   सर्वांना पाठवा नक्कीच प्रेरणा मिळेल.

**(लेखक सिद्धेश्वर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय झरी बु. येथे कार्यरत आहेत)**

# 'पंखुड़ी गुलाब की...'

आधुनिक केसरी

**सिनेसृष्टीचा सर्वोच्च, दादासाहेब फाळके पुरस्कार नुकताच लाभलेल्या द हिट गर्ल, 'आशा पारेख' यांचं मनपूर्वक अभिनंदन! 'बहारों के सपनें' मधलं तिचं 'आजा पिया तोहे प्यार दू...' हे गाणं मी आजही ऐकतो तेव्हा एखाद्या अवखळ, नितळ झऱ्याचं शांत, समृद्ध सरितेत रुपांतर झाल्यासारखं मला वाटतं.**




'लिखे जो ख़त तुझे, वो तेरी याद में
हजारों रंग के नज़ारे बन गये
सवेरा जब हुआ तो फूल बन गये
जो रात आयी तो सितारें बन गये...'

'कन्यादान' चित्रपटातलं, नीरजच्या लेखणीतून उतरलेलं एखाद्या झऱ्यासारखं नितळ, निखळ असं हे प्रेमगीत! शंकर-जयकिशनच्या बहारदार संगीतासोबत दऱ्याखोऱ्यातून घुमणारे रफीचे उनाड स्वर आणि पडद्यावर गाण्याची लज्जत वाढविणारा, राजबिंडा शशी आणि अवखळ, अल्लड आशा! इतका काही सुंदर जमून आलाय ना हा मेळ की, गाण्याची ती अमृत-गोडी नुसतीच चाखत राहावी वाटते.

खूपच छान दिसलीये आशा या चित्रपटात! एक वेगळंच आकर्षण होतं मनात तिच्याबद्दल, माझ्याच नाही तर आमच्या अख्ख्या गावकऱ्यांच्या! कारणही तसंच होतं - एकोणीसशे सत्तर सालची ही गोष्ट आहे बघा! आमच्या फैजपूर गावच्या कॉलेजची नवीन इमारत बांधली जात होती, आणि त्या इमारतीसाठी लागणारा निधी जमण्यासाठी एका खास कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. कार्यक्रमासाठी विशेष पाहुणी होती हीच आशा... आशा पारेख! त्यावेळी; चित्रपटसृष्टीतील आपल्या कारकिर्दीच्या अति उच्च यशोशिखरावर होती आशा. आताच्यासारखं मेडिया तेव्हा इतकं फास्ट नव्हतं. कुणाकडे ना टेलिव्हिजन होते ना फारसे टेलीफोनही. अशा बातम्या एक तर गावच्या चौकात, पारावर, नाही तर रेडिओच्या बातम्यांमधून मिळायच्या.

चित्रपट बघण्याची क्रेझ जनमानसात अशी काही भिनली होती की, लोक वेडेच होते चित्रपटसृष्टीचे! आणि आशाचे तर दिवानेच होते. त्यामुळे आशाचं आमच्या फैजपूर गावी येणं गाव गल्ल्यांनाच नाही तर शेजारच्या पंचक्रोशीतही माहिती झालं होतं. तिची एक झलक पाहण्यासाठी लोकांनी हजारोंच्या संख्येनं गर्दी केली होती. गर्दी इतकी जास्त होती की, पोलिसांना लाठीमार करावा लागला होता. आशाच्या त्या एका कार्यक्रमातून साडे तीन लाख रुपये एवढा निधी त्यावेळी गोळा झाला होता. गर्दीमुळे आमच्या बाबांनी आम्हाला नेलंच नव्हतं. पण, 'टप्पोर डोळ्यांची आशा अख्ख्या चाहत्यांवर मोहिनी घालून गेली होती,' हे त्यांचे शब्द अजूनही मला आठवताहेत. आणि याच दरम्यान शशी कपूर सोबत प्रदर्शित झालेला तिचा, 'प्यार का मौसम' हा त्यावेळी मी तीनदा पाहिला होता, काश्मीरच्या सफरचंदासारखी लाले लाल दिसलीये त्यात आशा.

अवघी चित्रपटसृष्टी आपल्या अभिनय कौशल्याने झगमगून टाकणाऱ्या या मृगनयनी अभिनेत्रीचा जन्म ०२ ऑक्टोबर १९४२ला झाला होता. म्हणजे आजच! आशाचे वडील प्राणलाल (बच्चूभाई) पारेख हे एक हिंदू गुजराथी होते, आणि आई सुधा उर्फ सलमा पारेख ही बोहरा मुस्लिम. पंडित बन्सीलाल भारतीसह आशाने अनेक शिक्षकांकडून लहान वयातच शास्त्रीय नृत्याचे धडे घेतले. आपल्या चित्रपट कारकिर्दीची सुरुवात तिने बेबी आशा पारेख या नावाने केली होती. झालं असं की, एक स्टेज शोमध्ये नृत्य सादर करताना दिग्दर्शक बिमल रॉय यांनी तिला पाहिलं; आणि १९५२ला आलेल्या 'माँ' चित्रपटासाठी आणि १९५४च्या 'बाप बेटी' साठी तिला करारबद्ध केलं. त्यावेळी आशा अवघी दहा वर्षांची होती. त्यानंतर आणखीही दोन तीन चित्रपटात तिने बाल कलाकाराची भुमिका साकारली, मात्र त्यावेळी तिची फारशी कुणी दखल घेतली नाही.

पुढे वयाच्या सोळाव्या वर्षी तिने आणखी एक प्रयत्न केला. चित्रपट होता 'गुंज उठी शहनाई'. पण दिग्दर्शक विजय भट्ट यांनी - 'अभिनेत्री होण्याचे कोणतेही गुण तुझ्यात नाही' असं सांगून तिला सपशेल नाकारलं. या वरही खचून न जाता आशाने आपले प्रयत्न चालूच ठेवले. आणि भाग्य असं की, या घटनेच्या काही दिवसानंतर लगेचच पटकथा लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते नासिर हुसेन आणि सशाधर मुखर्जी यांनी शम्मी कपूरची नायिका म्हणून 'दिल देके देखो'साठी तिची निवड केली. या घटनेने आशाचे सितारे एका रात्रीत बदलले. 'दिल देके देखो' या चित्रपटाला उषा खन्नाने संगीत दिलेलं होतं. उषा खन्ना ही हिंदी चित्रपटसृष्टीतल्या संगीत क्षेत्रातली; व्यावसायिकदृष्ट्या सर्वात यशस्वी ठरलेल्या महिला संगीत दिग्दर्शकांपैकी एक होती. या चित्रपटातली 'बोलो बोलो कुछ तो बोलो...', 'दिल देके देखो...' रफींच्या या सोलो गाण्यांसोबत आशा-रफीची 'यार चुलबुला है...', 'प्यार की कसम...', 'बड़े है दिल के काले...' ही डुएटही जबरदस्त हिट झाली होती.

आशासारखा हसमुख आणि सुंदर चेहरा चित्रपटसृष्टीच्या पडद्यावर आणण्याचं श्रेय दिग्दर्शक नासिर हुसेन यांचंच म्हणायला हवं! पुढेही नासिर हुसेनसोबत आशाचे दीर्घकाळ संबंध राहिले. हुसेन यांनी तिला 'जब प्यार किसी से होता है' १९६१ / 'फिर वहीं दिल लाया हूँ' १९६३ / ' 'तीसरी मंज़िल' १९६६ / 'बहारों के सपने' १९६७ / 'प्यार का मौसम' १९६९ आणि / 'कारवाँ' १९७१ या सारखे हिट चित्रपट दिले. गूढ कथानक असलेला यातला, 'तीसरी मंज़िल' हा तर आजही ब्लॉकबस्टर मनाला जातो. मोहक चेहऱ्याच्या या ज्युबिली गर्लला सुरुवातीला हलक्या, फुलक्या रोमँटिक चित्रपटांमधून, ग्लॅमर गर्ल म्हणूनच ओळख मिळाली. मात्र, राज खोसला यांनी 'दो बदन' आणि 'चिराग' या सारख्या चित्रपटांमधून आशाला गंभीर स्वरुपाच्या भुमिका दिल्या. आणि तिच्या अभिनयाचे वेगळे पैलू चाहत्यांसमोर आणले. दिग्दर्शक शक्ति सामंत यांनी सुद्धा 'पगला कहीं का' आणि 'कटी पतंग' सारख्या चित्रपटांमधून अधिक आव्हानात्मक आणि नाट्यमय भुमिका देवून तिची अभिनय कारकीर्द आणखीनंच समृद्ध केली. ज्यामुळे; सर्वोत्कृष्ट अभिनेत्री म्हणून पहिल्या फिल्मफेअर पुरस्कारावर आशाला आपलं नाव कोरता आलं.

अविट आणि मधुर-मदिर गाणी जशी आशाला अभिनय करायला मिळाली, तेवढेच छान चित्रपटही तिला मिळाले. 'जब प्यार किसी से होता है' १९६१ / 'फिर वहीं दिल लाया हूँ' व 'अखंड सौभाग्यवती' (गुजराथी) १९६३ / 'मेरे सनम' १९६५ / 'तीसरी मंज़िल', 'दो बदन', 'आये दिन बहार के', लव इन टोकियो', 'बहारों के सपने', १९६६ / 'उपकार' १९६७ / 'शिकार', कन्यादान' १९६८ / 'प्यार का मौसम', 'चिराग़', 'आये दिन बहार के', 'आया सावन झुम के' १९६९ / 'पगला कहीं का', 'आन मिलो सजना' १९७० / 'कटी पतंग', मेरा गांव मेरा देश', 'कारवाँ' १९७१ / 'समाधी' १९७२ / 'उधार का सिंदूर' १९७६. प्रचंड गाजलेल्या चित्रपटांची ही मांदियाळी तशी न संपणारीचंय! या चित्रपटांनी आशा ही हिंदी सिनेसृष्टीच्या पानांवरच नाही तर चाहत्यांच्या काळजातही चिरंजीव होवून गेली.

आपल्या बहारदार अभिनयाने साठ आणि सत्तरचं दशक आशाने कसं झगमगून टाकलं होतं. त्या काळातील सर्वाधिक मानधन घेणाऱ्या अभिनेत्रींपैकी एक होती आशा! आतापर्यंतच्या सर्वात प्रभावशाली अशा या अभिनेत्रीने आघाडीच्या बहुतेक अभिनेत्यांसोबत काम केलं होतं. सदाबहार देव जसा तिला शोभला, तशीच ती राजेश खन्ना सोबतही छान दिसली. शम्मी, शशी, जॉय मुखर्जी, विश्वजीत, सुनील दत्त, मनोज कुमार, धर्मेंद्र, जितेंद्र अशा सगळ्याच नायिकांसोबत तिने समरसून काम केलं.

कारकिर्दीच्या उच्चशिखरावर असतानाच पंजाबी, कन्नड आणि काही गुजराथी चित्रपट आशाने केले होते. 'अखंड सौभाग्यवती' हा तिचा गुजराथी चित्रपट प्रचंड गाजला होता. या चित्रपटाने तिला सर्वश्रेष्ठ अभिनेत्रीचा गुजरात राज्याचा राज्य पुरस्कारही मिळवून दिला. अति सुंदर अशा या नाजनीने अभिनीत केलेल्या गाण्यांबद्दल सांगायचं झाल्यास कोणत्या गाण्याबद्दल लिहावं असा प्रश्न पडतो. अगदी 'दिल देके देखो' मधल्या 'यार चुलबुला है...' पासून ते 'समाधी'तल्या 'कांटा लगा...' पर्यंतच्या तिच्या सगळ्याच गाण्यांनी चाहत्यांना वेड लावलं होतं. सौ साल पहले...' / जिया ओ... / ओ हसीना जुल्फोंवाली... / ओ मेरी सोना रे... / आजा आजा में हूं.../ तुम मुझे यूँ... / नी सुल्ताना रे... / सायोनारा सायोनारा... / रात का समां... / नाजनी बड़ा रंगी है... / आँखों से जो... / जाइये आप कहाँ जायेंगे... / जब चली ठंडी हवा... / सुनो सजना... / अच्छा तो हम चलते है.../ तेरी आँखों के सिवा... / बंगले के पिछे तेरे... चाहत्यांचा भूतकाळाच नाही तर वर्तमान आणि भविष्यही सतरंगी करणारी अप्रतिम अशी गाणी आशाला मिळाली.

'बहारों के सपनें' मधलं तिचं 'आजा पिया तोहे प्यार दू...' हे गाणं मी आजही ऐकतो तेव्हा एखाद्या अवखळ, नितळ झऱ्याचं शांत, समृद्ध सरितेत रुपांतर झाल्यासारखं मला वाटतं. आशाच्या अभिनयाला सामाजिक जाणिवेचं कोंदण मिळालं ते 'बहारों के सपनें', 'कटी पतंग', आणि 'मैं तुलसी तेरे आँगन की' या सारख्या चित्रपटांमधून!

आशा... ही आजतागायेत अविवाहित आहे. असं म्हणतात की, पटकथा लेखक, दिग्दर्शक आणि निर्माते नासिर हुसेन यांच्यासोबत तिचे नाजूक संबंध होते. "नासिर साहेब, माझ्यावर प्रेम करणारा एकमेव माणूस', अशी पुष्टी आशाने स्वतःच खालिद मोहम्मद सोबत लिहिलेल्या 'द हिट गर्ल' या आपल्या आत्मचरित्रात दिली आहे. दिग्दर्शक नासिर हुसेन हे आधीच विवाहित होते, आणि त्यात दोन्ही कुटुंब एकमेकांना चांगले परिचित! यामुळे नासिर साहेबांशी लग्न करणं आशाला प्रशस्त वाटलं नाही.

आजही, वयाच्या अठ्ठ्याहत्तराव्या वर्षी आयुष्यातले फुरसतीचे क्षण अभिनेत्री वहिदा आणि हेलन यांच्यासोबत जशी ती समरसून घालवतेय. तशीच, कारा भवन या आपल्या नृत्य अकदमीवरही तिचं विशेष प्रेम आहे. सांताक्रूझ येथील आपल्या; आशा पारेख हॉस्पिटलचं कामकाज बघण्यातही आशाला एक वेगळाच आनंद मिळतो. या अभिनेत्रीच्या नावावर, ऐंशी पेक्षा जास्त चित्रपट आणि भारत सरकारकडून दिल्या जाणाऱ्या पद्मश्री पुरस्कारासोबत, मानाचे कितीतरी पुरस्कार आहेत. विशेष म्हणजे; आजच्या आपल्या ऐंशीव्या वाढदिवसाच्या चार दिवस आधीच, बुधवार दिनांक २८ सप्टेंबरला, भारतीय चित्रपटसृष्टीतील त्यांच्या अतुलनीय योगदानाबद्दल सिनेसृष्टीतील सर्वोच्च सर्वोच्च असा दादा साहेब फाळके पुरस्कार २०२० हा तिला घोषित झाला आहे. पण या पुरस्कारांच्या परे असलेली आशाच्या मानवतावादी विचारांची उंची तिला आजही मान-सन्मानाच्या यशोशिखरावर ठेवून आहे. राजेश खन्नाच्या स्टारडमचा एक अविभाज्य भाग असलेल्या आशाला, देव आनंद आणि शम्मी कपूर हे अभिनेते आवडायचे. वहिदा, हेलन आणि सायराबानो या तिच्या आवडत्या अभिनेत्री!

खरंच, कसं घडवलं असेल ना त्या विधात्याने आशाचं हे अनुपम सौंदर्य, की तिच्यावर लिहिताना कवीची लेखणीही वेडी व्हावी, शायरची गझल डायरीतून बाहेर येवून नाचूच लागावी. आशा; जिची तारीफ करताना प्रसिद्ध गीतकार राजिन्दर कृष्ण यांनी सुद्धा एक छान गीत लिहिलं होतं. सलिल चौधरींचं हळुवार संगीत आणि तलतचा मुलायम आवाज लाभलेलं 'छाया' चित्रपटातलं हे गीत इतकं काही गोड अन लाघवी आहे की... मला जेव्हा जेव्हा आशाच्या मोहक चेहऱ्याची याद येते, तेव्हा सुनील दत्तने अभिनीत केलेलं हे रसिलं गाणं माझ्याही ओठी सरसरु लागते-

'आँखों में मस्ती शराब की
काली जुल्फों में रातें शबाब की
जाने आयी कहाँ से टूटके
मेरे दामन में पंखुड़ी गुलाब की...'

संदर्भ : विकिपिडीया, यु -ट्युब

## मला भावलेली सिनेरत्न



मनोहर मंडवाले, संपर्क क्र. 8879123236

## शेतातील नवदुर्गा

बळीराजाची धनीण
त्याच्या सवे राबराबते ।
जळी, स्थळी, काष्टी, पाषाणी
तिला शिवारच दिसते ।। 1।।

सकाळच्या पारी भाकर
चटणीची न्याहारी बांधते ।
दुपारच्याला कांदा, मुळा
झुणका भाकर वाढते ।। 2 ।।

घरधन्याची कमी
सदा भरून काढते ।
लेकरापायी जीव
तुटत सतत झुरते ।। 3 ।।

काटकसरीने संसाराला
हातभार लावते ।
बचतीसाठी कनवटीला
चार पैकं ठेवून राहते ।। 4 ।।

धन्याला धोतरजोडी
सवताला लुगडी घेते ।
साधंसुधं रूपडं तिचं
बडेजाव करत नसते ।। 5 ।।

भाळी ठसठशीत कुक्कू
अन् हाती काकनं वाजवते
पायी रूप्याची जोडवी अन्
कटीला बटवा चिल्लर वाजवते।। 6 ।।

सासूबाई मामंजींची
सेवा नित्य करते ।
पै पाहुण्यांची बडधास
अन् लेकरासी पाढे पढवते ।। 7 ।।

घरधन्याला आधार देत
चार सद् गोष्टी शिकवते ।
सद्विवेक देऊन
आत्महत्येपासून वाचवते ।। 8 ।।

अबब एवढे करताही
भ्रमणध्वनी वापरते।
रील, व्हिडिओ बनवायला
सदा तत्पर असते ।। 9 ।।

गावचा रानमेवा
सार्या जगाला दावते ।
माणिक, मोती पिकवूनि
शान देशसेवाच जणू करते।। 10 ।।

-सौ. सुनीता रोझेकर, मुंबई

## माझी नवदुर्गा माझी आई

नऊ महिने नऊ दिवस सतत
जपले, पोसले मला आपुल्या गर्भात
जीवापाड निष्पाप प्रेममाया करत
प्रसवांच्या जीवघेण्या यातना सोसत
आईने जन्मास घातले मला ह्या ब्रम्हांडात
मग कश्यासाठी. ? जाऊ मी
निर्जीव नवदुर्गा देवीच्या मंदिरात..

आई माझ्या बोबड्या शब्दांची गुरू
सरस्वतीच रूप आई कल्पतरू
आई मम चिमुकल्या ओठांतला श्वास
आई अन्नपूर्णा तहान भुकेचा घास
वाढविले तिनेच मला सु-संस्कारात
मग कश्यासाठी. ? जाऊ मी
निर्जीव नवदुर्गा देवीच्या मंदिरात..


प्रत्येक पावलांचा आई आधार
तिनेच नेटका केला सुखाचा संसार
दिली उभारी अडखळत्या पावलांत
ठेच मला रक्त वाही आईच्या पायात
माझ्या नाना कळा सोसल्या हृदयात
मग कश्यासाठी. ? जाऊ मी
निर्जीव नवदुर्गा देवीच्या मंदिरात..

वीज वारा वादळी पाऊस संकटी
रक्षणार्थ आई उभी सदैव माझ्या पाठी
रक्त गोठले तरी माया तिच्या उबाऱ्यात
आईनेच उभ केल मला ह्या जीवनात
मज पाहता फुटे पान्हा तिच्या अंतरात
मग कश्यासाठी. ? जाऊ मी
निर्जीव नवदुर्गा देवीच्या मंदिरात..

आई सर्व सुख दुःखं संकटांना पुरून उरी
देई पंखाना बळ,अभय आणि उभारी
स्वामी तिन्ही जगाचा आईविना भिकारी
माझ्या चुकांना घेई आपूल्याच पदरी
पूर्ण विश्वाच बळ आईच्या आशीर्वादात
मग कश्यासाठी. ? जाऊ मी
निर्जीव नवदुर्गा देवीच्या मंदिरात..

-दिपक लोंढे, सांगली.

## "नवदुर्गा"



नव्या युगाची तू नवदुर्गा
प्रणाम माझा आधी तुजला
निलांबरी तू त्रिशूळधारी
सदा शक्ती द्यावी लढायला!

सरस्वती तू विणाधारिणि
पूजीतात विद्येची देवता
नतमस्तक मी तुझ्या पायी
मूर्ती तुझी स्मरणी ठेवता!

सकल जनांची तू अंबिका
प्रणाम माझा आधी तुजला
दारोदारी मागेन जोगवा
पदरात घे तू या भक्ताला!

महाकाली महारुद्राक्षांची
लंकाधीश तोही भक्त तुझा
भोळा शंकर गाई भजन
मनी नाही आई भाव दुजा!

व्याघ्रांबर देवी वाघीश्वरी
प्रणाम माझा आधी तुजला
आस लागुदे आदिशक्तीची
काया वाचिक तनामनाला!

प्रदीप बडदे, नवी मुंबई.
मो. ९५९४०२७९९५

## देवी स्तुती

मनी आनंद झाला.
रूप तुझे पाहताना
गुण तुझे गाताना....ll

अश्विन शुद्ध प्रतिपदेला
घट स्थापना मंदिरी या
नवरात्रीला नव रूपांनी
दर्शन भक्तांना......ll

मधु-कैटभा शासन करुनी
चंड मुंडा दंड देउनी
महिषासुराचा नाश करूनी
रक्षिलेस देवांना..........ll



अष्टभुजा तू दुर्गामाता
संकटाते वारी आता
अज्ञ आले शरण तुज गे
अभयदान दे त्यांना...ll

काली कपाली कौशिका तू
ज्ञान दायिनी सरस्वती तू
चामुंडा तू भवानी भद्रा
महालक्ष्मी माता .....ll

विजयादशमी घटोत्थापन
शस्त्रपुजा अन् सीमोल्लंघन
दे प्रसादा, आशीर्वादा
आई तुझ्या भक्तांना....ll

-सौ.अनघा पतके, खंडाळा,
जि. सातारा, मो.
9764860296

## "जागर आई जगदंबेचा"



जगदंबेच्या नवरात्राची
किती वर्णू अपूर्वाई*
जागरास आनंदे आली
आई भवानी तुळजाई..!

शैलपुत्री ही प्रथम दिनी
अन् दुजी ब्रम्हचारीणी
तिसरे दिवशी चंद्रघटा
मग व्याघ्रा रुढ होई..!

ब्रम्हांडासी व्यापुनी उरली
चवथी आई कुष्मांण्डा
स्कंदमाता ये पंचमात अन्
षष्ठी कात्यायनी सिंहावर येई..!

कालरात्री संहारक तितूकी
सुखकर सौम्य महागौरी
आनंद उधळीत सिध्ददात्रीं
आम्हा आशिर्वचं देई..!

जागरास आनंदे आली
आई भवानी तुळजाई..!

-ज्योती जयंतराव
आळंदकर, लातूर

## नजर...!

नजर जर शुन्य झाली
तर विचार प्रवाह बनते,
नजर जर फाकली तर
भयपणाचे लक्षणे बनते.

नजर जर चुकली
तर कर्तव्यहीन होते,
नजर जर झुकली
तर लज्जतेचे भाव बनते.

नजर जर पलटली
तर द्वेषात्मक बनते,
नजर -नजरेला मिळाली
तर आनंदाचे प्रतिक बनते.

नजर ही लाजली
तर आदर्शपणाचे भान ठेवते,
पण नजर जर बिथरली
तर आपमानाची जाण बनते.

चंचल नजरेची भाषा
ही साऱ्यांनाच कळते,
लोकांकडे- पाहतांना
नजर ही नजरेला मिळते.

- अय्युब पठाण लोहगांवकर,
मो. ९७६४३५०३७४

## जागर करुया माता भवानीचा



पांढरे धवल ।। वस्त्र परिधान ।।
करूयात ध्यान ।। दुर्गा माता ।।

पानांची माळ ।। पहिल्या दिवशी ।।
अर्पण करशी ।। मनोभावे ।।

फूले तरवड ।। दुसरी माळती ।।
लाल साडी किती ।। छान दिसे ।।

कधी कमळ ते ।। फुलावर बसे ।।
निळी साडी असे ।। शोभीवंत ।।

संहार करते ।। दुष्टांचा क्रोधाने ।।
चंडिका ती बने ।। रुप असे ।।

अनेक रूपेती ।। घेऊनी फिरते ।।
कल्याण करते ।। माता दुर्गा ।।

-सीमा मंगरूळे तवटे,
वडूज सातारा

## ग़ज़ल

खुद को छुपाने से धोका न जाएगा
इस तरह आंधी को रोका न जाएगा

अपने ही पास रखो अब कसमें वादें
इस अमानत को संभाला न जाएगा

दिल से पूंछा करो मोहब्बत के फ़ैसले
दुबारा सिक्के को उछाला न जाएगा


रिवाज़ ए इश्क़ में मुड़कर न देखो
जब तक दिल से पुकारा न जाएगा

हौसला आसमां का रख, उड़ान भर
हर वक्त पिंजरे को खोला न जाएगा

तमाम ख्वाइशे जरा काबू में रखना
छलनी को पानी से भरा न जाएगा

आँख मूंद कर उस का दीदार करना
चांद को बुलाकर दिखाया न जाएगा

-बलराज संघई
मो. 9420015108



## फायदा अन तोटा

कुणाच्या हाती मोबाईल
तर हाती कुणाच्या लॅपटॉप
जिकडे बघावे तिकडे
ते आपापल्या कामात

कांही गोष्टींचा फायदा
तर काही गोष्टींचा तोटा
गाण्याची मजा घ्यायची तर
करा मोबाईलचा आवाज मोठा

काय चालले कुणाचे ते
कोणा घेणे देणे नाही
हेडफोन घातला कानात की
मी तर सुखी बाई

इलेक्ट्रॉनिक वस्तुंनी तर
सर्वांना जवळ केलं
पण जवळच्या नात्यांना
मनापासून दुर नेलं

हे सर्व नव्हतं तेंव्हा
नाती जुळून होती
आता कुणी कुणाचं नाही
हेच नजरेस पडती

घेतल्या वस्तुंचा पहायचा
नसतो फायदा अन तोटा
ज्या गोष्टीने मन प्रसन्न होते
यातच आनंद आहे मोठा

-सौ. भाग्यश्री दायमा, जयसिंगपूर

## रफिक

एक कविता,
एक शायरी और एक गजल ने
एक नये नये आशिक से कहा
जरा हमसे भी दोस्ती कर लो
थोड़ा वक्त हमारे साथ भी गुजार लो

आशिक बड़े अदब से बोला
अभी अभी तो नया प्यार
और यार है मिला
सारी उम्र और वक्त उसके
नाम है किया

मालूम है, ऐ आशिक, मालूम है
जिस राह पर तुम निकले हो
उसकी मंजिल के बाद
दवा और दारू बस हम ही है

वोह इतराके हसकर बोला
ये मुमकिन नहीं
मेरा यार सबसे अलग है

शायरी अपनी धुन में बोली
बागी तुझसे भी पहले कई थे
अब तो ये मुशायरा है रफिको का ।

अमोल मोकासे, पिशोर,
ता. कन्नड 9730781775

## बुद्ध होतो आहे

जगाला प्रत्येक काळात
तुझीच गरज बुद्धा
चिरंतन शांतीसाठी अन्
सर्व जीवांच्या जगण्यासाठी
म्हणून प्रज्ञा शील अन करुणेसोबत
मानवतेला जपतो आहे.

जगा आणि जगू द्या
हा विचार उगवून यावा
पुन्हा एकदा जगाला
शांतीचा संदेश देणाऱ्या
या पुण्यभूमीत म्हणून
बुद्ध व्हावं लागेल प्रत्येक

माणसाला त्यासाठी
पहिला माणूस होतो आहे.
बुद्ध होण्याच्या पहिल्या पायरीला
नमन करण्याआधी
बुद्ध समजून घेतो अन्
सन्मार्गाने चालता चालता
बुद्ध होतो आहे.

ज्ञानेश्वर
गायके, कन्नड

## कर्तबगारी

माणसा झाडे तोडण्याची
तुझी कर्तबगारी आता तुलाच पडली ना भारी

झाडे लावा झाडे जगवा सांगत सुटले होते सारे
किती जणांनी जगवली खरच आज झाडे

एक माणूस एक झाड आज वाढवली असती
फुकट मिळणाऱ्या ऑक्सिजनसाठी
किंमत मोजावी लागली नसती

पैसे मोजूनही मिळाला नाही ऑक्सिजन आम्हांला
फुकटच्या मालाचे मुल्य नसते कुणाला

आम्हांला फक्त गर्व आहे आमच्यातल्या "मी "पणाचा
"मी" पणाची कर्तबगारी आज तुलाच पडली ना लय भारी

माणसा तुझीच तु उडवतो टिंगल-टवाळी
तुझ्याच अकलेची ही अगळीवेगळी कर्तबगारी



-लक्ष्मण वाल्डे, कन्नड, मो. 8888606068

## राष्ट्रपिता

अहिंसेची मशाल
घेवूनी हाती
दिनदुबळ्यांशी
जोडली नाती

दिला सर्वांना
स्वदेशीचा मंत्र
मनात रुजविले
स्वावलंबनाचे तंत्र

सदैव दिला
सत्याचा नारा
हिंसेला ना दिला
कधीच थारा



सत्याग्रहाच्या मार्गाने
इंग्रजांना दिला लढा
'चले जाव' च्या
चळवळीतून
शिकविला धडा

उच्च त्यांचे विचार
रहानी साधी
राष्ट्रपित्याची त्यांना
मिळाली उपाधी

- रवींद्र व्ही. चालीकवार
महागाव, जि. यवतमाळ

# हृदयविकाराची लक्षणे-कारणे आणि उपाय



डॉ. नवनाथ बी. घुगे
संपर्क : 9850784001

आधुनिक केसरी

**29 सप्टेंबर हा जागतिक हृदय दिन म्हणून जगभर साजरा केला जातो. हृदय विकार व मेंदूचा अटॅक (cardiovascular disease - CVD) हे जगातील मृत्यूचे सर्वात मोठे कारण आहे. जगभरामध्ये दरवर्षी १७ ते १८ ला लाख लोक , हृदयरोग व मेंदू विकार (CVD) यामुळे मृत्युमुखी पडतात. हृदयरोग व तत्सम आजाराविषयी माहिती व जनजागृती करण्याच्या उद्देशाने दरवर्षी 29 सप्टेंबरला जागतिक हृदय दिन म्हणून साजरा केला जातो.**

पूर्वी असा समज होता की, हृदयरोग हा फक्त प्रगत देशांमध्येच जास्त आढळतो पण, अभ्यासा अंती असे लक्षात आले आहे की, जगातील जवळपास ८० % हृदयरोगाचे मृत्यू हे प्रगतशील देशांमध्ये होतात. यामुळे कमी वयामध्ये हृदयरोग होणे , त्यावरील उपचाराचा खर्च व अवेळी मृत्यू होणे हे वैयक्तिक कुटुंबाच्या दृष्टीने, तसेच देशासाठी अतिशय हानिकारक आहे.

**हृदयरोगाची प्रमुख कारणे :** A) अतिशय महत्त्वाची व बदलता येण्याजोगी कारणे (Modifiable Risk Factors.)
1) उच्च रक्तदाब (High Blood Pressure).
2) प्रमाणापेक्षा जास्त कोलेस्ट्रॉल (High cholesterol specially serum LDL)3) मधुमेह (Daibetes )
4) वाढलेलं वजन (Obesity). 5) धूम्रपान- तंबाखू व तत्सम पदार्थांचे सेवन. 6) व्यायामाचा अभाव अथवा बैठी जीवनशैली. ( Physical Inactivity) 7) ताण - तणाव .8) दारूचे अती सेवन. B ) बदलता न येण्याजोगी हृदय **रोगाची कारणे :** १. वाढते वय , २. अनुवंशिकता.

सध्याची धावपळीची जीवनशैली, ताण - तणाव, वाढलेले वजन, चुकीची आहार पद्धती, धूम्रपान, यामुळे कमी वयामध्ये अतिउच्च रक्तदाब, मधुमेह, वाढलेले कोलेस्ट्रॉल, असे आजार उद्भवतात. परिणामी कमी वयामध्ये आपणास हार्ट अटॅक व पॅरॅलिसिसचा अटॅक येण्याची संभावना वाढते.

**हार्ट अटॅक म्हणजे नेमके काय....? :**

उच्च रक्तदाब, अनियमित मधुमेह, वाढलेले कोलेस्ट्रॉल, तंबाखूचे सेवन, ताण - तणाव, वाढलेले वजन, या सर्व गोष्टींमुळे आपल्या शरीरातील रक्तवाहिन्यांमध्ये हळूहळू चरबीचा थर जमतो. ही प्रक्रिया शरीरातील सर्वच रक्तवाहिन्यांमध्ये होत असते. परंतु, हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिन्या, मेंदूतील रक्तवाहिन्या, किडनीच्या रक्तवाहिन्या, यामध्ये जास्त प्रमाणात चरबीचा थर जमतो. काही वेळेला अचानक एखाद्या रक्तवाहिनी मधील चरबीची गाठ तुटते आणि हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनी मध्ये अडकून बसते, यालाच हृदयाचा अटॅक अथवा हार्ट अटॅक म्हणतात. तशीच चरबीची गुठळी मेंदूला रक्तपुरवठा करणाऱ्या रक्तवाहिनीत अडकली तर त्यास मेंदूचा अटॅक अथवा प्यारालिसिस असे म्हणतात.

**हार्ट अटॅकची प्रमुख लक्षणे :** छातीमध्ये दुखणे, घाम येणे, छातीवर ओझे दिल्यासारखे वाटणे, छाती आवळल्यासारखे वाटणे, छाती भरून येणे, छातीतील दुखणे जबड्याकडे जाणे, अथवा दोन्ही हातांमध्ये जाणे, श्वास घेण्यास अचानक त्रास होणे , असे अनेक प्रकारची लक्षणे असू शकतात. मधुमेह असणाऱ्या रुग्णांना बऱ्याच वेळा अत्यंत कमी प्रमाणामध्ये छातीमध्ये दुखते परंतु त्यांना अतिशय गंभीर स्वरूपाचा हार्ट अटॅक असू शकतो. अशावेळी तात्काळ वैद्यकीय सल्ला व उपचार घेणे महत्त्वाचे असते. अशा हार्ट अटॅक आलेल्या रुग्णांना तात्काळ हृदय रोगावर उपचार उपलब्ध असणाऱ्या रुग्णालयात दाखल करून पुढील उपचार घेणे आवश्यक असते.


**हृदयरोग टाळण्यासाठी चे उपाय :** वाढत्या वयानुसार कसलाही त्रास नसला तरीही वय 35 ते 40 वर्ष पुढील व्यक्तींनी आपले सर्वकश तपासणी करून घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. ज्या व्यक्तींना रक्तदाब आहे त्यांनी रक्तदाब नियंत्रणात ठेवणे, त्यावरील औषध उपचार नियमित घेणे, नियमित तपासणी करणे अतिशय महत्त्वाचे असते. ज्या व्यक्तींना मधुमेह आहे त्यांनी त्यास नियंत्रित ठेवणे, तसेच नियमित Blood sugar , cholesterol तपासून त्यास नियंत्रणात ठेवणे अतिशय गरजेचे आहे. मधुमेहामुळे शरीरातील प्रत्येक अवयवांवर त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात. यासाठी तज्ञ डॉक्टरांच्या मार्फत वेळोवेळी त्रास नसला तरीही सर्व तपासण्या करणे व आवश्यक ते उपाय करणे गरजेचे असते. मधुमेहा मुळे, डोळे, किडनी, हृदय, मेंदू, शरीरातील सर्व नसा व रक्तवाहिन्या यांवर दुष्परिणाम होतात. परंतु वेळोवेळी तपासण्या करून मधुमेह नियंत्रणात ठेवल्यास असे दुष्परिणाम आपण कमी करू शकतोत. तसेच शरीरातील




होणारे दुष्परिणाम तपासण्यासाठी डॉक्टरांनी सुचवलेल्या आवश्यक त्या तपासण्या त्रास नसल्या तरीही करणे आवश्यक असते. हृदयरोग टाळण्यासाठी प्रत्येकाने आपले वजन उंचीच्या प्रमाणात नियंत्रित ठेवणे गरजेचे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सिगारेट, बिडी, हुक्का पिणे, गुटखा, तंबाखू, खाणे पूर्ण पणे बंद केले पाहिजे. तसेच कोणत्याही प्रकारचा व्यायाम दररोज 45 मिनिटे आठवड्यातील पाच दिवस तरी करणे आवश्यक आहे. पायी भर-भर चालणे, सायकल चालवणे, पोहणे, जिम मध्ये जाऊन व्यायाम करणे, कोणत्याही प्रकारचा खेळ खेळणे, योगासने करणे, प्राणायाम करणे असे व्यायाम करणे आवश्यक आहे. शक्य असेल तर बैठी जीवनशैली टाळणे गरजेचे आहे. तसेच नेहमी प्रसन्न राहणे, ताण-तणाव टाळणे, दारूचे सेवन बंद करणे हे ही अतिशय महत्त्वाचे आहे. आहाराविषयी काळजी घेणे महत्त्वाचे आहे. अति तेलकट, चरबी युक्त पदार्थ, तळलेले पदार्थ, अति मांसाहार, जंक फूड टाळणे महत्त्वाचे आहे. आहारामध्ये फळे, पालेभाज्या ,कडधान्य, प्रथिनयुक्त पदार्थ, वेगवेगळ्या डाळी घेणे आवश्यक आहे. काही दिवसांपूर्वी आमच्याकडे ICU मध्ये अवघ्या चोवीस (24 )वर्षांचा मुलगा अतिशय गंभीर स्वरूपाचा हार्ट अटॅक (Acute Anterior Wall MI with Cardiogenic Shock) आल्यामुळे ऍडमिट केले होते. तो एका अमेरिकन कंपनीसाठी ऑनलाईन रात्रपाळीचा मागील दोन वर्षापासून जॉब करत होता. त्याची झोप पूर्ण होत नव्हती, तसेच वजन वाढलेले होते. त्याने सांगितलेल्या माहितीनुसार तो अतिशय तणावात होता. म्हणून अतिशय कमी वयात त्याला अत्यंत गंभीर स्वरूपाचा हार्ट अटॅक आला असावा. अतिशय काळजीपूर्वक, योग्य वेळी अचूक उपचार केल्यामुळे त्याचे प्राण वाचले. पुढे त्यास अँजिओग्राफीसाठी लातूर येथील हृदयरोग तज्ञ डॉ. शिवपुजे सर यांच्याकडे पाठवले. आपण योग्य वेळी दिलेल्या औषधोपचारामुळे (रक्त पातळ होण्याचे महत्त्वाचे औषध) त्याच्या हृदयातील रक्तवाहिनी मध्ये अडकलेली चरबीची गुठळी विरघळली, त्याचे प्राणही वाचले व त्यास Angioplasty करण्याची गरज भासली नाही. यातून हे सिद्ध होते की अतिशय गंभीर अवस्थेतील रुग्णास योग्य वेळी योग्य उपचार मिळाल्यास नक्कीच आपण त्यांचे प्राण वाचवु शकतो.

दिवसेंदिवस हार्ट अटॅक कमी वयात येण्याचे प्रमाण वाढले आहे. अभ्यासा अंती असे आढळून आले आहे की, हार्ट अटॅक आलेल्या जवळपास 65% रुग्णांचे मृत्यू हे रुग्णालयात पोहोचण्याआधीच होतात. यामुळे हार्ट अटॅक येऊ नये यासाठी नियमित काळजी घेणे गरजेचे असते. चला तर मग या जागतिक हृदय दिनानिमित्त हृदयरोग व हार्ट अटॅक टाळण्यासाठी काही संकल्प करूयात :- रक्तदाब, मधुमेह, वजन, कोलेस्ट्रॉल नियंत्रणात ठेवणे. - नियमित व्यायाम करणे. साधा व सकस आहार घेणे. तंबाखू खाणे कायमची बंद करणे. नेहमी हसत तणावमुक्त व आनंदी जगणे. या सर्व गोष्टी पाळूयात व हार्ट अटॅक टाळू यात.

# वात्सल्या: अनाथ मुलींच्या कथेचे मार्मिक नाटक



संजय व्यापारी
संपर्क क्र. 7743918559

आधुनिक केसरी

**वात्सल्या ही एक अनाथ मुलीची कथा आहे. नाटकाच्या लेखिका कविता चव्हाण यांनी अनाथ मुलांच्या जीवनावर अतिशय संवेदनशील प्रकाश टाकण्याचे काम आपल्या लेखणीतून केले आहे. या नाटकाचे दिग्दर्शक चिन्मय मायदेव हे आहेत तर सहायक दिग्दर्शीकेच काम पाहिलय.**

आधुनिक केसरी

जासवंदी बर्वे यांनी या नाटकाच्या माध्यमातुन कविता चव्हाण यांनी समाजाला एक प्रकारे जागृत केले आहे असे म्हणता येईल, बऱ्याच ठिकाणी असे बघण्यात येते की काही लोक मूल, मुली दत्तक घेतांना आपल्या भाऊ, बहिणीची घेतात तर तसं न करता जर तुम्ही अनाथ आश्रमातील मूलं, मुलीं दत्तक घेतली तर त्या पाखरांनाही मायेची ऊब मिळेल त्यांना एक हक्काच घर, आई वडिलांच प्रेम मिळेल हा संदेश देण्याचा प्रयत्न या नाटकातुन कविता चव्हाण यांनी केला आहे एका अनाथ मुलीला मिळणारे टोमने, फक्त ती अनाथ आहे म्हणून लग्नासाठी दिला गेलेला नकार, समाजाचा अनाथ मुलिकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलण्यात यावा तशा मुलींनाही इतर मुलींप्रमाणे समजल जाव असे मत त्यांनी व्यक्त केले आहे चिन्मय सरांनी सुद्धा हेच मत मांडले आहे चिन्मय मायदेव यांनी या नाटकासाठी खूप मेहनत घेतलीय त्यांनाही वाटत अनाथ मुलांना त्यांच हक्काच घर मिळाव, उपाशी पोटी कोणी भटकू नये असे मत चिन्मय मायदेव यांनी व्यक्त केले आहे त्यांनी नाटकात अभिनय करणाऱ्या सर्व कलाकारांना वेळोवेळी एकत्र घेऊन छान शिकवण दिली वात्सल्या हे नाटक लवकरच ऑफलाइन करू असे मत चिन्मय मायदेव यांनी व्यक्त केले जेणेकरून हा सुंदर संदेश जास्तीतजास्त लोकांपर्यंत पोहचेल आणि समाजातील लोक मूल दत्तक घेताना नक्की असा विचार करतील की आपण अनाथ आश्रमातूनच घेऊ या नाटकामध्ये अभिनय करणा-या सर्व कलाकारांनी मन लावून तयारी केली, या धावपळीच्या जीवनात वेळात वेळ काढून त्या सर्व कलाकारांनी खूप मेहनत घेतली. ऑफलाइन कार्यक्रमासाठी सर्व उत्साहित आहेत अनाथ आश्रमातील एकही मुलगा किंवा मुलगी अनाथ असू नये असे सर्वांचे मत आहे अश्या सुंदर विचारांचे पात्र आहेत नम्रता जाधव, श्रुती घोसाळकर, विजया कापड़ी, मेघा भोर, लता पुरकर, कांचन चावडे, स्वानंदी गोळे, बिपाशा डे, मनस्वी म्हात्रे, शलाका गोड़े, मुद्रा सावंत, मनाली मळेकर, गीताश्री, स्मिता भिमनवार, अनिल पूरकर, अनिल देशमुख, जान्हवी कळबेंकर, जिग्नेश गोड़े, मधुकर धुफारे या सर्वांनी उत्तम रित्या आपल्या अभिनयाची छाप प्रेषकांवर पाडली आहे.




**- समीक्षा : संजय व्यापारी**

# नवरात्रीत चालणारी 'डाळभाजी'

आधुनिक केसरी

**गवसलेल्या दुर्गेचे रुप**

बागेमध्ये कितीही हिरवाई असली तरी फुलांशिवाय तिला शोभा नाही. आपण फुलांची निवड करताना पांढऱ्याशुभ्र सुगंधी फुलांची निवड करतो. देवपूजा, सण-समारंभात सुगंधी फुलांना खास स्थान असते. मोगरा, जाई, जुई, सायलीच्या वेली अशाच हिरव्यागार असतात. नाजूक पांढरीशुभ्र फुले चांदण्यांसारखीच उमलतात. त्यात मन भारून जाणारा त्यांचा हवाहवासा, मंद सुगंध देणा-या वेली घराघरातील अंगणाची शोभा वाढवतात. तसंच माणसाचं पण! फुलांच्या सहवासात मन प्रसन्न, आनंदी होते. तनमन कसं एकदम दमके दमके! होतं तसं काही माणसाच्या बाबतीत कळतं. त्याच्याशी बोललं की एक पॉझिटीव्हीटी जाणवू लागते. मराठीत एक म्हण आहे जाळाशिवाय कड नाही आणि मायेशिवाय रड नाही. सहवासाने माणसं कळतात हेच खरं. सायलीचं फुलं कसं नाजूक साजूक,पांढराशुभ्र पण त्याच्या वासाने मनाचा गाभारा भरून जाणारच. अगदी नावाविरुद्ध. नेतृत्व, धडाडी, धाडसी हे पाचवीला पुजलेले पेक्षा रक्तात घेऊन आली.नारळासारखी वरून कडक पण







आतून मऊ ! तशीच ही माझी सखी सुगरण डॉ. सौ. सायली सुनील लाड.सायली मस्त भारदस्त देखणं व्यक्तिमत्व. उंचीपुरी, सशक्त बांधा, बोलके डोळे, तरतरीत नाकाच्या शेंड्यांवर टोचलेली चमकी भाव खाऊन जाणारी. कपाळावर डॉ. च्या नावाची मोठी ठसठशीत टिकली आणि हसताना पडणाऱ्या गोड खळया. तिला भेटलं, पाहीलं की तिची छबी डोळ्यात साठवून घ्यावी असं प्रसन्न हसतमुख सखी. मुळची अमरावतीची देशमुखांची लेक डॉ.सुनीलच्या प्रेमात पडली आणि पंढरपूरात कायमची स्थिरावली. आपल्या व्यवसायाशी प्रामाणिक, तत्वनिष्ठ असणारी सायली पेशाने डॉ. तरीही प्रेमळ सुगृहिणी. अनेक गुणाने संपन्न आहे. सेवाभाव, आपुलकी, सणवार परंपरा समारंभ, रितीरिवाज सगळं कसं आखिव रेखिव.



लय भारी
## सुगरण


सौ. आरती राजाराम परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

निटनेटक्या, साजेश्या पद्धतीने साकारणारी. आमदार कन्या, परंपरागत श्रीमंतीचा वारसा रक्तात असला तरी प्रत्येकाच्या आडीनडीला धावून जाणारी, पटकन आपलसं करुन घेणारी. अन्नपूर्णा, लक्ष्मी, सरस्वती रुपात तर कधीकधीच कालीच्या रुपात पण शोभुन दिसणारी. हळव्या मनाची, कातड्याची आणि आतड्याची नाती छानच जपणारी. आमच्या छबूआत्या नेहमी म्हणायच्या अर्थात गमतीने सासरची मंडळी म्हणजे कातड्याची आणि माहेरची म्हणजे. पण आजेसासुबाई गेल्यावर धायमोकलून रडणारी सायली मी पाहिली आहे. ऊर्जितची आई, सासुसासऱ्याची सून, डॉ. सुनीलची सहचारिणी, राशु आणि शिल्पा दोंघींची भावजय. सासर-माहेरला जोडून ठेवणारा घट्ट रेशमीबंधाचा दुवा. लाड कुटुंबाचा अस्सल, भक्कम चौकोनी चिरा. आजच्या गवसलेल्या दुर्गेची खास वैदर्भिय पद्धतीने केलेली रेसिपी आई शाकंभरीदेवीला समर्पित. मग बघा करून आणि कळवा.

**विदर्भ स्पेशल नवरात्रीत चालणारी 'डाळभाजी'**

**साहीत्य :** एक पाव पालक (विदर्भात पेंडी मिळत नाही वजनावर पाले भाज्या विकतात), एक वाटी तुरीची डाळ, मुठभर भिजवलेली, हरभरा डाळ, मुठभर भिजवलेले शेंगदाणे, अर्धा मुळा छोटे उभे तुकडे करून, 1 टोमॅटो बारीक चिरून, आल्याचा छोटा तुकडा किसून, 1 चमचा धणे पूड, 1/2 चमचा जिरे पूड, 1 चमचा लाल तिखट, गुळाचा छोटा खड़ा, चवीनुसार मीठ, 2-3 चमचे तेल, फोडणीसाठी मोहरी, जिरे, हिंग, कढीपत्ता. **कृती :** पालक धुवून बारीक चिरून घ्यावा. डाळी, पालक, मुळ्याचे तुकडे आणि शेंगदाणे मिळून चारही जिन्नस अंदाजे पाणी 1-2 वाटी घालून कुकरला लावून 3 शिट्ट्या होवू द्यायच्या. कुकर गार झाला की शिजलेला डाळ पालक रवीने घोटून घ्यायचा. पातेल्यात तेल गरम करुन मोहरी तडतडली की जिरे घालून कढीपत्ता टाकायचा, हिंग घालायचा, आल्याचा किस आणि टोमॅटो टाकून नीट तेल सुटेपर्यंत शिजवून/ परतून घ्यायचे, तिखट, मीठ धणेजिरे पुड घालायची. घोटलेला डाळपालक या खमंग फोडणीत टाकायचा. गुळाचा खडा टाकून विरघळेस्तोवर उकळी येऊ द्यायची. भाकरी किंवा भातासोबत भन्नाट लागते. नवरात्राशिवाय इतर वेळा जेवायला वाढताना वरून लसून, लालमिरची परतलेल्या तेलाची फोडणी घातली तर खासच...

**(छायाचित्र आणि रेसिपी सौजन्य : डॉ. सौ. सायली सुनिल लाड.)**







श्रीमती छाया खेडकर
संपर्क क्र. 8888780568


आधुनिक केसरी

अ) गणिताची मुलभूत संकल्पना : संखेचे वाचन
सारणी क्रमांक : 3



ब) गणिताची मुलभूत संकल्पना प्रश्नसंच :जोड्या लावा.

| अ गट संख्येचे वाचन | ब गट तिच्या पुढील शुन्याची संख्या |
|---|---|
| 1)शंभर | 11 |
| 2) एक कोटी | 17 |
| 3) निखर्व। | 2 |
| 4) महापद्म। | 7 |
| 5) परार्ध। | 12 |



१५) सांगा पाहू...
लोटीपेक्षा ग्लास मोठा
ग्लासपेक्षा तांब्या मोठा
तांब्यापेक्षा कळशी मोठी
कळशी पेक्षा हंडा मोठा
या तर आहेत चढत्याक्रमाच्या वाटा.

क) उखाणा : शाळेत मध्यान्ह भोजनासाठी करतात तांदळाचा भात,
संख्येचे वाचन करताना एक कोटी मध्ये एकच्या पुढे शुन्य असतात सात.
2) तीन अधिक तीन होतात सहा,संख्येचे वाचन करताना खर्व मध्ये एकच्या पुढे शुन्य असतात दहा. ड) कविता क्रमांक 15

तुकारामनीती
भाग 28

# कमोदिनी काय जाणे तो परिमळ...!



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**जगद्गुरू संत तुकोबाराय! मराठी वाङ्मयाला सुवर्णालंकारीत करणारा महापुरुष! तुकोबांची अनुभूती आणि त्याद्वारे झालेले जीवनाचे प्रकटीकरण याचे आजीवन चिंतन केले तरी आणखी काहीतरी शिल्लक राहिलंय याची कुणकुण लागेल असं कालातीत लेखन! तुकोबा बोलून बोलत नाहीत, लिहून लिहित नाहीत. काळाने सहजच त्यांना स्थितप्रज्ञ अवस्थेला नेवून ठेवले आहे! त्यामुळेच त्यांचे अनेक अभंग द्वंद्व वाटत असले तरी त्यांना थंड-गरम याचे काही उरले नाही. म्हणूनच ते बोलों अबोलणें मरोनियां जिणें । असोनि नसणें जनि आम्हां ॥ असे अभंग लिहू शकतात. हा अभंग वाचला तरी अंगावर काटा उभा राहतो. कोणतीही भावानुभूती अभिव्यक्त होतांना लेखक-कवी त्या त्या अवस्थेला जाऊनच आपली निर्मिती जगांसमोर ठेवत असतो. सृजनाकडून जगाला नेहमी हीच अपेक्षा असते! कोणतीही निर्मिती एकदम, सहजासहजी होत नसते. तुम्ही-आम्ही आज ज्या वयाचे आहोत, तिथपर्यंतचा प्रवास आठवून बघा? आपला जन्म आणि त्यावेळची आपल्या आईची अवस्था? हे प्रश्न कधीतरी आपल्या आईला विचारून पहा. या सर्वच प्रश्नांची उत्तर ही निर्मिती प्रक्रियेची उत्तर असतील. निर्मितीची वेदना आणि त्यानंतर होणारे अलौकिक सुख म्हणजे ते दुःखातील सुख आहे! गुणवत्ता यादीत प्रथम क्रमाक आलेला किंवा धावण्याच्या शर्यतीत प्रथम क्रमांत पटकावलेल्या विजेत्याला ८-१० किमी पळून जिंकल्यानंतरची त्याची अवस्था पहा!**

तो विजेता असतो, परंतु त्यामागे त्याचे अथक प्रयत्न-परिश्रम असतात. जशी ही अनुभूती आहे, तशाच प्रकारची अनुभूती संत तुकोबांची त्यांच्या वेगवेगळ्या अभंगातून प्रकट होतांना दिसते. त्यामुळेच तुकोबा 'तुका म्हणे नव्हे दिसतो मी तैसा' असे स्वतःच जाहीर करून टाकतात. हे मोठं मजेशीर आहे. सोबत राहून सोबत रहायचे नाही, भोगांचा सर्वच अर्थाने त्याग करून अगदी कमलदलासारखे पाण्यात राहून अलिप्त रहायचे! ही अवस्था म्हणजेच तुकोबा! तुकोबांचे सर्वच अभंग सांसारिक माणसांच्या जागृतीसाठी असून आज आपण कोणत्या काळात जगत आहोत? या काळाच्या सर्वच प्रश्नांची उत्तरे त्यांच्याकडे आहेत. बोलतांना तुकोबा तोलून मगच बोलतात. त्यामुळे त्याचं लेखन वाचतांना सहजतेने पाठांतर होऊन जाते. आज चिंतनासाठी निवडलेला

अधिकार तैसा दावियेले मार्ग । चालतां हें मग कळों येतें ॥१॥
जाळूं नये नाव पावलेनि पार । मागील आधार बहुतांचा ॥२॥
तुका म्हणे रोग वैदाचे अंगीं । नाहीं करी जगीं उपकार
॥३॥(शा.अ.गाथा अ.क्र.538)

हा अभंग जवळपास सर्वांच्याच पाठातील आहे. पाठातील असला तरी या आणि तुकोबांच्या अनेक अभंगांची वैशिष्ठ्ये म्हणजे ते केवळ वाचायला, लिहायला आणि त्यावर बोलायला एकदम छान वाटते, मात्र हे सर्वच अभंग आजकालच्या संसारिक आणि तथाकथित पारमार्थिक माणसांना तोलायला मोठे जड जाताहेत. आज उपदेश करणारांचे, व्याख्यात्यांचे, कीर्तन-प्रवचनकारांचे अक्षरशः पेव फुटले आहे! संत एकनाथांचा 'गुळ खाणे सोडण्याचा दृष्टांत' सर्वश्रुत आहे. हा संकेत खूपच बोलका असून या अनुषंगाने सातत्याने काम होणे अपेक्षित आहे! आजमितीला अधिकार असणारी माणसं मोठमोठ्या पदांवर बसून जगाला उपदेश करतांना दिसत आहेत, मात्र आपण बोललेल्या वचनाचा आणि त्यांतरच्या वर्तनाचा अर्थार्थी कसलाही संबंध येत नसल्यामुळे उपदेश किंवा मार्गदर्शन कुचकामी ठरते आहे. एका कीर्तनकाराने तुका म्हणे ज्याची संपदा एवढी । सांगाते कवडी गेली नाही ॥ या तुकोबांच्या अभंगातील लंकापती रावणाची श्रीमंती आणि त्यानंतर तो रिकाम्या हाताने हे जग सोडून गेला, सिकंदर खाली हाताने गेला, असे एक ना अनेक सरस दृष्टांत आणि त्या अनुषंगाने भोळ्या-भाबड्या लोकांना विविध सिद्धांत



पटवून दिले. लोक हसले, तर कधी रडले. कीर्तन एकदम उत्तम झाले, परंतु गावातून बाहेर जातांना महाराजांना नारळ आणि बिदागी द्यायची वेळ आली, तेंव्हा ठरलेल्या रकमेपेक्षा पाचशे रुपये कमी असल्याकारणाने महाराजाने संयोजक मंडळींसोबत भांडण काढले. महाराज आकांडतांडव करू लागले, जोरजोरात ओरडू-बोलू लागले! लगेच आजूबाजूच्या तरुणांनी महाराजांचे विश्लेषण करायला सुरुवात केली. हा महाराज केवळ बोलका पोपट आहे! असे महाराज पुन्हा बोलावू नका, यांची तारीख घेऊ नका! हे लोक बोलतात एक आणि वागतात एक! सामान्य लोकांमध्ये ही गोष्ट लगेच प्रसारित झाली आणि संपूर्ण कीर्तन परंपराच बदनाम झाली. सांगायचे तात्पर्य, आज अधिकारवाणीने बोलणारी आणि तोलणारी माणसं दुर्मिळ झाली आहेत!


अधिकारी व्यक्ती ही मोठीच असते! ती जबाबदार असते! त्या व्यक्तीची भूमिका आई-वडिलांची असते! शेवटच्या माणसाची सुरक्षा आणि त्याचे संगोपन हा दृष्टीकोन त्या व्यक्तीकडे असावा लागतो. त्याच धरतीवर, जे लोक नावेतून पैलतीरी गेले आहेत त्यांनी ती नाव लगेच जाळून न टाकता आपल्या मागून आणखी भरपूर लोक येणार असून ही नाव पुन्हा अनेकांना पैलतीरी नेणार आहे याचे भान ठेवावे! आज केवळ स्वार्थ समोर ठेवून ज्ञानोबा-तुकोबांच्या अभंगांचे लाखात व्यवहार चालू आहेत! ही त्यांच्या विचारांशी केलेली घोर, भयंकर प्रतारणा आहे! या व्यवहारांनी वारकरी सांप्रदाय बदनाम, कलाकिंत होत आहे! भजन-कीर्तन-प्रवचन याकडे व्यावसायिक दृष्टीकोन ठेवून पहिले जात आहे. तशी शिकवण देऊन, तयारी करून घेतली जात आहे! भजन-कीर्तन-प्रवचन ही माणसांची अंतर्बाह्य शुद्धीची अलौकिक साधने असतांना त्यांना व्यवहाराचा स्पर्श झाल्यामुळे ही साधने कलुषित होत आहेत. ही जरी कला असली; तरी ती शांती, संयम,भक्ती, शुद्धी यासंबंधाने सर्वश्रेष्ठ कला असून त्यातून उच्च कोटीचा सज्जन माणूस निर्माण होऊन तो जगाला मार्गदाता होणे अपेक्षित आहे. यासाठी आपल्याला आद्य संत कवयित्री जनाबाई, संत नामदेव, संत ज्ञानदेव, संत कान्होपात्रा, संत एकनाथ, संत तुकाराम आणि आदि संतांचा मोठा दैदिप्यमान इतिहास आहे. हाच आपल्या सर्वांचा आधार असतांना आपणच जर अशा अनेक प्रलोभनाला बळी पडलोतर येणाऱ्या पिढ्या आपल्याला क्षमा करतील का? तेंव्हा, अधिकार प्राप्त व्यक्तीने आपल्या अधिकारांचा विनियोग करतांना साधक-बाधक बाबींचा विचार करून मगच पुढचे पाउल टाकावे, तेच पाऊल सर्वांना मार्गदर्शक असेल याचा सखोल विचार व्हावा.

या अभंगात शेवटी तुकोबाराय, वैद्य आणि त्याचे उपचार या दृष्टीने मोलाचे वचन लिहून जातात. एखादा वैद्य किंवा शल्यचिकित्सक लोकांवर उपचार करतो, याचा अर्थ त्याला कोणतेच रोग होत नाहीत का? तर असं काहीच नाही. डॉक्टर लोकांवर उपचार करतांना त्याला सुधा रोग विळखा घालत असतात. उलट डॉक्टरांना संसर्ग होणाची दाट शक्यता असत. आत्ताच कोरोना लाटेत पीपीई कित घालून कोरोना वार्डात काम करणारे डॉक्टर्स कोरोना बाधित झाली आणि त्यांना आपले प्राण गमवावे लागले. शिवसेनाप्रमुख स्व.बालासाहेब ठाकरे यांच्या ह्रदयाची यशस्वी शस्त्रक्रिया करून त्यांना जीवदान देणारे जगातील सुप्रसिद्ध ह्रदयाचे डॉक्टर नीतू मांडके यांचा मृत्यु ह्रदय विकाराच्या झटक्यानेच झाला हे विसरून कसे चालेल! असे एक ना अनंत उदाहरणे देता येतील, जेणेकरून वैद्य किंवा डॉक्टरांना सुद्धा लोकांवर उप्कॅह्र करत करत स्वतःची काळजी घावी लागेल! अगदी तसेच अधिकार प्राप्त, मोठ्या लोकांना आपल्या अधिकाराचे भान ठेवून वर्तन करावे लागेल! असे झाल्यासच खऱ्या अर्थाने त्या व्यक्तींच्या विचाराचे सार्थक होणार आहे.

तुकोबांच्या अभंगांचे एक वैशिष्ट्ये म्हणजे त्यांचे दृष्टांत आणि सिद्धांत हातात हात घालू चालतात. उपदेश करतांना तुकोबा आणि त्यांचे अभंग कुणाचाही मुलाहिजा ठेवत नाहीत. आजचा अभंग अधिकार प्राप्त म्हणजेच अधिकारी व्यक्तीने कसे वर्तन करून (?) सामान्य आणि इतरांना मार्गदर्शक व्हावे याचे मार्गदर्शन करणारा आहे. अधिकारी व्यक्ती हा सैन्याच्या कॅप्टन सारखा असला पाहिजे! कॅप्टन पराभूत झाला की संपूर्ण सैन्य सैरभैर होत असते हे लक्षात असावे. हे अधिकारी व्यक्ती म्हणजे घरातील मोठी-जबाबदार माणसं, ऑफिस किंवा देश चालवणारी मोठ्या पदावरील माणसांनी योग्य मार्गाने चालून मागील लोकांचा विचार होणे अपेक्षित आहे. आपण योग्य मार्गावरून चालायला लागलो की आपल्याला फॉलो करणारे लोक पथभ्रष्ट होत नाहीत. हाच अधिकार मोहरक्या किंवा अधिकारी व्यक्तीने आपल्या मनात, अंगी बाळगून शांत-संयम ठेवून स्वच्छ-प्रांजळ वर्तन करून मार्गदर्शक वर्तन करावे! वाचक मित्रहो, मी लिहितोय त्यात आपण काही सुधारणा सुचवणे अपेक्षित आहे. या लिखनाला आपल्या सर्वांचे मार्गदर्शन किंवा योग्य-अयोग्य कोणत्या का असेना, पण प्रतिक्रिया याव्यात! असा माझा अट्टहास-आग्रह मुळीच नाही, परंतु जर एखादी सुचना आली, तर त्यानुसार आणखी चिंतन होऊन अपेक्षित बदलाच्या द्वारे नव्याने चिंतन मांडता येईल. तेंव्हा चला तर मग, आपण तुकोबांचे हे अनमोल-कालातीत शब्दधन जतन करून याच आधारे जीवनाला योग्य दिशा देण्याचा प्रयत्न करूयात! असे होणे म्हणजेच खऱ्या अर्थाने तुकाराम नीतीचे सार्थक होणे आहे! जय तुकोबाराय!

# संग्रामनगरमधील रेणुकामाता

आधुनिक केसरी




सुधीर कोर्टीकर,
संपर्क क्र. 9765553312


बीड बायपास मार्गावरून हजारो वाहनांची वर्दळ रोज सुरू असते. इतक्या गतिमान झालेल्या मानवी जीवनात सर्वांचे स्वागत करण्यासाठी उभी असणारी रेणुका माता हरिहर शक्तीपीठ मंदिराची ती कमान सर्वांचं लक्ष वेधून घेते. औरंगाबादच्या कानाकोपऱ्यातून येणाऱ्या भक्तांची पावले या कमानीतून आत येतात साधारण 65 फूट उंचीचा सर्वांग सुंदर मंदिर सर्वांचं लक्ष वेधून घेत. मंदिरावर आठ देशांच्या देवता आहेत हरिहर सद्गुरू शक्तीपीठाधीश आप्पा महाराज यांनी स्वतः तयार केलेली अप्रतिम मूर्ती रेणुका देवीची आहे .मंदिराच्या खालील बाजूस तळघरात श्री महादेव व श्री पांडुरंग यांच्या मूर्ती स्थापन केलेल्या आहेत रेणुका मातेची ही मूर्ती मनापासून तयार करून त्यावर शेंदूर लेपन केलेले आहे. या मंदिराची स्थापना श्री क्षेत्र सोनई येथील ब्रह्मी भूत पू. योगीराज हंसतीर्थ स्वामी महाराज ( अण्णा स्वामी महाराज ) यांनी ७ जुलै १९९८ रोजी केलेली आहे. मंदिराचा मंदिराचा सभा मंडप मोठा विस्तीर्ण असा आहे. आता मंदिराचे संपूर्णतया नूतनीकरण सुरू आहे .भव्य दिव्य मंदिर आता लवकरच साऱ्या भक्तांना पाहण्यास मिळेल. मंदिराच्या समोरील बाजूस पूर्वेस कालभैरवनाथाचे ..तर उत्तरेस वीर हनुमानाचे मंदिर आहे. मंदिराच्या मागील बाजूस छोटीशी विहीर असून बाजूलाच सप्तजल योगिनी मातेचं छोटंसं मंदिर आहे. मुख्य मंदिराच्या मागे परमपूज्य योगिराज हंसतीर्थ महाराज स्वामी महाराजांच्या (अण्णा महाराज.) पादुकांचे मंदिर आहे. मंदिरासमोरील बाजूस कर्तवीर्य देवतेचे मंदिर त्याच्या बाजूस गोशाळा देखील आहे. मंदिरात आश्रमात) शंभरहून अधिक सण उत्सव भक्तिभावाने साजरे केले जातात. चैत्रातील नवरात्र, हनुमान जयंती, सप्तजल मातेचे नवरात्र, गुरुपौर्णिमा, गोकुळाष्टमी, शारदीय नवरात्र, अण्णा महाराजांची जयंती, कालभैरव जयंती, खंडोबाच्या नवरात्र, दत्त जयंती, शाकांबरी नवरात्र, अण्णा महाराजांची पुण्यतिथी, महाशिवरात्र, होलिकोत्सव असे अनेक उत्सव मोठ्या प्रमाणावर मंदिरामध्ये साजरे करण्याची परंपरा आजही कायम आहे. मंदिरात सकाळी काकड आरती, महापूजा, दुपारची आरती, सायंकाळी राजोपचार आरती, रात्री पंचारती, असे विविध विधी वैदिक पद्धतीने करण्याची परंपरा आजही कायम आहे. नवरात्रात उत्सव मूर्ती तयार करण्याची परंपरा आहे. यावर्षी महिषासुरमर्दिनीची मूर्ती तयार केलेली आहे. नवरात्रात सकाळी शास्त्रीय गायन ...पूजा, आरती प्रदक्षिणा, ग्रंथ पारायण, नैवेद्य, आरती, सर्व भक्तांसाठी प्रसाद व दुपारी भक्ती संगीत, सायंकाळी राजोपचार आरती, रात्री पंचपदी, भजन, अष्टमीला शतचंडीचे होम हवन, नवमीला महाप्रसाद, करण्याची परंपरा मंदिरात पूर्वापार पद्धतीने सुरू आहे. शहरापासून दूर असलेल्या या संग्राम नगरातील रेणुका माता मंदिरात भक्तगण येतात नी मंत्रमुग्ध होऊन जातात. या मंदिरातील शांत.. सुंदर.. गुरुकुलाची परंपरा जपणाऱ्या आश्रमाला स्वतःहून भेट देतात. आणि त्या ठिकाणी हारवून जातात .अत्यंत सुंदर भक्तीभाव असणाऱ्या रेणुका मातेचे रूप अंतरंगात साठवून घेतात . या मंदिरात एकदा आलेले भक्तगण वारंवार या रेणुका माते वरील अपारश्रद्धेमुळे नेहमी येतात हे बाकी खरं.



# मला भेटलेले गांधीजी

आधुनिक केसरी

गांधीजींची माझी पहिली आठवण ३० जानेवारीची आहे. १९८८ ला मी शाळेत होतो. प्राथमिकचा चौथीचा वर्ग. आईने शाळेत जाण्यापूर्वी सांगितल. आज हुतात्मा दिन आहे. सकाळी आकरा वाजता भोंगा वाजेल. रस्त्यावर, जिथे कुठे असशील तिथे तसाच उभा राहा. कशासाठी ? मी विचारल. गांधीजींची स्मृती म्हणून,अस सांगितल. आकरा वाजता भोंगा वाजला. मी होतो तिथे रस्त्यात उभा राहिलो. ही गांधीजींची पहिली आठवण. पुढे लवकर गांधीजी भेटले नाहीत . आता तीस जानेवारीला आकरा वाजता भोंगा वाजतो का ? माहिती नाही. बऱ्याच वर्षात ऐकला नाही. गांधीजी नाहीत. आईही नाही.



गांधी जयंतीची चर्चा ऐकली अन हे सारे आठवले. आईला गांधीजींविषयी एवढा जिव्हाळा का असावा? तिने काही गांधीजींना पाहिले नव्हते. तिच्या शाळेत पंडित नेहरू, राधाकृष्णन आले होते. त्या आठवणी ती सांगत असे. गांधीजी गेल्यावर तिचा जन्म झाला. तरीही तेव्हा पन्नास वर्षानंतर तिने एक संस्कार कायमचा केला. आज मागे वळून पाहतो तेव्हा गांधीजीनी तिच्यावरच नव्हे देशातील असंख्य स्त्री पुरुषांवर कायमचा ठसा निर्माण केला हे जाणवते . माझी आजी ती तर अल्पशिक्षित .ती टकळीवर सुत कातत असे. आजूबाजूच्या बायकांना भगवदगीता शिकवत असे. हे काही गांधीजींकडून आल होत अस मी म्हणणार नाही. तसे काही होत का हे काही मी आजीला विचारलेल नाही. तेवढ विचारायची माझी तेव्हा अक्कलही नव्हती. पण टकळी आणि गीता हे दोन्ही आपल्या परंपरेतून आलय हे नक्की. परंपरेला अहिंसात्मक अस्त्रात गांधीजीनी बदलवल हे मात्र नक्की. यानंतर गांधीजी भेटले ते शालेय इतिहासाच्या पुस्तकात. पण विशेष वेगळे लक्षात राहिले नाहीत. लक्षात राहावेत असे कष्टही कुणी घेतल्याचे आठवत नाही. इतिहासाच्या पुस्तकात रेघोट्या मारण्यासाठी गांधीजी विद्यार्थ्यांमध्ये सर्वात प्रिय होते हे मात्र नक्की. तेव्हा तरी शाळेत गांधी जयंती साजरी होत नव्हती. कधी तरी स्वातंत्र्यचळवळीत गांधीजीइतकेच भगतसिंग महत्वाचे होते असे एखादे शिक्षक सांगायचे.



आज गांधीजींच्या सत्याग्रहाचा मार्ग काही प्रमाणात अवलंबून सत्तेवर येणाऱ्या आम आदमी पक्षाने भगतसिंग हे आपले आयकॉन बनवले आहेत. अण्णा हजारेना मात्र ते विसरले आहेत . मोदीही गांधीजींची आठवण काढत राहतात. परदेशात भारताच्या पंतप्रधान, राष्ट्रपतींनी भेट दिली आणि गांधीजींचा छोटा पुतळा, त्याचे अनावरण, एखाद्या चौकाचे महात्मा गांधी चौक असे नामकरण, गांधीजींची एखादी वस्तू, परदेशी विद्यापीठात गांधीजींविषयी एखादे भाषण, गांधीजींचे एखादे पुस्तक याचे आदानप्रदान, याची छोटी का होईना बातमी आली नाही असं होत नाही. माझे आजोबा केसरी वाचत असत. हाच पेपर ते का वाचत असावेत हा प्रश्न तेव्हाही पडत असे. ते टिळक पक्षाचे होते का ? माहित नाही. मुळात असा प्रश्न विचारण्याइतके नॉलेज तेव्हा नव्हते. कदाचित टिळकांचा म्हणून ते केसरी टिळक गेल्यावरही साठ वर्षाने वाचत असावेत . गांधीजी असा कुठला पेपर काढत असत ? जनरल नॉलेजचा प्रश्न म्हणून उत्तर देता येईल. पण असा कुठला पेपर सध्या तरी रोज वाचायला मिळत नाही. त्यांचा पेपर काही राष्ट्रीय ठेवा नाही म्हणून अस असेल का ? न्याशनल हेरॉल्डचे वाद सुरु आहेत, त्यापेक्षा गांधीजींनी सुरु केलेले पेपर आज सुरु नाहीत हेच बर असाव ... नंतर गांधीजी कॉलेजला आल्यावर भेटले. तेही शेवटी शेवटी . एम ए च्या सेकंड पार्टला असताना. पहिल्यांदी भारतीय राजकीय विचारवंत या पेपरमध्ये एक विचारवंत म्हणून. ते कमी होत म्हणून की काय, पुन्हा पुढच्या सेमला थेअरीच्या पेपरमध्ये. आता गांधींचा गांधीवाद झाला होता या पेपरमध्ये. गांधीवाद असा कुठलाही वाद नाही ,अस गांधीजींनी सांगितलं होत, अस त्या प्रकरणात शेवटच वाक्य होत. आज गांधीजी हे भारतीय एवढ्याच चौकटीपुरते मर्यादित बसणारे विचारवंत होते का, असे वाटून आणखी एक पेपर होता, पाश्चिमात्य विचारवंत नावाचा. गांधीजी त्या पेपरमध्ये का नव्हते ? केवळ भारतात जन्मले या कारणामुळे त्यांना पाश्चिमात्य विचारवंत या पेपरमध्ये टाकण शक्य नसाव . खर तर पश्चिमेत गेले नसते तर मोहनदास करमचंद गांधी हे गांधीजी झाले असते का ? एरवी तर ते फक्त पोरबंदरचे दिवाण पुत्र म्हणून मुंबईमध्ये एखादी नामवंत वकिली फर्म चालवत राहिले असते. खर तर गांधीजी हे जागतिक विचारवंत होते आणि आहेत पण असा काही पेपर तेव्हा तरी नव्हता म्हणून गांधीजी त्या नसलेल्या पेपरमध्ये नव्हते . ते तर पूर्व आणि पश्चिम या पलीकडे गेलेले होते . अभ्यासक्रम निर्मितीची नई तालीम तोवर आपण स्वीकारलेली नव्हती . कस्तुरबा साकारल्यामुळे तुमच्या आयुष्यात काय फरक पडला अस रोहिणी हट्टंगडी यांना कोणी विचारल होते . Third Chance अस रोहिणी म्हणाल्या . पूर्वी समोरची व्यक्ती मी समजून घेण्याचा काही वेळेला दुसरा प्रयत्न करत असे. आता आणखी एक संधी देते. उदारमतवाद अंगी बाणला अस काहीस रोहिणी म्हणाल्या होत्या. गांधी सिनेमा अनेकदा टी व्ही वर पाहीला. पण जास्त लक्षात राहिला तो शाम बेनेगल यांचा मेकिंग ऑफ महात्मा हा सिनेमा. आफ्रिकेत जुलमी कायद्याची कागदपत्रे जाळण्याचा प्रसंग, पोलिसांचा छडी हल्ला, रेल्वेतून उतरवून देण्याचा प्रसंग, घोडागाडीत दाटीवाटीने बसण्याचा प्रसंग. हे प्रसंग पाहताना डॉ. आंबेडकरांची तितक्याच प्रकर्षाने आठवण येते. मी एम. ए. ला असताना दिलीपराव धारूरकर यांनी वर्गात सध्या कोणते राजकीय विचारवंत शिकतो आहेस? असे विचारले होते . मी महात्मा गांधी असे सांगितले .त्यावर त्यांनी गांधीजींविषयी तुम्हाला वर्गात काय शिकविले? असे विचारले. मग गांधीजींचे आंतरराष्ट्रीय योगदान स्पष्ट करण्यास सांगितले. मला हा पेपर शिकविणारे शिक्षक फारसे बहुश्रुत म्हणून प्रसिद्ध नव्हते. मीही फारसे समाधानकारक उत्तर देऊ शकलो नाही. त्यावर त्यांनी गांधीजींचा काळ ,पहिले आणि दुसरे महायुद्ध, जगातील अनेक देशात भांडवली हुकुमशाहीचा झालेला उदय याचा प्रवास घडवून आणला.शेवटी ते म्हणाले, गांधीजी नसते तर भारतात त्यावेळी एखादा हिटलर, मुसोलिनी जन्माला आला नसताच असे नाही.एवढेच नव्हे तर गांधीजींमुळे, गांधीवादी तत्त्वज्ञानामुळे दोन महायुद्धाच्या दरम्यान जगातील अनेक देशात भांडवली हुकुमशाहीचा उदय होण्यापासून थांबला . एक वेगळा दृष्टीकोन मला राज्यशास्त्राचा विद्यार्थी म्हणून मला मिळाला. हे टिपण वाचल्यावर माझे वडील म्हणाले, एक गांधीबाबा मी पाहिले होते. मी म्हटले कधी, कुठ ? चासमध्ये, ते म्हणाले. गावातले कार्ले नावाचे वयोवृद्ध गृहस्थ स्वातंत्र्यसैनिक होते. शेवटपर्यंत गांधीवादी तत्वाने जगले. सगळा गाव त्यांना आदराने गांधीबाबा असेच म्हणत असे. ते स्वतः विणलेली जाडी भरडी खादी वापरत. चहा घेत नसत. त्यांनी कुठलीही पेन्शन घेतली नाही. पुढे वडील म्हणाले, अभ्यासाचा भाग म्हणून शाळेत मीही सुत कातत असे. शाळेत आणि घरातही हातमागावर कापड विणत असे. कालांतराने बाजारातून आयते सुत आणून शाळेत जमा करण्याची चोरवाट राजमान्य झाली. नंतर हा मूलोद्योगही हद्दपार झाला. Thank U गांधीजी. तुमच्यामुळे मला माझेच गाव आणि माझ्या वडिलांविषयी अधिक काही कळले. आज इटलीमध्ये मुसोलिनीचे कौतुक करणाऱ्या महिला नेत्या आणि त्यांच्या पक्षाची बहुमताकडे वाटचाल सुरु असल्याचे वाचले . आणि गांधीजी पुन्हा आठवले . बस इतकच . बाकी शून्य .

डॉ. श्रीनिवास भोंग
९४२३७८३२३५

# नवशक्तीचे नऊ रंग





## सातवा दिवस-रंग केशरी

प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

नवरात्र! नऊ दिवस, नऊ शक्ती, नवविधा भक्ती आणि नऊद्वारांवर नियंत्रण ठेवण्यासाठी करावयाच्या साधनेचे उत्तम काळ! बघता बघता हा उत्सव घेऊन आपण उत्तरार्धात पोहोचलो आहोत. आज सातवा दिवस! सातव्या दिवशी नवा विचार आणि वेगळी आराधना! विविध रूपाच्या आणि अनेक अवस्थेत असणरी देवीची रूपं ही माणसाला विचारप्रवण करणारी आहेत. श्री देवी माता यांच्याकडे ज्या विविध शक्ती एकवटल्या आहेत त्या सर्वच शक्ती माता आपल्या अपत्याकडे संक्रमित करत असते. नव दिवस आपण नवविधा भक्तीवर लक्ष केंद्रित करणे गरजेचे आहे! त्याचबरोबर नवरात्रोत्सव हा कृषिप्रधान आणि मातृसत्ताक कुटुंब पद्धतीचे द्योतक आहे हे आपण या अगोदरही पहिले आहे.नवरात्रीच्या रंगांविषयी लिहायला घेतल्यापासून अनेक तज्ञ मंडळींकडून महत्वपूर्ण माहिती संकलित होत आहे, हे या लिखाणाचे सर्वात मोठे फलित आहे! सेनगाव येथील श्री कुलकर्णी सरांनी, 'नऊ रंगांची ही मूळ प्रथा नसून आधुनिक काळाची ही देन आहे. केवळ ही एकफॅशनआहे' असे सांगितले. आणखी एक वाचक श्री नाना ढवळे सरांनी सांगितले की; नऊ दिवस श्री देवीचे अस्तित्व असणारी वनस्पती, औषधी गुण आणि त्या दिवशी अर्पण करावयची फुले! ही माहिती खूपच मुलभूत आणि उपयोगाची आहे. हरडे, ब्राह्मी, कोथिंबीर, कोहळा, आळशी, माचीका, कडू दवणा, तुळस आणि शतावरी या नऊ वनस्पतींमध्ये श्री देवी मातेचे अस्तित्व असून ह्या सर्वच वनस्पती औषधी असून दैनंदिन आहारात, विविध रोगांवर गुणकारी उपाय आहेत! त्याचबरोबर नऊ दिवस निसर्गात सहजतेने उपलब्ध असणारी फुल जसे पांढरी कनेरी, वडाचं पान-फूल, शंखपुष्पी फुलं, पिवळी, निळी, बोरीची फुलं, गुंज आणि जास्वंद इत्यादी विविधरंगी फुलं वाहण्याची मुळ प्रथा आहे! असो अशी निसर्गाच्या अनुषंगाने येणारी माहिती अत्यंत मोलाची असून आपण आयुर्वेदिक वनस्पतींचा आपल्या दैनंदिन जीवनात उपयोग करावा. आता हेल्दी सिझन सुरु होणार असला तरी सगळीकडे सर्दी-अंगदुःखी सारख्या रोगांनी तोंड काढले आहे. या छोट्यामोठ्या रोगांना घाबरून न जाता विविध वनस्पतींचे काढे घेऊन ऋतबदलावरील होणाऱ्या रोगांवर नियंत्रण मिळवायला हवे! हा सुद्धा या नऊ रात्रीच्या नऊ वनस्पती पुजानातून धडा घ्यायला हवा! आज सातवा दिवस! सातवी माळ! श्री देवी कालरात्री रूपाने प्रकटली आहे. आज श्री देवी मातेच्या अक्राळ-विक्राळ आणि कृष्णवर्ण रूपावरून मातेचे नाव कालरात्री पडले असावे. आज मातेचे अत्यंत क्रोधायमान रूप पाहायला मिळत असून तिचे हे दर्शन सहजतेने दर्शकाच्या मनात धडकी भरवते. अनेक भयंकर राक्षसांचा वध करून मातेने दुष्ट-नकारात्मक शक्तींचा निःपात केला असून आपल्या भक्तांना मात्र ती प्रेमाने कृपांकित करत आहे. आज साधकाने आपले मन सहस्त्राकार चक्रावर केंद्रित करून साधना केल्यास आंतरिक शक्ती प्रबळ होतात. मन निर्विकार होऊन भयापासून मुक्त होते. आज माता केशरी वस्त्र परिधान करून आली आहे. केशरी रंग हा सूर्योदयाचा असून तो नवनिर्मितीचे प्रतिक आहे! केशरी रंग हा हिंदू, बौद्ध आणि जैन धर्मात त्यागाचे प्रतिक म्हणून प्रकर्षाने वापरला जातो. केशरी रंग अग्नी, तेज, ज्ञान, त्याग, शांतता, शौर्य, वीरता, सन्मान, ऊर्जादायी विचारांचे प्रतीक असून आपण सर्वानीच या रंगाची जाण ठेवली पाहिजे. चला तर मग, केशरी रंग कुणाचाही द्वेष-मत्सर करायला शिकवत नसून तो त्यागाचे प्रतिक आहे याचे भान बाळगून आपला देश शांत-संयमी-विद्वान युवकांचा होण्यासाठी कटिबद्ध राहुयात! ॐ ऐं ह्रीं क्रीं कालरात्रै नमः।

# भुजबळांचे विधान हा तर सावित्रीबाईंचाही अपमान

अनेक शाळांमध्ये सावित्रीबाई फुले यांचा फोटो दिसत नाही तो लावला पाहिजे. त्यांच्यासह महात्मा फुले, शाहू महाराज, बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, यांचे फोटो लावले पाहिजे तर तेथे सरस्वतीचा फोटो, शारदा मातेचा फोटो पाहायला मिळतो. या सरस्वतीने आम्हाला शिकवले नाही बाजूला केले त्यांची पूजा कशाला करायला हवी ? शाहू फुले आंबेडकर यांचे फोटो लावायला पाहिजे, नंतर देवाचे फोटो लावा. शारदा मातेने शिक्षण दिलं असेल तर ते फक्त तीन टक्क्यांना दिलं असेही ते एका कार्यक्रमात म्हणाले. म्हणजेच त्यांचा हेतू हा ब्राह्मण समाजाकडे बोट दाखवण्याचा आहे स्पष्ट दिसते. ज्या शारदा मातेला आणि सरस्वतीला कोणी पाहिले नाही की तिने आम्हाला शिकवलं नाही आणि शिकवल असेल तर तीन टक्के लोकांना शिकवलं आम्हाला दूर ठेवलं त्यांची पूजा कशासाठी करायची आहे असेही ते आपल्या भाषणात म्हणाले.
या सर्व गोष्टी वर भाजपा, ब्राह्मण महासंघ आनंद दवे, ,परशुराम सेवा महासंघ विश्वजित देशपांडे,पार्थ बावस्कर, वक्ते ईतिहास अभ्यासक, यांच्याकडून तसेच समाजातून संतापाची तीव्र प्रतिक्रिया उमटली असून भुजबळांचा व त्यांच्या वक्तव्याचा निषेध केला आहे. तसेच त्यांनी माफी मागावी असेही म्हटले आहे. परशुराम सेवा संघाने भुजबळ यांना कायदेशीर नोटीस पाठवली असल्याचे वाचण्यात आले .या तीन टक्क्यांना भुजबळ का घाबरतात ? सरस्वतीने शारदा मातेने बुद्धिवाटप केले त्यावेळेला भुजबळ चाळणी घेऊन गेले होते काय ? असे प्रश्न उपस्थित केला जात आहे.
भारतीय जनता पक्षाचे प्रवक्ते राम कदम म्हणाले महापुरुषाचे फोटो लावून त्याची पूजा झाली पाहिजे तसेच त्याचे विचार आपण अमलात आणले पाहिजे.ते आपण लावतच असतो परंतु. भुजबळांना हिंदू देवदेवतांची चीड का आहे हा प्रश्न आहे .गणपती, देवी, सरस्वती, हे कोट्यावधी हिंदूंचं श्रद्धास्थान आहे आणि त्याबद्दल असं बोलण कोणालाही आवडणार नाहीये. उद्या ते म्हणतील कशाला हवीत मंदिर ? आणि कशाला हवेत देवदेवता ?
तर उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी म्हटले आहे हिंदू संस्कृतीत माता सरस्वती आणि शारदा देवीला सगळ्यांच्या मनात मानाने स्थान आहे. आहे ती बुद्धीची देवता आहे. भारतीय संस्कृती आणि परंपरा आणि हिंदुत्व मान्य नसलेला व्यक्तीच असे विधान करू शकतो.
कोणत्याही परिस्थितीत माता सरस्वतीची प्रतिमा हटवणार नाही. तर चित्रा वाघ म्हणाल्या एकेकाळी नथुरामचे पुतळे उभारू असे म्हणणारे भुजबळ हेचं. सावित्रीबाईंचे मोठेपण मान्य तरीपण सरस्वतीला विरोध का ? ज्या साडेतीन टक्क्याबद्दल बोलताय त्यातल्याच एकाच्या भिडे वाड्यात सावित्रीबाईंनी शाळेची सुरुवात केली हे ते विसरतात का ? बोलण्याचे स्वातंत्र्य आहे याचा अर्थ काही बरळावे असे नाही.
खरं तर त्यांनी सरस्वतीचा अवमानच केलेला आहे, आणि त्याचबरोबर.. सरस्वतीचा हा दरबार खुला झाला पाहू चला शाळेमधून शिकूनी घेऊ ज्ञान मिळवून चला ग चला...
अशा रीतीने शाळेला सरस्वतीचा दरबार म्हणणाऱ्या तसेचसरस्वतीच्या दरबारात शिक्षण घेण्यास जाऊ चला विद्यादेवीस प्रसन्न करुनी वर मागू तिजला चला.... काव्य फुले या सावित्रीबाई ज्योतिबा फुले यांच्या संग्रहाचे मुखपृष्ठ हे श्री शंकर पार्वती चे चित्र आहे तसेच त्या इशस्तवनात म्हणतात आम्ही लेकरे तुला प्रार्थना करतो विद्यादेवी ज्ञान इच्छितो दैन्यासूर संहारा... श्रीधरा. शिवस्तोत्रात म्हणतात. त्या शंभूला पुजुनिया वर मागते मी जिभेवरील बसूनी तू रची काव्य नामी. असे म्हणणाऱ्या सावित्रीबाई फुले यांचाही त्यांनी अपमान केलेला आहे. खरे म्हणजे सरस्वती बद्दल शारदा माते बद्दल असे उद्गार काढण्याआधी त्यांनी सावित्रीबाई फुले यांचा "काव्य फुले" हा काव्यसंग्रह वाचायला हवा होता. फक्त शाहू




फुले आंबेडकर असा आपल्या भाषणात उल्लेख करून भागणार नाही. स्वतः आधी महापुरुषांच्या विचारांचा आणि लिखाणाचा त्यांनी अभ्यास करावा,ते आत्मसात करावे, असे त्यांना सांगावेसे वाटते, उगीच आपली मुक्ताफळे उधळू नये. भारतीय जनता पक्षाचे नासिक शहराध्यक्ष गिरीश पालवे यांनी म्हटले आहे छगन भुजबळ यांना सावित्रीबाई फुले समजलेच नाहीत तसेच ते पुढे म्हणतात सावित्रीबाई फुले यांच्या सर्व साहित्यावर देवी देवतांचे फोटो आहेत भुजबळ यांनी बोलताना अभ्यास करून बोलावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे, तर भुजबळांची विधाने हिंदू देवतांचा अपमान तर आहेच पण असे वादग्रस्त विधान करून कोट्यावधी हिंदूंच्या भावना त्यांनी दुखविल्या आहेत त्यांनी हिंदूंची जाहीर माफी मागावी. याच प्रकारे परशुराम सेवा मंडळ प्रदेशाध्यक्ष विश्वजीत देशपांडे यांनी भुजबळ यांनी माफी मागावी असे जाहीरपणे म्हटले आहे अन्यथा त्यांच्यावर कायदेशीर कारवाईसाठी कार्यवाही करण्यात येईल असे म्हटले आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भुजबळांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया व्यक्त करून नाराजी दर्शनी आहे व कुठल्याही परिस्थितीत असे फोटो काढले जाणार नाहीत असे म्हटले आहे. ज्या नवरात्र उत्सवात माता महाकाली महालक्ष्मी आणि महासरस्वतीची आपण पूजा करतो नवदुर्गा म्हणून स्त्रीचा सन्मान करतो त्याच काळात त्यांना अशी दुर्बुद्धी व्हावी.
भ्रष्टाचाराच्या आरोपाखाली अडीच वर्षे जेलमध्ये जाऊन जामीनावर सुटून आलेल्या छगन भुजबळांची समाजात काय प्रतिमा आहे हे सगळे जण जाणून आहेत.महापुरुषांच्या आचार विचारांशी ते किती प्रामाणिक आहे ? तेव्हा एकच गोष्ट त्यांनी लक्षात ठेवावी. छगन भुजबळ तुम्ही चुकलेच. आता किमान मनाचा मोठेपणा दाखवून चूक मान्य करून ब्राह्मणांची आणि समस्त हिंदूची माफी मागावी. आणि परत पुन्हा असे बेजबाबदार पणाचे वक्तव्य करणे टाळावे.

दिलीप देशपांडे
८९९९५६६९१७

# तीन दिवसांची नगर भेट : आँखो देखा हाल!

आधुनिक केसरी

**या वर्षी पाऊस थोडा लांबला होता त्यामुळे नगर भेटीचे नियोजन सारखे मागे पुढे होत होते. शेवटी निश्चित केले की आता न थांबता नगरला भेट दिलीच पाहिजे कारण आमचे जिवाभावाचे मित्र सारखी आठवण काढीत होते. नगरला कितीही भेटी दिल्या तरी नगरला जायची ओढ कमी होत नाही हेच खरे! मी ज्या ठिकाणी शिकलो त्या सीएसआरडीचे आमंत्रण अगदी वेळेवर आले व नगर भेटी साठी मी व माझा मित्र अविनाश पाटोळे माझ्या कारने नगरला २३सप्टेंबरला दुपारी निघालो. नगरमधील शक्कर चौक ओलांडून पुढे गेलो की माथ्यावर अवाढव्य लांबलचक ओव्हर ब्रीजचे काम प्रगतीपथावर आहे. उन्हाळ्यात या ब्रीजच्या खाली खूप सावली मिळणार हे मात्र नक्की! आता काही दिवसात ब्रीजवरुन गाड्या भन्नाट जाणार असे दिसते! गप्पागोष्टी करताना नगर कधी आले ते समजले सुद्धा नाही दुपारी तीन वाजता केडगावला न्यु सचिन हॉटेलमधे पेटपुजा केली व डायरेक्ट सीएसआरडीचे गेस्टरुम गाठले.**

सीएसआरडी फिरताना या परिसरात बरेच बदल झाले आहेत हे जाणवले. दुपारी थोडा आराम करुन आमची जोडी निघाली नगर फिरायला. सीएसआरडीच्या शेजारच्या रोडने कलेक्टर कचेरी मार्गे डावरे गल्लीतून थेट पारशा खुंट गाठला तेथून सरळ जुना कापड बाजार मार्ग नव्या कापड बाजारात आलो. या संपूर्ण रस्त्यावरून उड्या मारत चालताना मजा येत होती इतके खड्डे या रस्त्यावर आहेत. दुकानेच दुकाने! कुठली वस्तू मिळत नाही असे नाही. इतकी विविध दुकाने या रोडवर आहेत. एक मात्र लक्षात आले रस्ते लहान होत आहेत दुकाने वाढत आहे. नगरचे एक वैशिष्ट्य आहे जिथे रिकामी जागा दिसेल तिथे दुकाने थाटली जातात. पुढे पूर्वीचा प्रसिद्ध सेन्ट्रल बँक चौक आला. नवी पेठेत वळण घेतले, एके काळची सुंदर नवी पेठ आता दुकानांची पेठ झाली आहे. जुने वाडे काळाच्या पडद्या आड गेले आहेत. या पेठेत टू व्हिलरची रेलचेल इतकी वाढली आहे की नुसत्या गाड्याच गाड्या... दिसत होत्या. या रस्त्यावरही खड्डे काही संपत नव्हते. आमची नवीन मराठी शाळा या दुकानांमुळे कुठेतरी लुप्त झाली होती. या चौकात पाऊस नसतानाही पाणी व चिखल दिसत होता... तेव्हा चालताना कसरत करावी लागत होती. आमच्या मित्राचे गुंडू क्रियेशन हे साडी दुकान शोधून काढले छोटे परंतु अनेक व्हरायटीने भरलेले हे टुमदार दुकान मस्त आहे. दुकानातील अंबादास हा शांत स्वभावाचा माणूस.
या व्यक्तीमत्वामुळे मनसोक्त साडी खरेदीचा आनंद घेतला...मजा आली. चला आता घासगल्लीतून पुढे जाऊ! रस्त्याच्या मधोमध अनेक टप-या थाटलेल्या दिसत होत्या त्यामुळे या रस्त्यावर टपरीचा डिव्हायडर तयार झाला आहे. मोची गल्लीतही हिच परिस्थिती आहे. । रोडवर खूपच दुकाने असल्याने चालणाऱ्या माणसाला जपून चालावे लागते. तसेच चालत नव्या कापड बाजारातील घासगल्ली चौकात आलो. समोरच नितु ड्रेसेस चे दुकान दिसले सरळ आत घुसलो. माझ्या गल्लीवाला जुना मित्र दिपक तलरेजा दिसला खूप आनंद झाला.. दिपक म्हणजे एकदम गप्पीष्ठ माणूस. दुकानातच गप्पाचा फड रंगला दिपकला समाजकार्याची आवड असल्याने त्याने लगेच दुसऱ्या दिवसाची स्नेहालयची व माझी मिटींग ठरवली. कापड बाजारातील फेमस रगडा कचोरीचाअस्वाद घेतला. बाजरातील दुकाने बघत जुन्या आठवणी जागवत गेस्ट हाऊसवर आलो. रात्री सीएसआरडीच्या होस्टेलवरील एका रुममधे एमएसडब्ल्युच्या विद्यार्थ्यांबरोबर गप्पा झाल्या अनुभव कथन झाले. एकच संदेश त्यांना दिला! जे कराल ते मन लावून करा! यश तुमचेच आहे! त्यामुळे ही सर्व मुले आमचा प्रवास ऐकून मस्त चार्ज झाली. २४ तारखेला सकाळी अकरा वाजता सीएसआरडीच्या हालमधे विद्यार्थी वेलकम कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण होते या कार्यक्रमात स्टेजवरुन विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधताना एमएसडब्ल्युचे महत्त्व अधोरेखीत झाले. सर्व विद्यार्थी आमचे विचार ऐकून खूष झाले होते. कार्यक्रमात सारखे फोन येत होते पठारे सरांची परवानगी घेऊन तडक फिरोजभाईंचा बाम्बे किचन कारखाना कम आफीस गाठले. फिरोजभाई म्हणजे माहितीचे भांडार. एकदम फिट माणूस. फिरोजभाई म्हणजे तत्वाने वागणारा.त्यामुळे त्यांच्याबरोबर नगरमधे फिरताना मोठा आधार वाटत होता. घरातील स्वयंपाक घराला आधुनिक लुक देण्याचे काम फिरोजभाई व त्यांची मुलं करतात तो कारखाना बघितला. या कारखान्यात किचनचे काम जोरात चालू असते. कारखाना बघे पर्यत निरोपानुसार आमचे मित्र विनोद गुंडू,डाक्टर रमेश कोठारी,माजी नगरसेवक दत्ता भागानगरे त्यांचे बंधू अशोक भागानगरे फिरोजभाईकडे हजर होते. मस्त गप्पा रंगल्या. समाजासाठी काय करता येईल यावर साधक बाधक चर्चा झाली. सर्वांनाच खूप बरे वाटले. धनेश बोगावत बिझी असल्यामुळे भेटू शकला नाही परंतु फोनवर गप्पा झाल्या.. सावेडीकडे जाताना एक बदल दिसून आला तो म्हणजे जुन्या नगर मधे खड्डे व पार्कींगचा मोठा प्रश्न आहे. परंतु आपण सारडा कालेज ओलांडले की नवीन सावेडी मधील आतील भागात



ब-यापैकी रस्ते झाले आहेत. असेच रस्त्याचे काम जुन्या नगरमधे का होत नाही असा प्रश्न मनाला पडला. गजराज ड्रायक्लिनरचे संस्थापक सुरेशभाऊ चव्हाणाचे सारखे फोन येत होते. आमच्या सर्वांचा मोर्चा पाईप लाईनरोड वरील गजराजकडे निघाला. सुरेखभाऊ चव्हाण डा.कोठारी,विनोद गुंडू फिरोजभाई भागानगरे बंधू ही मंडळी ब-याच वर्षांनी एकत्र भेटत होते मस्त गप्पा रंगल्या. मित्रांनो, कपडे धुणे व इस्त्री करणे हे आपण नेहमी बघत असतो परंतु आज मी कपडे धुणे,वाळवणे ड्राय क्लिनिंग करणे याचा कारखानाच बघितला. गजराज ड्राय क्लिनिंग म्हणजे कपड्यांना नवीन लूक देण्याचा कारखाना. कपड्यावर प्रक्रिया करण्याची सर्व कामे या कारखान्यात अटोमटीक मशिनवर होतात. साडी नुसती मशिनमधे सरकवली की ड्रायक्लीन होऊन बाहेर येते. इस्त्री करण्याच्या प्रेस मशिनमधे कपडा ठेवला की लगेच इस्त्री. या कपड्यावर कुठेही रींकल नाही गजराजमधे ५० कारागीर काम करतात काही कारागीर लहानपणापासून भाऊंकडे आहेत. रोज शेकडो कपडे छान इस्त्री करुन बाहेर पडतात. एखादा म्हातारा माणूस गजराज मधे गेला व सुरेशभाऊ बरोबर गप्पा झाल्या की हा म्हातारा सुद्धा तरुण होऊन बाहेर पडतो. असे दिलखुलास व्यक्तीमत्व सुरेशभाऊंचे आहे. तसेच कपड्यांचे आहे सुरकुत्या पडलेले कपडे गजराजमधे गेले की तरुण पोरा सारखे फ्रेश होऊन बाहेर पडतात. असा हा कपडे धुण्याचा भला मोठा कारखाना नगरमधे आहे याचा आम्हाला अभिमान आहे. सुरेशभाऊ चव्हाण म्हणजे गप्पांचा धबधबा..! नुसते ऐकत रहा! हाँसी मजाक विनोद, गप्पागोष्टी, जुनी गाणी, मित्र आणि मैत्री, खाओ खिलाओचे शौकीन याचा सुंदर मिलाफ म्हणजे, सुरेशभाऊ चव्हाण गजराज! त्यांच्याशी बोलले की माणूस एकदम फ्रेश होतो. त्यामुळे कोणीना कोणी भाऊंकडे कायम बसलेले असतेच संध्याकाळी स्नेहालयच्या रेडिओ नगर स्टेशनला भेट दिली. स्नेहालयचे संस्थापक गिरीषजी कुलकर्णी,भूषणजी देशमुख यांची फिरोजभाईं बरोबर भेट झाली. छान गप्पा झाल्या. नंतर भूषणजी देशमुख यांनी फिरोजभाई यांच्या बरोबर ग्रामीण विकास या विषयावर माझी सविस्तर मुलाखत घेतली. ग्रामीण भागातील प्रश्नावर उत्तरे शोधण्याचा आम्ही प्रयत्न आम्ही केला. संध्याकाळी चितळेरोड वरील पतंगे टेलर्स म्हणजे बाळासाहेब पतंगे आमचे जुने मित्र. या दुकानात आमचे १९७५ सालातील मित्र वसंतराव कदर भेटले व परत छान गप्पा रंगल्या. भागानगरे बंधूचा घरी येण्याचा आग्रह होता. गिरिजा सायकल मार्ट हे रंगार गल्ली मधील भागानगरे बंधूंचे जुने दुकान आहे. आगे दुकान पिछे मकान! सायकल दुरुस्तीमधे हे बंधू व त्यांची मुलं एकदम मास्टर. गिरीष भागानगरे तर दोन तीन मिनिटांत

विश्वास सोहोनी
9850995652

सायकलचे पंक्चर काढतो. ही सर्व भागानगरे फमिली क्रिकेट प्रेमी. त्यामुळे छान गप्पा रंगल्या. कैलास हाटेलचे कैलासराव भोसलेजी, विनोदजी गुंडू, मार्कंडेय विद्यालयाचे मुख्यध्यापक दिपक रामधीन सर,लोकमान्य चहाचे अशोक भट्ट यांच्या बरोबर नगरमधील जुन्या आठवणीच्या गप्पा रंगल्या. हे सर्व ऐकताना खूप छान वाटले. रात्री परत सुरेशभाऊ बरोबर सावेडीतील बेल्हेकर यांच्या जय आनंद हाटेलमधे भोजन घेतले. हाटेल एकदम साधे! परंतु चव एकदम भारी! बसायला जागा नसते. तिथे मित्रांबरोबर मेथीची भाजी, झुणका भाकरी, डाळ भात असा मस्त ग्रामीण जेवणाचा बेत झाला. या हाटेलचे वैशिष्ट्य म्हणजे प्रत्येक पदार्थ लोखंडी कढईसह टेबलावर ठेवला जातो रसिक ग्रुपचे जयंत येलुरकर बरोबर होते ते नगर विकासासाठी कायम लिखाण करीत असतात. कितीही खा!बंधन नाही! फक्त उष्टे टाकू नका! एवढी एकच अट या हाटेलमधे आहे. तब्येत खुश झाली. कोरोना काळात या जय आनंद हाटेलने असंख्य गरीब लोकांना जेवण दिले होते. रात्रीच्या जेवणा नंतर आमचे मित्र पंतगे म्हणजे लग्नाचा सुट! अशी प्रसिद्धी असलेले बाळासाहेब पतंगे यांच्या घरी मुक्काम झाला. या मुक्कामात रात्री मस्त मराठी हिंदी गाण्यांची मैफील झाली रात्रीचे बारा कधी वाजले हे समजले सुद्धा नाही. २५ ला सकाळीच उठल्यावर बाळासाहेबांबरोबर भुई कोट किल्ल्या शेजारील नगर क्लबला भेट दिली. आता किल्ला खूप बदलला आहे बाहेरून किल्ल्याला सगळीकडे गोल कंपौन्ड घातले आहे. मागच्या बाजूचे खेळाचे मैदान आहे तसेच आहे. किल्ल्याच्या मागच्या बाजूला झाडाखाली केलेला अभ्यास आठवला फुटबालच्या मचेच आठवल्या. आज याच मैदानावर जेष्ठ नागरिकांचा हास्ययोग घेण्याचा योग आला सर्व जेष्ठ नागरिक खूष झाले. नंतर नगर क्लबमधे मारवाडी गुजराथी नाष्टा करुन लगेच भूईकोट किल्ला गाठला तिथे भुषणजी देशमुख वाट बघत होते. भूषणजी म्हणजे नगरचा चालता बोलता इतिहास नगरची काना कोपऱ्याची माहिती असलेले अभ्यासू व्यक्तीमत्व! त्यांनी स्थापन केलेल्या अहमदनगरी ग्रुप बरोबर जागतिक पर्यटनाच्या दिवशी वृक्ष मैत्री व स्वच्छतेची शपथ सर्व सदस्यांना दिली त्यामुळे सर्वांचा उत्साह वाढला होता. कार्यक्रमात पर्यटन विभागाच्या विभागिय आयुक्त श्रीमती चित्रा कुलकर्णी मडम आवर्जून उपस्थित होत्या. किल्ल्यावर नगरचा सायकल पटू लहाडे सुद्धा भेटला सारखा सायकलवरच फिरत असतो. वडार समाजासाठी काम करणाऱ्या श्रीमती विजयालक्ष्मी गुंजाळ ताईंनी वडार समाजावर तयार केलेले गीत आपल्या झोकदार आवाजात सादर केले.. छान वाटले ऐकायला ! नंतर सुनिलजी महाजन यांनी मिले सुर मेरा तुम्हारा हे गीत झाले. ही सुरमयी सकाळ खूप छान वाटली सकाळीच आमचे अजुन एक मित्र पांडुरंग डफळजी यांची नगर क्लबवर भेट झाली नंतर ते दिवसभर माझ्या बरोबर होते. पांडुरंगराव सुद्धा सुंदर लिखाण करतात. सकाळी ११ वाजता स्नेहालयचे कार्यकर्ते भारत कुलकर्णी यांनी एमआयडीसी जवळील स्नेहालय ही संस्था दाखवली या ठिकाणी उपेक्षित-शोषित बालके तसेच निराधार महिलांचे हक्काचे घर आहे या ठिकाणी या बालकांच्या व महिलांच्या सर्वांगिण विकासावर भर दिला जातो. अतिशय प्रसन्न वातावरण या परिसरात आहे. प्रत्येक जण नेमून दिलेले काम मन लावून करीत होता. अशी संस्था आपल्या नगरमधे आहे याचा मला अभिमान वाटला.
स्नेहालय या संस्थेमुळे नगरचे नाव राष्ट्रीय व अंतरराष्ट्रीय स्तरावर पोहचले आहे हे मी आज अभिमानाने सांगू शकतो.
आता आमचा परतीचा प्रवास सुरु झालाहोता. भाऊंचा निरोप घेऊन निघालो माझ्या विसरभोळे स्वभावामुळे कारची चावी शोधताना मोबाईल गाडीवर ठेवला गेला. चावी मिळाली पण मोबाईल परत खिशात ठेवायला विसरलो. गाडी चालू झाली व मोबाईल माझ्याकडे नाही हे लक्षात आले परत गाडी मागे घेऊन मोबाईल शोध सुरु झाला चव्हाणभाऊंचे सर्व मित्र गजराज समोरील रस्त्यावर जमा झाले होते. श्री भोसले यांची फोन शोधण्यात खूप मदत झाली त्याचे जाहिर आभार मानत आहे. तब्बल ४० काल माझ्या नंबरवर केले गेले नुसती रिंग वाजत होती परंतु काल उचलत नव्हता शेवटी डफळजीच्या फोन वरुन त्याने फोन उचलला गेला. ज्याला फोन सापडला होता त्याचा शोध सुरु झाला शेवटी दोन तासाने मोबाईल ताब्यात मिळाला माझ्या एका चुकीमुळे सर्वांनाच त्रास झाला त्यासाठी क्षमस्व!!
सर्वांचेआभार! या फोन नाट्यामुळे थकवा आला होता तरीही नंतर भूतकरवाडी मधील डफळजीच्या जावयाच्या फर्निचर शोरुमला भेट दिली. न्यु टाईम्स स्टील फर्निचर बालिकाश्रम रोड येथे शोरुम आहे. त्यांचा फर्निचर कारखाना भुतकर वाडी येथे आहे राजु म्याना हे सर्व प्रकारच्या फर्निचरचे होलसेल विक्रेते आहेत हे पाहून खूप समाधान वाटले राजु आपल्या व्यवसायातून जमेल तशी समाज सेवा ही करत असतात. फर्निचर निर्मिती व विक्री या क्षेत्रात राजु यांनी चांगले नाव कमवले आहे. डफळजींचे चिरंजीव आनंद डफळ छाया टाकीज जवळ तोफखान्यामधे रिलायन्स ट्रेडिंग कार्पोरेशन व आर्यन एजन्सी मायक्रोटेक इन्व्हर्टर आणि ओकाया बँटरीज अशादोन फर्म चालवत आहेत ते नगर जिल्ह्याचे अधिकृत वितरक असून प्रकारच्या बँटरीजचे होलसेलर्स पण आहेत. खाली शोरुम व वरती घर अशी तीन मजली सर्व सोयीने युक्त अशी सुंदर हवेली डफळजींनी बांधली आहे. डफळजीच्या घरी जेवणाचा अस्वाद घेऊन पुणे परतीचा प्रवास सुरू झाला.
मित्रांनो, हे सर्व सविस्तर लिहिण्याचे कारण सर्व सामान्य माणूस कष्टाने विविध व्यवसाय कसे वाढवू शकतो हे यातून दिसते.
हे सर्व व्यवसाय बघून मला माझ्या मित्रांचा अभिमान वाटला.
या भेटीत सर्व मित्रांना भेटून खूप आनंद झाला मनाला उभारी मिळाली पाझेटीव्ह विचार मनात आले भरपूर उर्जा मिळाली.
जुने नगर, नवे नगर, एमआयडीसी, भुईकोट किल्ला, चितळेरोड, नवा कापड बाजार बँकरोड आशा टाकीज चौक नवीपेठ, जुनाबाजार, पारशाखुंट, दिल्ली गेट बालीका श्रम,' सावेडी, पाईपलाईन रोड, स्टेशनरोड, सर्जेपुरा तारकपूर या भागा फिरण्याचा योग आला. या तीन दिवासात नगरमधे विविध समाजातील लोकांची भेट झाली विचारांची देवाण घेवाण झाली नगर बद्दल या लोकांचे विचार ऐकले!अभिमान वाटला!
अजून काय पाहिजे या आयुष्यात! पुढील भेटीत राहिलेल्या समविचारी मित्रांना भेटीचे नियोजन आहे. वर नमूद केलेल्या सर्व मित्रांनी आपला बहूमुल्य वेळ दिल्यामुळे ही नगर भेट सुफल संपन्न झाली.
धन्यवाद मित्रांनो!
फिर मिलेंगे!



# दुर्गा सप्तशती म्हणणे शक्य नाही ?

या देवी सर्वभूतेषु शक्ति रूपेण संस्थिता।
नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नमः।।
नवरात्रोत्सव म्हणजे साक्षात शक्तिदेवतेचा उत्सव. शक्तीची निरनिराळी रूपे आपल्याकडे परंपरेने पुजली जातात. दुर्गा देवीच्या उपासना, आराधना, नामस्मरण, जप करण्यासाठी शारदीय नवरात्रोत्सवाचा कालावधी अतिशय शुभ आणि पुण्यफलदायी मानला गेला आहे. नवरात्रात केलेले दुर्गा देवीचे पूजन सर्वश्रेष्ठ मानले गेले आहे. नवरात्राच्या संपूर्ण नऊ दिवसात नवदुर्गेच्या नऊ रुपांचे पूजन केले जाते. अनेक ठिकाणी आपापाले कुळाचार, कुळधर्म, प्रथा, पद्धती, परंपरा यांनुसार विशेष व्रताचरण केले जाते. देशभरात नवरात्रोत्सवाची मोठी धूम असते. मात्र, करोना संकटामुळे उत्सव साजरे करण्यावर मर्यादा आल्या असल्या, तरी भाविकांच्या मनातील उत्सवाचा उत्साह कमी झालेला नाही, असेच दिसून येत आहे. देवीच्या विविध श्लोक, मंत्र, पाठ यांमध्ये श्रीदुर्गा सप्तशती विशेष महत्त्वाचे मानले गेले आहे. अनेक भविक नवरात्रातील प्रत्येक दिवशी दुर्गा सप्तशती पठण करतात. नवरात्रात दुर्गा सप्तशती पठण करणे विशेष शुभ पुण्यफलदायक मानले गेले आहे. दुर्गा सप्तशती म्हणण्यासाठी किमान तीन तास लागतात. मात्र, धावपळीच्या आणि धकाधकीच्या जीवनात इच्छा असूनही संपूर्ण दुर्गा सप्तशतीचे पठण करणे शक्य होत नाही. तेव्हा काळजी करू नये. यावर एक सोपा उपाय सांगितला गेला आहे, जेणेकरून संपूर्ण दुर्गा सप्तशती पठणाचे पुण्य लाभू शकेल. दुर्गा सप्तशती देवीचे चरित्र वर्णन करणारा ग्रंथ आहे. या ग्रंथात १३ अध्याय असून, तो तीन भागात विभागण्यात आला आहे. दुर्गा सप्तशतीमधील प्रत्येक अध्यायात भगवती देवीचा महिमा, महती, महात्म्य आणि देवीच्या स्वरुपांविषयी वर्णन करण्यात आले आहे. दुर्गा सप्तशतीच्या पहिल्या भागात मधु कैटभ वधकथा, मध्यक्रमात महिषासुर संहार आणि उत्तरार्धात शुंभ-निशुंभ वध तसेच देवीकडून सुरथ आणि वैश्य यांना देण्यात आलेल्या वरदानांविषयी विस्तृत माहिती देण्यात आली आहे. आजच्या काळातील धावपळ आणि धकाधकीच्या जीवनात संपूर्ण दुर्गा सप्तशतीचे पठण करणे शक्य होत नाही. मात्र, यावर एक सोपा असून, कमी वेळामध्ये दुर्गा सप्तशतीचे पूर्ण पुण्य मिळू शकते. सर्वप्रथम कवच, कीलक व अर्गला स्तोत्र म्हणावे. यानंतर कुंजिका स्तोत्राचे पठण करावे. असे केल्याने संपूर्ण दुर्गा सप्तशती म्हटल्याचे पुण्य प्राप्त होऊ शकते, असे सांगितले जाते. एका पौराणिक कथेनुसार, महादेव शिवशंकरांनी पार्वती देवीला या उपायाबाबत सांगितल्याचे म्हटले जाते. पुराणातील एका कथेनुसार, महादेव शिवशंकर आणि माता पार्वती यांच्यातील एका संवादादरम्यान शिवाने पार्वती देवीला दुर्गा सप्तशती पाठाचे संपूर्ण पुण्य कसे मिळवावे, याबाबत सांगितले. कुंजिका स्तोत्र पठण केल्यास दुर्गा सप्तशतीचे पुण्य प्राप्त होऊ शकते. मात्र, कुंजिका स्तोत्राच्या सिद्ध मंत्रांचा वापर कधीही कुणाचे अहित करण्यासाठी करू नये. अन्यथा त्या व्यक्तीचे नुकसान होते. कुंजिका स्तोत्रासह कवच, कीलक व अर्गला स्तोत्र म्हणावे. मात्र, नेमून दिलेल्या क्रमानेच पठण व्हावे, असे सांगितले जाते. नवरात्रातील प्रत्येक दिवशी दुर्गा सप्तशती पठण केल्यास दुर्गा देवीचे शुभाशिर्वाद आणि कृपादृष्टी लाभते. अनेक संकटातून बाहेर पडण्यास यामुळे मोलाची मदत होते. दुर्गा सप्तशतीमधील अध्याय पठणाचे विविध लाभ मिळतात. तसेच भक्तांच्या सर्व मनोकामना पूर्ण होऊ शकतात, असे सांगितले जाते. दुर्गा सप्तशती पठणानंतर दान करणे आवश्यक असल्याचे सांगितले जाते. यथाशक्ती आणि यथासंभव दान करावे. असे केल्याने प्रत्येक कठीण टप्प्यावर देवीचे शुभाशिर्वाद, कृपा, पाठिंबा मिळतो, अशी लोकमान्यता असल्याचे सांगितले जाते.

# आदिशक्ती महाकाली

आधुनिक केसरी

**आदिशक्ती महामायेचे एक रूप, परात्पर महाकालीच्या संहारक शक्तीला, आदिशक्तीच्या तम:प्रधान रौद्र रूपाला महाकाली म्हणतात. ती दुष्टांचा संहार करण्यासाठी प्रकट होते. मधु-कैटभ या दैत्यांचा नाश करण्यासाठी ती अवतरली, असे देवी भागवतात सांगितले आहे. शाक्त संप्रदायात महाकार्य या नावाने देवीची उपासना केली जाते. तिचे रूप भयानक आहे. तिच्या मुखातून रक्त गळत असते तिचे सुळे बाहेर आलेले असतात. तिचे केस ज्वालेसारखे दिसतात आणि तिच्या गळ्यात नरमुंडमाला असते. तिला चार हात असून त्यात संहारक शस्त्रे असतात. श्रीविद्यार्णव तंत्रात तिचे रूपध्यान वर्णिले आहे, ते असे - कृष्णवर्ण, दशमुख, त्रिनेत्र, दशपाद आणि खड्ग, शर, त्रिशूळ, गदा, चक्र, पाश इत्यादी आयुधे धारण करणारी.**

महाकालीचे रूप असे उग्र असले, तरी ती आपल्या भक्तांना वरदायिनी होते आणि त्यांचे संरक्षण ही करते. कालसङकलनात् काली सर्वेषामादिरूपिणी ।।
कालत्वादादिभूत्वादाद्या कालीति गीयते ।।
आदिमायचे हे उग्ररूप आहे.
हे देवी, तू आपल्या ठिकाणी कालाचे संकलन (एकत्रिकरण) करतेस. तू सर्वांना आरंभरूप आहेस. कालत्व व अर्थात ज्या गुणांचा स्वीकार करून काल उत्पन्न होतो, ते गुण तूच आहेस. कालाचा प्रारंभही तुझ्यापासूनच होतो. म्हणून तुला अद्याकाली असे म्हणतात. तंत्रालोकात तिला-
काली नाम परा शक्तीः हा सैव देवस्य गीयते ।
ब्रह्माची नित्य क्रिया शक्तीरूप जी पराशक्ती आहे तिलाच काली असे म्हणतात. निष्क्रिय ब्रह्माचे सक्रिय रूप म्हणजेच काली होय. कालीच्या विविध उत्पत्तीकथा आहेत. चंडमुंडांबरोबर चाललेल्या युद्धात जगदंबेच्या भुवया क्रोधाने चढल्या व त्यातून कालीची उत्पत्ती झाली. दारूक नावाचा असुर केवळ स्त्रीवध्य होता. त्याला मारण्यासाठी शंकराने आपल्या कंठातल्या विषातून कालीला उत्पन्न केले. महामायेच्या कुशीतून कालीचा जन्म झाला. अशा विविध कथा कालीमातेविषयी प्रचलित आहे. देवासुरांचे युद्ध झाले. त्यात देवांचा पराभव झाला. देव ब्रम्हा, विष्णू, महेश यांना शरण गेले या त्रिदेवांनी आपले सामर्थ्य तोकडे आहे, असे जाणून महाकालीची प्रार्थना केली. त्यासाठी महाकालीने ज्या १२ देवींची उत्पत्ती केली त्यात पहिली देवी म्हणजे काली होय. कालीचे मूर्ती ध्यान पुढील प्रमाणे सांगितले आहे.
देव्या ध्यानं प्रवक्ष्यामि सर्वदेवोपसेविताम् ।
अञ्जनाद्रीनिभां देवीं करालवदनां शिवाम्।।
मुण्डमालावकीर्णांसां मुक्तकेशी स्मितानाम्।
सद्यश्छिन्नशिरःखड्गवराभीतिकराम्बुजाम्।।
अर्थात काली देवीचे मी ध्यान सांगतो. ती सर्व देवांनी सेवित आहे. ती काजळाच्या डोंगरासारखी आहे. तिचे मुख कराल आहे. तिच्या खांद्यावर मुंडमाला असून केस मोकळे आहेत. ओठावर स्मित आहे ती महाकालाच्या हृत्कमलावर उभी आहे. नुकतेच तोडलेल तिचे नरमुंड व खड्ग तिने धारण केले असून तिचे दोन हात वर व अभय मुद्रेत आहेत. पुराणांतरीचे तिचे वर्णन असे- कृष्णवर्ण व



चतुर्भुज. एका हाती तलवार व दुसऱ्या हाती नरमुंड. गळ्यात नरमुंडाचीच माला. कटीला मृत माणसांच्या हातांची बनवलेली मेखला. लाल डोळे, जीभ तोंडातून बाहेर आलेली. मुख व हृदय रक्ताने माखलेले. ती एक पाय शिवाच्या छातीवर ठेवून व दुसऱ्या पाय आपल्या दुसऱ्या मांडीवर ठेवून उभी आहे. काली ही दशमहाविद्यांपैकी पहिली आहे, म्हणूनच तिला प्रथमाशक्ती किंवा आद्याशक्ती असे म्हणतात. कालीचे दक्षिणकाली, भद्रकाली, गुरुकाली, कामकलाकाली, धनकालिका, सिद्धीकाली, चंडकालिका इत्यादी नऊ भेद तंत्र वाङ्मयात सांगितले आहेत. कालीचे आध्यात्मिक व तत्व मंत्रशास्त्रात पुढील प्रमाणे विशद केले आहे-
कालीच्या एका हाती नुकतेच तोडलेले मुंड असून त्यातून रक्त बिंदू ठिबकत आहेत. हे मुंड मोह पुरुषाचे आहे. कालीने महिषासुर मारला याचा तात्विक अर्थ तिने अज्ञान किंवा मोह याचे मस्तक तोडले असा होतो. विद्या व अविद्या यांच्या क्रियेमुळे सृष्टीचा संकोच व विकास होत राहतो. जीवनाचे प्रमुख उद्दिष्ट ब्रह्मप्राप्ती हे ठरलेले आहे. अविद्या ही त्या उद्दिष्टाला बाधक होते. म्हणून साधकांना आत्मदर्शन होण्यासाठी किंवा महानंद प्राप्त होण्यासाठी मोहपुरुषाचा शिरच्छेद होणे आवश्यक असते. शिरातून रक्तबिंदू ठिबकणे हे क्रियाशीलतेचे द्योतक आहे. काली ही स्मशानात नृत्य करते. वासना विमुक्त अतएव जीवन मुक्त साधक यांचे हृदय म्हणजेच स्मशान होय. त्या साधकाच्या कर्मबंधाचे प्रतीक म्हणून शवाचे हात तोडून तिने आपल्या कमरे भोवती त्यांची मिखला केली आहे. काली हीच वेदांत्यांची निर्विकल्प समाधी, बौद्धांची शून्यता, शाक्त व वैष्णव यांची समरसता व जैनांची केवलावस्था होय. कालीच्या गळ्यात मुंडमाला आहे ही शब्दब्रह्माची प्रतीक अशी वर्णमाला होय. कर्पूरादिस्तोव ही कल्पना मांडलेली आहे. निरुत्तरतंत्रात या मालेतील मुंडे पन्नास असल्याचे सांगितले आहे. कामधेनुतंत्रात काली म्हणते मम कण्ठे स्थितं बीजं पञ्चाशद्वर्णमद्भुतम् ।
माझ्या गळ्यात ५० वर्णांच्या रूपाने अद्भुत असे सृष्टीचे बीज आहे. काली वस्तूतः अरुप आहे; पण गुण व क्रिया यांना अनुसरून तिची रूपकल्पना केली जाते असेही म्हटले जाते. जेव्हा ती सृष्टी कर्मात निमग्न असते, तेव्हा ती रजोगणी व रक्तवर्णी होते. विश्वस्थितीच्या उद्योगात असते, तेव्हा सत्वगुणी व गौर असते आणि संहारक्रियेत मग्न असते तेव्हा तमगुणी व काळी असते. कृष्णाकालीला तिरसकारिणीविद्या असेही म्हणतात. मातेच्या या रुपाची कल्पना पुढील प्रमाणे केलेली आहे -
नीलं हयं समधिरुह्य पुरः प्रयान्ती ।
नीलांशुकाभरणमाल्यविलेपनाढ्या ।। निद्रापुटेन भुवनानि तिरोदधाना । खड्गायुधा भगवती परिपातु भक्तान् ।।
अर्थात काळया घोड्यावर स्वार होऊन अग्रभागी जाणारी, काळे वस्त्र, काळे अलंकार, काळी माला आणि काळे उटणे धारण करणारी, निद्रापुटाने सृष्टीला झाकणारी व खड्ग धारण करणारी भगवती काली भक्तांचे रक्षण करो. काली ही महाकाल अर्थात शिव यांच्या हृदयावर उभी राहून नृत्य करते, हे तिचे वैशिष्ट्य होय. तिला काली विलास तंत्रात शवासना किंवा शवारुढा असेही म्हटले आहे. तंत्रमार्गात शव व शिव ही एकाच तत्वाची नावे आहेत. निराकार ब्रह्माचे प्रथम साकार रूप म्हणजे शव होय. ते निश्चल असते. जेव्हा त्यात शक्तीचे स्पंदन सुरू होऊन ती सृष्टी रचनेच्या कार्यासाठी सक्रिय होऊन उठते तेव्हा त्याला शिव म्हणतात. हेच निराळ्या भाषेत सांगायचे, तर शक्तीहीन ब्रह्म हे शव असून शक्तीयुक्त ब्रह्म हे शिव होय. शिवामधला इकार हा शक्तिवाचकच आहे. महाशक्तीच्या क्रीडेला आधार झाल्या कारणाने त्यालाच शवासन असे म्हणतात. 'हैसो' हे शवबीज किंवा प्रेतबीज आहे. हेच प्रेत सृष्टीरचनेच्या काळी पद्मरूप ग्रहण करते व महामाया कालीचे आसन अथवा क्रीडास्थल बनते.

पंकज वसंत पाटील
9850430579

यालाच कालीचे महाप्रेत पद्मासन म्हणतात. बंगाल राज्यात कालीमातेची उपासना प्राचीन काळापासून प्रचलित आहे तिची पूजा विविध प्रसंगी विविध नावांनी व विविध रूपाने केली जाते ही सर्व रूपे उग्र भयंकर असून त्यातून तिची विध्वंसक वृत्ती प्रगट होते दक्षिणकाली हे देवीचे रूप बंगालमध्ये लोकप्रिय आहे त्रिमूर्ती चतुर्भुज कृष्णावरून व विकट हास्य करणारी आहे तिच्या सिद्धकाली रूपात तिने खडगाने चंद्र मंडळाला भोक पाडले असून त्यातून घडणाऱ्या अमृताने ती नाऊन निघत आहे डाव्या हातात कवटीने ती त्या अमृताची पाषाण करीत आहे प्राशन करीत आहे. जेष्ठ अश्विन व माघ या महिन्यांच्या कृष्णचतुर्दशीला मोठ्या प्रमाणात कालीपूजा केली जाते. आदिशक्ती महाकाली दुष्टांचा नाश करण्यासाठी अवतरलेले मातेचे उग्र रूप असले तरी भक्तवत्सल असून भक्तांच्या हाकेला धावून त्यांचे भय, रोग, शत्रू यापासून रक्षण करते.

# सांस्कृतिक वारसा असलेले अंबेजोगाई

आधुनिक केसरी

**आंबेजोगाई हे नैसर्गिक दृष्टीने अत्यंत सुंदर असे शहर. सांस्कृतिक वारसा असलेले सर्वात जुने शहर आंबेजोगाई आहे.हे शहरावर अनेक राजेमहाराज्यांच्या राजवटीखालुन गेलेले आहे.सं त चक्रधर स्वामींचे प्रवचनही येथे झाल्याच्या नोंदी आहेत. या शहरासंदर्भात सर्वात जुना वारसा जोगाईच्या अंबाबाईचा. जयवंती नदीकिनाऱ्यावर वसलेली मातृसत्तेची राज्ञी म्हणजे जोगेश्वरी. मुळात ही एक योगीनी. आंबा आणि जोगीणी (योगीणी) या दोन शब्दांपासून आंबाजोगाई हा शब्द बनला आहे. म्हणजे आंबाजोगाई या शहराच्या नावातच मातृसत्तेचे पुरावे दफन आहेत. हे एक मोठे नगरच.**







पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या प्रस्थापनेनंतरच्या काळात अशा मातृसत्ताक ठिकानांचे 'दुष्ट नेनीवेकरण' करण्यात आले आहे. म्हणून आंबेजोगाई येथे या योगीनीचे नगर स्मशानभूमीत अडगळीत टाकलेले आहे.म्हणजे नंतर त्या भागात स्मशानभूमी बनवण्यात आलेली आहे. निर्ऋतीही नरकदेवता म्हणून अशीच बदनाम करण्यात आली.तिची नैऋत्य दिशा अशुभ मानली गेली. तिचा जन्मदिवस अमावस्या, तिचे वहान गाढव, आजही अशुभ मानतात. त्याचप्रमाणे ही योगिनी आंबाबाई आज स्मशानभूमीत आडगळीत आहे. या भागाला बाराखांबी मंदिर परिसर म्हटले जाते.या परिसरात नव्याने काही मंदिरांचे अवशेष मिळाले आहेत. या ठिकाणी मोरावर स्वार असलेली एक योगिनी शिल्प आहे. आणि,कानात गोल रींग असलेली दाढी असनारी एक योगी पुरुषाची मुर्तीही आहे.त्याच्या पायाखाली सुद्धा मोरांी शिल्पे आहेत. म्हणजे मोर ज्ञातीचिन्ह या आंबा योगीनीचे असावे. तिच्या गणाचे कुलचिन्ह मोर होते. याबद्दल, अजुन तपशील घेतला असता आंबेजोगाईचे रहिवासी विनोद उंबरे म्हणाले,या भागात मोरांची संख्या खुप आहे.बिड जिल्ह्यात आष्टी तालुक्यात नायगावला मयुर अभयारण्य आहे. शिवाय आंबाजोगाईला लागूनच मोरेवाडी नावाचे गाव आहे. यापेक्षा सर्वांत महत्वाचे दोन पुरावे असे की या भागातील बहुतांश महिला मोरणीची नथ वापरतात. जसे यरमाळ्याच्या यडेश्वरी देवीला मानणाऱ्या स्त्रीया विशिष्ट प्रकारचे इरकलचे रेषारेषांचे लुकडे परिधान करतात.त्याप्रमाणे या आंबा जोगाईला मानणाऱ्या स्त्रीया मोरणीची नथ वापरतात. दुसरा पुरावा असा की,काही ठिकाणी परडीसोबत मोरपंख पुजले जाते. या आधारे आपन योगिनी आंबाबाईचे ज्ञातीचिन्ह मोर आहे हे निश्चित करु शकतो. हे तपशील घेवून आम्ही निघताना आंबाजोगाई बसस्टॉपला मोरणीची नथ घातलेली महिला भेटली. या बाराखांबी मंदिर परिसरात देवीचे यंत्र सापडले आहे. ते दगडावर कोरलेले आहे.यंत्र तंत्र आणि मंत्र ही तांत्रिक त्रयी आहे. म्हणजे आपल्याला अवगत झालेले तंत्र यंत्राद्वारे मांडले जाई उदा. जसे चौपट.

नितीन सावंत
9970744142

याच भागात मुळजोगाई देवीचे मंदिर आहे.ही मुळजोगाईच खरी गणमाता.पुढे तिला गावात नेवून तिचे मंदिर बाधण्यात आले. या मुळजोगाईला लागून रेणुका आहे. तिच्या पुढे तिची पुष्करणी आहे. या मुळजोगाईच्या दृष्टीक्षेपात पुढे हे बाराखांबी मंदिर आणि एका बाजुला दासोपंत यांची सामाधी आहे. ह्या दासोपंत यांच्या समाधी मागे पुर्वीच्या दोन पुष्करण्या आहेत. म्हणजे रेणुकेप्रमाणे या दासोपंत यांच्या परिसरात सुद्धा एक उपदेवता होती. तिचे नामोनिषान मिटले आहे. फक्त उरल्यात दोन पुष्करण्या. या आजूबाजूला असणाऱ्या उपदेवता जोगेश्वरीच्या ज्ञाती असाव्यात. ज्याद्वारे तिचा चौपट निश्चित होइल. वंशसमाजात आती बनतो गण.त्या गणाची प्रमुख असते गणराज्ञी. गणराज्ञीच्या गणातील लोकसंख्या वाढल्यानंतर तो गण विभक्त होतो तो ज्ञातीप्रमुखांचा. ज्ञातीचे कुळे बनतात.ही कुळे पुढे नव्या शेतजमीनीच्या शोधार्थ ज्ञातीच्या गणातून विभक्त होऊन नवे गावे वसवतात. सांगली जिल्ह्यातील उदगाव हे योगेश्वरीच्या गणाचे कुळ होते. हे कुळ आंबेजोगाईच्या गणातून नव्या शेतजमीनीच्या शोधात उदगावच्या भुमीपर्यंत आले.तेथील शेतीयोग्य भुसभुशीत जमीनीत हे कुळ विस्तारले, त्यांनी आपला वंशवेल वाढवला.आपल्या गणप्रमुखाची आठवण म्हणून त्या कुळाने तिथे योगेश्वरीचे ठाणे उभे केले. आजही दरवर्षी तिथे यात्रा भरते.जोगणीचा आगळावेगळा सांस्कृतिक वारसाही त्या गावाने अजुन जपून ठेवला आहे.वंशसमाजात जातीव्यवस्था नसल्यामुळे गणराज्ञी, ज्ञाती आणि कुळे हे सर्वांचीच आहेत. देवी नवरात्रोत्सव, घटस्थापना हा काही एका जातीचा वारसा नव्हे.

# ज्येष्ठ नागरिक धोरण-2013 नुसार पोर्टलमध्ये दुरूस्ती करा

## राज्यसेवा आयुक्त यांचेकडे अहमद करीम पप्पुवाले यांची निवेदनातून मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण - 2013 ची अंमलबजावणी करून त्यानुसार श्रावणबाळ वृध्दापकाळ ऑनलाईन पोर्टल मध्ये दुरूस्ती करा अशी मागणी राज्यसेवा आयुक्त डॉ.किरण जाधव यांचेकडे भाजपा युवा मोर्चा अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष अहमद करीम पप्पुवाले यांनी गुरूवार, दिनांक 29 सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनातून केली आहे. भाजपा युवा मोर्चा अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष अहमद करीम पप्पुवाले हे आमदार सौ.नमिताताई मुंदडा, युवा नेते अक्षय मुंदडा यांच्या नेतृत्वात आणि ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा यांच्या मार्गदर्शनानुसार मागील काही वर्षांपासून सामाजिक बांधिलकीतून कार्य करीत आहेत. पप्पुवाले यांनी गुरूवारी राज्यसेवा आयुक्त डॉ.किरण जाधव हे अंबाजोगाई शहरात आले असता त्यांची भेट घेऊन दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, राज्य मंत्रिमंडळाने 30 सप्टेंबर 2013 रोजी राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण - 2013 जाहीर केले. त्यात शासन निर्णयानुसार वृध्द व्यक्तीचे वय 66 वर्षे ऐवजी 60 वर्षे घोषीत केले. तरी आजपावेतो श्रावणबाळ पोर्टल मध्ये वृध्द व्यक्तीस लाभ मिळण्यासाठी ऑनलाईन पोर्टल मध्ये वय दुरूस्त करण्यात आलेले नाही. परंतु, ऑनलाईन पोर्टल मध्ये मात्र शासन निर्णयाची अंमलबजावणी झाली नसल्याचे निदर्शनास येत आहे. सदरील



पोर्टलवर वय 66 वर्षे नमुद असल्यामुळे पोर्टल 60 वर्षे वयाचे वैद्यकीय प्रमाणपत्र स्विकारत नाही व तहसिल कार्यालयाकडून 66 वर्षे उदाहरणार्थ - संचिके मध्ये जर वय 64 वर्षे असे नमूद असल्यास प्रस्तुत संचिका ही रद्द किंवा त्रुटीमध्ये काढण्यात येते, त्यामुळे पात्र असून ही सामान्य वृध्द व्यक्तीला शासनाच्या विविध योजनेचा लाभ मिळत नाही, योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागते. तरी राज्य मंत्रिमंडळाने 30 सप्टेंबर 2013 रोजी राज्याचे सर्वसमावेशक ज्येष्ठ नागरिक धोरण - 2013 जाहीर केले त्या शासन निर्णयाची तात्काळ अंमलबजावणी करून ऑनलाईन पोर्टल मध्ये वय दुरूस्त करून पात्र वयोवृध्द नागरिकांना न्याय द्यावा अशी मागणी सदरील निवेदनातून करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रतिलिपी केज विधानसभा मतदारसंघाच्या लोकप्रिय आमदार नमिताताई अक्षय मुंदडा यांना देण्यात आली आहे. अशी माहिती भाजपा युवा मोर्चा अल्पसंख्यांक आघाडीचे शहराध्यक्ष अहमद करीम पप्पुवाले यांनी दिली आहे. निवेदन देताना पत्रकार शेख वाजेद उपस्थित होते.

# मंगेश जाधव यांच्या स्वखर्चातून महात्मा फुले विद्यालयाचा रस्त्याचा प्रश्न मार्गी



आधुनिक केसरी न्यूज

**करोडी :** महात्मा फुले विद्यालय या शाळेचा रस्त्याचा प्रश्न अनेक दिवसा पासून रखडला होता, अनेक दिवसा पासून नाली करून पाईप टाकण्याची गरज होती, शाळेचे मुख्याध्यापक सरांनी निवेदन दिले आणि लगेच शिवसेना विभाग प्रमुख मंगेश जाधव यांनी स्वखर्चातूनया रस्त्याचा प्रश्न मार्गी लावला. त्यासाठी माझ्या सोबत राहुल बाबासाहेब जाधव , जितेंद्र जाधव, अमोल जाधव, शिवनाथ फाळके, सागर जाधव,शाळेचे मुख्यद्यापक गणेश रावते सर आणि प्रा कृष्णा जोशी सर यांनी केले म्हणून या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावू शकलो. करोडी येथील अनेक विद्यार्थी याच रस्त्याने शाळेत जातात त्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावरील सुख माझ्यासाठी लाख मोलाचं आहे असे जाधव यांनी व्यक्त केले.



# ज्येष्ठ नागरिकांसाठी ओपीडीचा स्वा.रा.ती. रुग्णालयात शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील स्वामी रामानंद तीर्थ वैद्यकीय रुग्णालयात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र बाह्य रुग्ण कक्षाची सुरुवात करण्यात आली. केज विधानसभा मतदार संघाच्या आ.नमिता मुंदडा यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी या ओपीडीचे उदघाटन करून शुभारंभ करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा, अधिष्ठाता डॉ. भास्कर खैरे, ज्येष्ठ पत्रकार प्रा.नानासाहेब गाठाळ आणि ज्येष्ठ नागरिक संघाचे पदाधिकारी केशर राजाराम पोतदार व इतर पदाधिकारी उपस्थित होते. ही ओपीडी मेडिसिन विभागाच्या देखरेखीखाली कार्यरत राहणार असून डॉ. सिद्धेश्वर बिराजदार यांच्या मार्गदर्शनाखाली तज्ज्ञ डॉक्टरांची टीम ज्येष्ठ नागरिकांची तपासणी आणि उपचार करणार आहे.

# खराब रस्त्यामुळेच ऊसतोड मजुराच्या मुलाचा मृत्यू : मा.आ. साठे



आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** अंबाजोगाई ते येल्डा मार्गाचे काम तात्काळ पूर्ण करणे बाबत आज कार्यकारी अभियंता सा.बा.विभाग, अंबाजोगाई यांना केज विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार रोमन उर्फ पृथ्वीराज साठे यांच्या वतीने निवेदन देण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस आयुबभाई पठाण यांच्यासह कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. तीन वर्षांपासून काम रखडलेले असल्याने संबंधित कंपनी/गुत्तेदारावर कारवाई होणे अपेक्षित आणि मृताच्या कुटुंबीयांना कंपनी भरपाई म्हणून आर्थिक मदत केली गेली पाहिजे. अंबाजोगाई ते येल्डा रस्त्याचे काम मागील तीन वर्षांपासून रखडलेले आहे सदर रस्ता मुख्य रहदारीचा रस्ता असून महामार्ग पूर्णपणे उखडलेला आहे सदर रस्त्यावर प्रचंड प्रमाणात रहदारी असल्यामुळे त्या ठिकाणी अनेक वेळा अनेक अपघात झालेले आहेत. आजचा अपघात तर अत्यंत दुर्दैवी असुन मयताच्या कुटुंबास संबंधित कंपनी/गुत्तेदाराने भविष्यासाठी भरपाई म्हणून आर्थिक मदत केली पाहिजे असेही माजी आमदार रोमन साठे यांनी सांगितले. आजच ऐका मुलाचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. आज सकाळी रस्त्यावरून ऊसतोड मजुरांचा ट्रॅक्टर कारखान्यावर ऊस तोडणीसाठी पोटाचे खळगी भरण्यासाठी जात असताना सदर ट्रॅक्टर ची ट्रॉली पलटी होऊन त्यात एक लहान अकरा वर्षाचा मुलाचा बळी गेलेला आहे व त्यातील अन्य मजुर जखमी आहेत. रखडलेल्या रस्त्याचे काम तात्काळ करण्याबाबत संबंधित गुत्तेदाराला आदेशित करण्यात यावे. याबाबतीत आता जरकरीता वेळीच कार्यवाही नाही केल्यास आम्हाला लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन करावे लागेल. आणि मग याची सर्वस्वी जबाबदारी आपल्या कार्यालयाची व प्रशासनाची राहील याची नोंद घ्यावी. अशा ईशाराही माजी आमदार रोमन उर्फ पृथ्वीराज साठे यांनी दिला.

# माळीवाडा येथे माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान

आधुनिक केसरी न्यूज

**माळीवाडा :** राष्ट्रीय आरोग्य अभियान जिल्हा परिषद औरंगाबाद माता सुरक्षित तर घर सुरक्षित अभियान ग्रामपंचायत माळीवाडा येथे राबवण्यात आले प्रमुख पाहुणे म्हणून तालुका आरोग्य अधिकारी सावरगावकर सर विस्तार अधिकारी आरोग्य विभाग दुधारे मॅडम वैद्यकीय अधिकारी सावंत मॅडम पर्यवेक्षक कुलकर्णी सर डीसीएम निरवध सी एच ओ प्रतीक सर आरोग्य सेवक फुलारे सर सिस्टर अंभोरे मॅडम गटप्रवर्तक ज्योती मॅडम ग्रामपंचायत सरपंच अनिता सुधाकर हेकडे उपसरपंच कडू भाऊ कीर्तीकर ग्रामपंचायत सदस्य मनीष गाजरे प्रवीण भाऊ बर्डे कृष्णा भाऊ मुळेज्योती मुळे मंदाकिनी ताई कीर्तीकरग्रामविकास अधिकारी जी व्ही हारदे सर पोलीस पाटील प्रमोद साठे महात्मा फुले शिक्षक जिल्हा परिषद शाळा शिक्षक माजी ग्रामपंचायत सदस्य सुधाकर हेकडे शिवाजी आस्वार तसेच अंगणवाडी सेविका आशा सेविका ग्रामपंचायत कर्मचारी गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.



# तलाठ्यांनी नेमून दिलेल्या सज्जाचे ठिकाणीच काम करावे

## सुनिल जगताप : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या निवेदनाची दखल घेऊन तहसिलदारांनी दिल्या सूचना

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** तालुक्यातील सर्व तलाठ्यांना नेमून व बांधून दिलेल्या सज्जा (कार्यालय) मध्ये बसणे बंधनकारक करा, तसेच दिनांक 7 जानेवारी 2017 च्या शासन आदेशानूसार उपस्थिती बाबतची नियमावली पाळण्याबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड उप-जिल्हाअध्यक्ष सुनिल जगताप यांनी 14 सप्टेंबर 2022 रोजी दिलेल्या निवेदनाची अंबाजोगाईचे तहसिलदार डॉ.बिपीन पाटील यांनी दखल घेवून सोमवार, दिनांक 26 सप्टेंबर रोजी अंबाजोगाई तालुक्यातील सर्व तलाठ्यांनी नेमून दिलेल्या सज्जाचे ठिकाणीच काम करावे यासह एकूण 9 महत्वाच्या सूचना दिल्या आहेत. या बाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड उप-जिल्हाअध्यक्ष सुनिल जगताप यांनी 14 सप्टेंबर 2022 रोजी तहसिलदार अंबाजोगाई यांना दिलेल्या निवेदनात नमूद केले होते की, अंबाजोगाई तालुक्यातील सर्व तलाठ्यांना नेमून दिलेल्या व बांधून दिलेल्या सज्जामध्येच (कार्यालया मध्ये) बसणे बंधनकारक करावे तसेच दि. 7 जानेवारी 2017 च्या शासन आदेशानूसार उपस्थिती बाबतची नियमावली पाळावी, अंबाजोगाई तालुक्यातील अनेक तलाठी हे त्यांना नेमून दिलेल्या व बांधून दिलेल्या सज्जा कार्यालयामध्ये न बसता अंबाजोगाई शहरात खाजगी कार्यालये मांडून कामकाज करीत आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील लोकांना त्यांच्या कामासाठी शहरामध्ये चकरा माराव्या लागत आहेत. दुसरे असे की, महसुल व वन विभाग मंत्रालयाने संकीर्ण 2016 प्रक. 475/ई 10 दि. 6 जानेवारी 2017 नुसार तलाठी सज्जावरील तलाठ्यांच्या उपस्थिती बाबत काही सुचना दिलेल्या आहेत. संबंधीत तलाठ्यांनी त्यांचे भ्रमणध्वणी लगतचे मंडळ अधिकारी याचे व नायब तहसिलदार यांचे नांव व भ्रमणध्वणी ठळक अक्षरात लावणे व तलाठ्यांचा दौरा, बैठका या बाबतचा सूचना फलक लावणे, विविध दाखल्यांच्या शुल्का बाबतची दर सुचना लावणे या व इतर महत्वाच्या सुचनांचा समावेश आहे. परंतु, दुर्दैवाने अंबाजोगाई तालुक्यात या शासन आदेशाची अंमलबजावणीच होताना दिसत नाही. तरी याद्वारे आपणांस विनंती की, अंबाजोगाई तालुक्यातील सर्व तलाठ्यांना नेमून दिलेल्या व बांधून दिलेल्या सज्जा मध्येच बसणे बंधनकारक करावे. तसेच 2 तलाठ्याच्या उपस्थिती बाबत सज्जावरील उपस्थिती बाबतच्या शासनाच्या दि. 06 जानेवारी 2017 च्या शासन आदेशाचे तंतोतंत पालन करण्यासंबंधीचे आदेश तात्काळ देण्यात यावेत. उपरोक्त मागण्यांबाबत योग्य ती कार्यवाही न केल्यास मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशाराच या निवेदनातून देण्यात आला होता. सदरील निवेदनावर सुनिल जगताप, गणेश काळे, ओमकार चव्हाण, नितीन परदेशी, विलास शिंदे, लक्ष्मण शिंदे, गणेश बरदाळे, चेतन मगर, व्यंकटेश देशमुख, सचिन सुरवसे, विकास बावळे, तन्मय कुलकर्णी, अभिषेक चव्हाण आदींसह मनसैनिकांच्या स्वाक्ष-या आहेत. या निवेदनाची तात्काळ दखल घेऊन अंबाजोगाईचे तहसिलदार डॉ.विपीन पाटील यांनी सोमवार, दिनांक 26 सप्टेंबर रोजी क्र.2022/आस्थापना/निवेदन/कावि-642 नुसार अंबाजोगाई तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी, मंडळ विभाग आणि तलाठी यांना पुढीलप्रमाणे सूचना दिल्या आहेत. त्या सूचना अशा सबब या कार्यालयाकडून यापुर्वी आपणांस वेळोवेळी आपल्या सज्जावर दप्तर ठेवण्याबाबतच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत तसेच याद्वारे आपणांस पुनःश्च सुचीत करण्यात येते की, आपण पुढील सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा असे आदेशित केले. त्याअनुषंगाने पुढीलप्रमाणे सूचना देण्यात आल्या आहेत. 1) आपले तलाठी कार्यालय सज्जाचे ठिकाणी तात्काळ स्थलांतरीत करावे, 2) सर्व तलाठ्यांनी त्यांचा नियोजित दौरा/ बैठका याबाबत कार्यालयाच्या आवारात सूचना फलक लावावा, 3) सर्व तलाठी यांनी कार्यालयाच्या आवारात तलाठयांची कर्तव्ये / जबाबदाऱ्या याबाबत फलक लावावा, 4) तलाठ्यांनी आपला दुरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक ठळक दिसेल, अशा स्वरूपात कार्यालयाच्या आवारात लावावा, तसेच लगतचे संबंधित मंडळ अधिकारी व नायब तहसिलदार यांचे नांव दुरध्वनी व भ्रमणध्वनी क्रमांक सुध्दा दर्शविण्यात यावेत, 5) ज्या सज्ज्यांच्या ठिकाणी तलाठी/मंडळ अधिकारी यांना शासनाने निवासस्थाने उपलब्ध करून दिली आहेत, त्यांनी त्या निवासस्थामध्ये रहावे, 6) सेवा हमी कायद्याअंतर्गत नमूद सेवा विषयक बाबीची (विविध प्रकारचे उतारे, लागणारा कालावधी इ. तपशील माहिती कार्यालयाच्या दर्शनी भागात लावावी, 7) संबंधित तलाठी यांनी शेतजमीनी, पिक पहाणी करताना संबंधित शेतजमीनीस भेटीबाबतचा तपशील जाहीर करावा., 8) तलाठी कार्यालयामध्ये खाजगी व्यक्तींना कार्यालयीन कामकाजाकरिता ठेवू नये, असे करण्याऱ्या विरूद्ध शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी, 9) विविध दाखले देता, शासनाने आकारलेले वाजवी शुल्क याबाबतची दरसुची कार्यालयाच्या आवारात लावावी. वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन मंडळ अधिकारी यांनी आपले मंडळ अंतर्गत तलाठी यांचेकडून करवून घ्यावे. सदर कामी हयगय अथवा टाळाटाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सूचना दिल्या आहेत. त्यामुळे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे बीड उप-जिल्हाअध्यक्ष सुनिल जगताप यांच्या निवेदनाची व आंदोलनाच्या इशाऱ्याची दखल घेवून महसूल प्रशासनाने सकारात्मक प्रतिसाद दिल्याबद्दल मनसेने जनतेसाठी घेतलेल्या विधायक भूमिकेचे जनतेतून स्वागत होत आहे.



आदेशाची अंमलबजावणी करावी अन्यथा तीव्र आंदोलन करणार : तहसिलदार डॉ.बिपीन पाटील यांनी काढलेल्या संबंधित आदेशाची पुढील पंधरा दिवसांत तात्काळ अंमलबजावणी करावी, महसूल प्रशासनाने कोणतीच कार्यवाही केली नाही. तर महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून याप्रश्नी तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा मनसेचे बीड जिल्हा उपाध्यक्ष सुनील जगताप यांनी दिला आहे.




# प्रबोधनानेच महिला सक्षमीकरण : मराठे

## नवरात्रोत्सवानिमित्त पत्रकार भवनात व्याख्यान संपन्न

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** समाजातील सर्वच क्षेत्रात आज महिलांचा सहभाग दिसत असला तरी हे प्रमाण सर्वसमावेशक नसून प्रातिनिधीक स्वरुपाचे आहे. जर हे प्रमाण वाढवायचे असेल तर महिलांना सर्वच बाबतीत समान संधी, समान दर्जा द्यावा लागेल. त्यासाठी महिलांचे प्रबोधन होणे गरजेचे आहे. प्रबोधनानेच महिलांचे खऱ्या अर्थाने सक्षमीकरण होवू शकेल असे प्रतिपादन कवयित्री, विचारवंत प्रणाली मराठे यांनी केले. त्या धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघातर्फे नवरात्रौत्सवानिमित्त घेण्यात आलेल्या 'स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव आणि महिला सक्षमीकरण' या विषयावरील व्याख्यानप्रसंगी प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार संघाचे अध्यक्ष विशाल ठाकूर होते. प्रणाली मराठे पुढे बोलताना म्हणाल्या की, निवडणूकीत निवडून आलेल्या स्त्रीया या अपवाद वगळता नामधारीच असतात. प्रत्यक्षात कार्यक्रमांमध्ये त्यांचे पतीच छायाचित्रांमध्ये दिसतात. निर्णयप्रक्रियेत स्त्रीचा सहभाग नगण्यच दिसतो. नवरात्रौत्सवात नऊ दिवस कोणत्या रंगाच्या साड्या नेसायच्या हे ठरविण्याचं स्वातंत्र्य महिलांना आहे. मात्र घरातील महत्वाच्या विषयांवर निर्णय घेण्याचं स्वातंत्र्य नाही हा विरोधाभास महिला सक्षमीकरणातील अडथळा आहे. समाजाने स्त्रीला दुय्यम स्थान न देता सर्वच क्षेत्रात महिलांना पुढे येण्यासाठी मानसिकता बदलली पाहीजे. महिलांना स्वावलंबी होण्यासाठी त्यांना आर्थिक अधिकार दिले पाहीजेत. आज आपण स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सव साजरा करीत असताना समाजात पुरुषप्रधान सत्ता आहे. हे चित्र बदलायला हवे. महिलांना आपला जोडीदार निवडण्याचे स्वातंत्र्य समाजाने दिले पाहीजे. स्त्रीला फक्त स्त्री म्हणून न पाहता तिला माणूस म्हणून जगण्यासाठी प्रेरित केले पाहीजे. लैंगिक शोषण, आंतरजातीय विवाहांना विरोध, बालविवाह, वासनांधतेची शिकार अशा अनेक रुपात स्त्री अत्याचाराची बळी ठरत आहे. स्त्री बाहेरच काय घरातही सुरक्षित राहिलेली नाही. शहरी भागात आपल्याला महिला सक्षमीकरण जाणवते. मात्र ग्रामीण भागातील स्थिती वेगळी आहे. तिथे अजूनही उंबरठा ओलांडण्याची स्त्रीला बंधने आहेत. म्हणून समाजाने आपली मानसिकता बदलून स्त्रीचे प्रबोधन होण्यास साहाय्य केले तर महिला सक्षमीकरणाच्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करता येईल. आपली कृषीप्रधान संस्कृती आणि स्त्रीने शेतीचा लावलेला शोध याचा विचार करुन स्त्रीचा सन्मान आणि प्रबोधन करण्यासाठी आता संविधानाची पारायणे करण्याची गरज आहे असे मत मराठे यांनी व्यक्त केले.

# आनंदग्राम ते सेवाग्राम सद्भावना सायकल यात्रा मानवतवरून रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** आजादी का अमृत महोत्सव व गांधी जयंती निमित्त आनंदग्राम जिल्हा बीड दिनांक 25 सप्टेंबर रोजी निघालेल्या सद्भावना यात्रेचे आगमन दिनांक 26 सप्टेंबर रोजी मानवत येथे झाले. या सायकल यात्रेची सांगता दिनांक 2 ऑक्टोंबर रोजी वर्धा जिल्ह्यात सेवाग्राम येथे होणार आहे. महात्मा गांधींनी खेड्याकडे चला हा संदेश घेऊन संवाद यात्रा करत आहोत. वर्षभरात शंभर खेड्यापर्यंत पोहोचण्याचा संकल्प करून या कार्याचा समारोप  गांधी जयंती सेवाग्राम वर्धा येथे करण्याचा निर्धार केला आहे. महामानव डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला संविधान दिले. संविधान जागर हा उपक्रम देखील घेण्यात येत आहे. घराघरापर्यंत संविधान पोहोचले पाहिजे हा या जागर उपक्रमाचा उद्देश आहे. या देशातील अंधश्रद्धा अस्पृश्यता व जातीभेद नष्ट व्हावा. बळीराजाला संकट मुक्त करून देश सुजलाम सुफलाम व्हावा. समता स्वातंत्र्य व बंधुत्व प्रस्थापित करून राष्ट्रीय एकात्मता वाढीस लागावी यासाठी ही सद्भावना सायकल यात्रा आयोजित केली आहे. मानवत येथील के.के.एम. महाविद्यालयास सद्भावना सायकल यात्रेने भेट दिली आहे. दुपारी तीन वाजता मानवत येथील दानशूर समाजसेवक सतीश बासुंबे  यांच्या घरी जेवणाची व्यवस्था करण्यात आली होती. सतीश वासुंबे  यांनी सर्व यात्री करूनच स्वागत केले आहे. त्यानंतर लगेचच सायकल यात्रा परभणी कडे रवाना झाली.



# घनसावंगी येथे होणार ४२ व्या मराठवाडा साहित्य संमेलन कार्यालयाचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**घनसावंगी :** स्वामी रामानंद शिक्षण प्रसारक मंडळ शहागड संस्थेच्या 'रौप्य महोत्सवी' वर्षानिमित्त मराठवाडा साहित्य परिषदेचे ४२ वे मराठवाडा साहित्य संमेलन दिनांक १० व ११ डिसेंबर २०२२ रोजी घनसावंगी येथे संत रामदास महाविद्यालया परिसरात संपन्न होणार आहे. सदरील साहित्य संमेलनाच्या कार्यालयाचे उद्घाटन व बोधचिन्हाचे प्रकाशन महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध गीतकार, कवी तथा नाट्य लेखक दासू वैद्य यांच्या हस्ते दिनांक ७ आक्टोंबर २०२२ रोजी होणार आहे. या कार्यक्रमास केंद्रिय कार्यकारिणीच्या सदस्या संजीवनी तडेगावकर व मराठवाडा साहित्य परिषद शाखा जालनाचे अध्यक्ष प्रा. रमेश भुतेकर, उपाध्यक्ष जयराम खेडेकर, सचिव पंडित तडेगावकर, कोषाध्यक्ष कैलास भाले यांच्या उपस्थितीत होणार आहे. तरी परिसरातील सर्व कवी, साहित्यिक, विचारवंत, अभ्यासक व राजकीय, सामाजिक क्षेत्रातील सर्व मान्यवरांनी उपस्थित राहावे असे आवाहन साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष माजी आ. शिवाजीराव चोथे  साहेब यांनी केले आहे. ४२ व्या मराठवाडा साहित्य संमेलनाची पूर्वतयारीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. के. परदेशी, सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी प्रयत्न करीत आहेत.

# कहाटूळ गावातील शेतकऱ्यांना जैविकखते व औषधींचे मार्गदर्शन

आधुनिक केसरी न्यूज

**शहादा :** तालुक्यातील कहाटूळ गावात नवभारत फर्टीलाइझर्स ली.  तर्फे शेतकरी मेळावा घेण्यात आला व तेथील शेतकऱ्यांना जैविक खते व औषधीचे मार्गदर्शन करण्यात आले.. व आज दिवसेंदिवस आपण जमिनीची अती रासायनिक खते व औषधी टाकल्या मुळे शेती मध्ये होणारी घट व मानवी शरीराला होणारे नुकसान कमी करण्यासाठी नवभारत फर्टीलाइझर्स ली. चे आधिकरी उमेश निकस यांनी दि. 28 / 9 / 2022 रोजी शहादा तालुक्यातील कहाटूळ येथे शेतकरी मेळाव्यात जैविक खते व सेंद्रिय शेती बदल मार्गदर्शन केले. तसेच कंपनीचे अधिकारी उमेश निकस यांनी शेतकऱ्याची जमीन भुसभुसीत करण्यासाठी तसेच पोत सुधारण्यासाठी जमिनीची आद्रता भरुन काठण्यासाठी व शासनाच्या म्हणण्यानुसार जैविक शेतीला जास्त प्राधान्य देण्यात येणाऱ्या योजना शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी नवभारत फर्टीलाइझर्स ली. गेल्या 25 वर्षापासून शेतकऱ्याच्या सेवेसाठी काम करत आहे. त्यामुळे आपण आज पासुन जैविक शेती कडे वळावे असे आश्वासन कंपनीचे अधिकारी DBM. चंद्रराव पाटील , ABM.पांडुरंग कोळी यांनी सांगितले की सेंद्रिय शेती हि पुढच्या पिढीसाठी काळाची गरज आहे. असा एक छोटासा प्रयत्न नवभारत फर्टीलाइझर्स ली. कंपनी करीत आहे. भविष्यात सुध्दा कंपनीकडून आशीच सेवा पुरवली जाईल असे आश्वासन दिले. यावेळी मेळाव्यात गावाचे सरपंच अनिल भिला पाटील, पोलिस पाटील विजय दशरथ पाटील, विजय दत्तू पाटील, रतिलाल पाटील, कंपनीचे अधिकारी अतुल बाळू जाधव, जगदीश सूर्यवंशी, गोपाल पाटील, मुकेश शिरसाट व कहाटूळ गावातील समस्त शेतकरी या मेळाव्यात उपस्थित होते.

# आनंदग्राम ते सेवाग्राम सायकल यात्रेचे पुसदमध्ये स्वागत

आधुनिक केसरी न्यूज

**पुसद :** ते सेवाग्राम सुरू केलेल्या सदभावना सायकल यात्रेचे आगमन पुसद येथे होताच स्वागत करण्यात आले. भारतीय स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव व गांधी जयंती चे औचित्य साधून 25 सप्टें ते 2 ऑक्टो दरम्यान आनंदग्राम-बीड-माजलगाव-मानवत-परभणी-औंढानागनाथ-हिंगोली-पुसद-यवतमाळ-वर्धा-सेवाग्राम अश्या सदभावना सायकल यात्रेचे आयोजन बीड येथील इन्फन्ट इंडिया या एच आय व्ही बाधितांच्या पुनर्वसन प्रणेते दत्ता बारगजे यांनी केले. पुसदमध्ये आल्या नंतर सायकलस्वारांनी पुसद मधील सर्व पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले. त्यानंतर गीताईसेवा केंद्रात एका चोटेखानी सभेचे आयोजण करण्यात आले. समाजातील हिंसक वृत्ती दिवसा गणिक वाढत चालली आहे. शस्त्र आणि शब्द यातून व्यक्त होणारी हिंसा आजच्या आजच्या काळात तर कमालीची वाढलेली आहे. तरुणाईने हिंसक होणे हे तर फारच अस्वस्थ करणारे आहे. परंतु आपल्या जीवनातील प्रश्नांचे समाधानकारक उत्तर केवळ अहिंसेतच आहे. त्यामुळे हे प्रश्न अहिंसेच्या मार्गाने सोडवूयात असे प्रतिपादन दत्ता बारगजे यांनी केले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी गीताई केंद्राच्या उपाध्यक्ष शालीनि ताई वैद्य, तर मंच्यावर सचिव ऍड घ्यानेंद्र कुशवाह, गजानन वायकुळे,यशवंत देशमुख होते. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी बस्वराज डोंगरे, नाम चे स्वप्नील देशमुख, अमोल पाटील उबाळे, कुलदीप गावंडे, प्रतीक पवार, निशांत राऊत, विशाल ठाकरे, सुरेश आढाव तसेच इन्फन्ट इंडिया चे कार्यकर्ते उपस्थित होते.



# आत्मा योजनेअंतर्गत पोषण आहार योजनेतून कुपोषण कमी करण्याच्या प्रयत्नांना यश

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यात आत्मा योजनेअंतर्गत पोषण आहार योजनेतून कुपोषित बालकांच्या कुटुंबाना तालुका कृषि अधिकारी,सोयगाव एस.जी.वाघ व ए.एस.महाजन बी.टी.एम, सोयगाव, यांच्या नियोजनातून विविध गावातील अंगणवाडी सेविका व कृषि सहाय्यक यांच्या मदतीने तालुक्यात एकूण ३३३ किट वाटप करण्यात आले होते. सर्व लाभार्थी यांना आपल्या परसबागेत तसेच शेतात लागवड केलेल्या भाजीपाला किट मधून घरघुती वापरासाठी भोपळा, दोडका, भेंडी, मिरची, गवार, चवळी, वाल, मेथी, कोथंबीर, गाजर यांचे उत्पन्न मिळाले. तसेच अंगणवाडी सेविका यांचे मार्फत अंगणवाडी कार्यक्षेत्रात लागवड केलेल्या क्षेत्रातून भाजीपाला उत्पन्न मिळाले. सदरील भाजीपाला लागवडीची तपासणी कृषि विभागाच्या विविध अधिकारी यांचे मार्फत तपासणी करण्यात येत आहे. तसेच लाभार्थी यांचे मनोगत घेतले असता ताजा व सेंद्रिय पद्धतीने उत्पादीत केलेला भाजीपाला मिळाला.



# पाच वर्षांपासून फरार खुनी पकडला

आधुनिक केसरी न्यूज

**औरंगाबाद :** पाच वर्षांपासून खुनाच्या आरोपात फरार असलेला आरोपी वाळूज च्या इंड्यूरन्स कंपनीत काम करत असताना उस्मानपुरा पोलीस ठाण्याच्या पोलीस आयुक्तांनी स्थापन केलेल्या विशेष पथकाने पकडला. प्रवीण उत्तम वाकळे (३५ अंदाजे) रा, सेनगाव, हिंगोली असे अटक आरोपीचे नाव आहे पाच वर्षांपूर्वी आरोपी वाकळे हा संदीप प्रभाकर जोशी रा. गादिया विहार यांच्या गोडावूनवर सुरक्षा रक्षक म्हणून कामाला होता २०१७ साली १० जुलै रोजी काही चोरटे त्या ठिकाणी चोरी करण्यासाठी गोडाऊनवर दगडफेक करत होते म्हणून आरोपी वाकळे याने मालक संदीप जोशी यांना गोडाऊनवर बोलावून घेतले त्या ठिकाणी विजय सदाफुल नावाचा चोरटा जोशी आणि वाकळे यांनी पकडला त्याला बेदम मारहाण केली या प्रकरणात उस्मानपुरा पोलीस ठाण्यात ३२६ कलमान्वये गुन्हा दाखल झाला होता. त्यावेळेस आरोपी संदीप जोशी ने अटकपूर्व जामीन मिळवला होता व वाकळे पळून गेला होता दोन दिवसांनी मारहाण करण्यात आलेला चोरटा सदाफुल हा उपचारा दरम्यान मरण पावला. त्यानंतर उस्मानपुरा पोलिसांनी गुन्ह्यात आरोपपत्रही दाखल झाले केले होते. यागुन्ह्यात एपीआय राहुल सूर्यतळ यांना हिंगोली पोलिसांनी खबर दिली की, खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी वाकळे हा औरंगाबाद येथील वाळूज औद्योगिक परिसरातील इंड्यूरन्स कंपनीत काम करतो. गेल्या चार दिवसांपासून एपीआय सूर्यतळ यांनी त्याच्यावर पाळत ठेवत आज प्रवीण वाकळे ला अटक केली. दरम्यान एक महिन्यापूर्वी



पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता यांनी प्रत्येक पोलीस ठाण्यात एका विशेष पथकाची नेमणूक केली आहे. हे पथक जुन्या गुन्ह्यातील फरार आरोपी शोधण्याची कामगिरी करते, या पथकात एक अधिकारी चार कर्मचारी असतात. या पथकावर गुन्हेशाखा पोलीस निरीक्षक अविनाश आघाव देखरेख करतात प्रत्येक आठवड्यात सोमवारी या पथका कडून टार्गेट घेतले जाते त्यानुसार उस्मानपुरा पोलीस ठाण्याच्या पथकाने वरील कामगिरी पार पाडली. या कारवाईत पोलीस आयुक्त डॉ. निखिल गुप्ता , पोलीसउपायुक्त दीपक गिर्हे, सहाय्य्क पोलीस आयुक्त विशाल ढुमे पोलीस निरीक्षक अविनाश आघाव, गीता बागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली एपीआय राहुल सूर्यतळ पोलीस कर्मचारी योगेश गुप्ता, सतीश जाधव , संदीप धर्मे यांनी सहभाग घेतला होता

# सुरेश काळे यांना आदर्श ग्रामसेवक पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील टिटवी व देव्हारी गावाचे ग्रामविकास



अधिकारी सुरेश काळे यानां आज आदर्श ग्रामसेवक पुरस्कार जि.प. औरंगाबाद याच्याकडून हा पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. देव्हारी येथील सुरेश काळे यांना जि.प.औरंगाबाद वतीने यावर्षीचा उत्कृष्ट पत्रकार पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. त्यांनी विविध शासकीय योजना अतिशय ग्रामीण भाग असलेल्या देव्हारी, टिटवी गावात योजना राबविण्यात येत आहे ग्रामसेवक पदावर कार्यरत असलेल्या प्रशासकीय, विकासात्मक कामे,कर्तव्य व जबाबदाऱ्या पार पाडल्या त्यांच्या हातून उल्लेखनीय कामे या सावळदबारा परिसरात असलेल्या गावामधे कामे केल्या गेली त्या कार्याचा गौरव म्हणून ग्रामविकास अधिकारी सुरेश काळे यांना हा आदर्श पुरस्कार देण्याचे जि.प.ने ठरविले. आदर्श ग्रामसेवक पुरस्कार तापडीया नाट्य मंदिर, निरला बाजार औरंगाबाद येथे दि.२/१०/२२ प्रदान करण्यात येणार आहे. पुढे पण पत्रकारिता च्या वतीने "साप्ताहिक आपले ज्ञानपंख" संपादक दशरथ सुरडकर परिवाराकडून उत्कृष्ट ग्रामसेवक हा पुरस्कार जानेवारी २०२३ मधे प्रधान करण्यात येणार आहे. त्यांना या आदर्श ग्रामसेवक पुरस्कारला परिसरातून शुभेच्छा वर्षाव होत आहे. सरपंच समीरखाँ तडवी, उपसरपंच उत्तम चव्हाण, सरपंच संध्याताई भागवत जाधव, शालेय समितीचे अध्यक्ष विठ्ठल चव्हाण,सरपंचपती भागवत जाधव, ग्राणसेविका सुरेखा पवार मँडम, प्रदीप पाटील ग्रामसेवक, एस.ए.रणजीत ग्रामसेवक, अंशु भोवटे ग्रामसेवक, सुधीर भालेराव ग्रामसेवक,उपसंपादक तथा जेष्ठ पत्रकार गोकुळसिंग राजपूत, पत्रकार रहीमखाँन, शिक्षकवृंद अशा विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

# कोल्हा ग्रा.पं.मध्ये ज्येष्ठ नागरिक दिन

आधुनिक केसरी न्यूज

**मानवत :** तालूक्यातील मौजे कोल्हा ग्राम पंचायत मध्ये आज एक ऑगस्ट हा दिवस जेष्ठ नागरिक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपसरपंच नारायणराव भिसे तर प्रमुख पाहुणे सरपंच साजराबाई गायकवाड, सन्माननिय ग्राम पंचायत सदस्य शंकरराव भिसे, राजेश दहिवाळ ज्ञानेश्वर भिसे , ग्राम पंचायत सदस्य रमेश तारे शेषराव भिसे ग्राम विकास अधिकारी टोम्पे साहेब उपस्थित होते. या वेळी कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून सुरुवात करण्यात आली. या वेळी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब भिसे यांनी केले. यावेळी ग्राम पंचायत सदस्य ज्ञानेश्वर भिसे यांनी मनोगत व्यक्त केले या वेळी सर्व मान्यवरांचे आभार ग्राम विकास अधिकारी टोंपे यांनी मानले. कार्यक्रमासाठी गावातील ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने या वेळी उपस्थित हो. या वेळी कोल्हा ग्राम पंचायतच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करून सन्मान करण्यात आला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपसरपंच नारायणराव भिसे ग्राम विकास अधिकारी टोम्पे , शंकरराव भिसे, वैभव भिसे, ज्ञानेश्वर भिसे यांनी परिश्रम घेतले.

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यांना जगण्याचा अधिकार नाही : चाकणकर

आधुनिक केसरी न्यूज



**सेलू :** येथील अल्पवयीन मुलीवर अत्याचार करणाऱ्यांना जगण्याचा अधिकार नाही त्यांना फाशीच झाली पाहिजे अशी महिला आयगोगाची भूमिका असल्याची माहिती सेलू येथे शुक्रवार दि.30 सप्टेंबर रोजी बोलतांना राज्य महिला आयोगाच्या अधक्षा रुपालीताई चाकणकर यांनी दिली. अश्या प्रवृत्तीच्या नराधमांना मोकळे सोडणे समाजासाठी त्रासदायक ठरतील आरोपीना फाशीची शिक्षा मिळेपर्यंत पाठपुरावा करून पीडितेला न्याय मिळवून देण्यास महिला आयोग सर्वस्तरीय प्रयत्न करणार. मागील 05 सप्टेंबर रोजी सेलू तालुक्यात घडलेल्या अल्पवयीन मुलीच्या बलात्कार प्रकरणी पीडितेची भेट घेन्यासाठी त्या सेलूत आल्या होत्या. पुढे बोलतांना चाकणकर म्हणाल्या की महिला आयोगाच्या माध्यमातून पीडितेला शासनाच्या नियमाप्रमाणे मदत मिळवून दिली जाईल. मी जेंव्हा पीडितेला भेटायला तिच्या घरी गेले असता त्या पीडितेच्या अंगावर शहारे आले इतक्या कोवाळ्या वयात अत्याचार होणे समाजासाठी घातकच आहे. माझ्याशी बोलतांना पीडितेची एकच मागणी होती की माझ्या सोबत घडलेली दुर्दैवी घटना इतरांसोबत घडू नये अशी इच्छा व्यक्त केली. या वेळी परभणी पोलीस अधीक्षक जयंत मीना, सेलू पोलीस निरीक्षक रावसाहेब गाडेवाड, भावना नखाते, प्रेक्षा भांबळे, निर्मला लिपने, विनायक पावडे,कपिल आकात, अजय डासाळकर, आदीची ऊपस्थीती होती हाजर होते.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in